• पुणे, रविवार, २ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 95 • वर्ष ४ थे, अंक ९५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



स्कूलबसमध्ये 'करडी नजर'

P३



दुसरी बाजू

P५ स्वारगेट बस्थानकात घडलेल्या घटनेवर विशेष लेख

## At a Glance

### पुणे मनपाला सोलापूरकरांचा सल्ला?

**पुणे :** महानगरपालिकेने सांस्कृतिक धोरण ठरवण्याच्या सल्लागार समितीमध्ये वादग्रस्त अभिनेते राहुल सोलापूरकर यांचा समावेश केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. मनपाने पुण्याला सांस्कृतिक दिशा देण्यासाठी स्थायी समिती संदर्भात एक समितीचे गठन केले आहे. त्यामध्ये पुण्यातील अनेक तज्ञ आहेत. » पान ४ वर

### ज्येष्ठ लेखिका डॉ. मीना प्रभू यांचे निधन



**पुणे :** मराठीमध्ये प्रवासवर्णन साहित्य प्रकारात नवा मानदंड निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ लेखिका डॉ. मीना सुधाकर प्रभू यांचे शनिवारी दुपारी 2 वाजून 38 मिनिटांनी हृदयविकाराने राहत्या घरी निधन झाले. त्या 85 वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर रात्रीच्या सुमारास येथील वैकुंठ » पान ४ वर

# आ. सावंत यांना इंजेक्शन

## माजी आरोग्य मंत्री फडणवीसांच्या रडारवर

## टेंडर रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आणखी एक धक्का देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या एका लाडक्या मंत्र्याचे टेंडर रद्द केले. माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या तब्बल ३२०० कोटी रुपयांच्या निविदेचा एक ठेका रद्द करून फडणवीस यांनी या माजी आरोग्य मंत्र्याला इंजेक्शन दिल्याचे दिसत आहे

माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या कार्यकाळात काढण्यात आलेल्या निविदेत तब्बल ३२०० कोटींची अनियमितता आढळल्यानेच या कामांना स्थगिती देण्यात आली आहे असे विद्यमान आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले .

त्यामध्ये तथ्य असल्यानेच मुख्यमंत्र्यांनी या निविदेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगत आबिटकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचे स्पष्टपणे कौतुकच केले. विशेष म्हणजे एक पक्ष म्हणजे सरकार नव्हे असे स्पष्टपणे सांगत त्यांनी महायुतीमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे संकेत दिले आहेत. तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या कार्यकाळात एका कंपनीला ३२०० कोटी रुपयांचे टेंडर दिले होते, या कामात अनियमितता आढळली असल्याचे आणि त्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत होता. त्यापार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कामाला स्थगिती दिली आहे. त्यासंदर्भात आज पुणे भेटीवर असलेल्या आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना विचारले असता त्यांनी थेट सावंत यांचे नाव घेत या निविदेत अनियमितता असू शकते त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी या कामालाच स्थगिती दिल्याचे स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी राज्यातील बालकांच्या आरोग्य तपासणी मोहिमेबाबत माहिती दिली. राज्य आणि केंद्र सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून 0 ते 18 वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी सुरू करण्यात आली आहे. सुमारे 14 ते 15 लाख मुलांचे आरोग्य तपासले जाईल, यामध्ये गंभीर आजार असलेल्या मुलांवर तातडीने उपचार केले जातील. गरज पडल्यास शस्त्रक्रियाही केली जाणार असल्याचे आबिटकर यांनी स्पष्ट केले. कावळ्यांमध्ये बर्ड फ्लू, पण घाबरण्याचे कारण नाही अशा सूचना त्यांनी माध्यमांशी बोलतांना दिल्या. राज्यात बर्ड फ्लूचा धोका निर्माण झाल्याच्या » पान ४ वर



"एखाद्या कामात अनियमितता आढळल्यास त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. यात कोणत्याही पक्षाचा संबंध नाही. तानाजी सावंत यांनी ३० ऑगस्ट २०२४ रोजी पुण्यातील एका खासगी कंपनीला ३२०० कोटी रुपयांची टेंडर मंजूर केली होती. या टेंडर्समध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय असून, यातील पारदर्शकता तपासली जात आहे."

— **प्रकाश आबिटकर,** आरोग्यमंत्री

# वाल्मिक हाच मास्टरमाइंड

## घुलेने केली हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बीड :** वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा सूत्रधार असल्याचं पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून सिद्ध झालं आहे. त्यामुळे वाल्मिक कराड भोवती आता कारवाईचा फास पूर्णतः आवळला गेला आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात 80 दिवसांमध्ये आरोपपत्र पोलिसांकडून दाखल करण्यात आलं आहे. या आरोपपत्रामधून वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा सूत्रधार असल्याचं पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून सिद्ध झाले आहे. त्यामुळे वाल्मिक कराड भोवती आता कारवाईचा फास पूर्णतः आवळला गेला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपपत्र हाती लागलं असून यामध्ये संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामध्ये प्रमुख आरोपी म्हणून वार्मिक वाल्मिक कराडचा उल्लेख करण्यात आला आहे.

**देशमुख हत्या प्रकरण**

आरोप पत्रामध्ये विष्णू साठे दोन नंबरचा आरोपी आहे. संतोष देशमुख यांची हत्या ही पूर्णतः खंडणी वादामधून झाल्याचे आरोपपत्रातून सिद्ध झाले आहे. आवादा कंपनीकडे खंडणी मागितली होती आणि या खंडणीनंतर झालेल्या वादामध्ये संतोष देशमुख यांची अपहरण करून हत्या करण्यात आली. » पान ४ वर

# पुण्यात तूर्तास पाणी कपात नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात तूर्तास तरी कोणतीही पाणी कपात केली जाणार नाही, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच पुण्याच्या पाणी वापराबाबत नियोजन करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली कालवा समितीची बैठक विधान भवन ( कौन्सिल हॉल ) येथे पार पडली. या बैठकीनंतर जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री पवार हे कालवा समिती विषयी पत्रकारांना माहीती देतील अशी अपेक्षा होती, परंतु ते बैठक झाल्यानंतर थेट निघुन गेले. त्यामुळे विखे पाटील यांनी पत्रकारांना बैठकीविषयी माहीती दिली. पुणे महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात पाणी बिलासंदर्भात वाद आहेत. जलसंपदा विभागाने थकबाकी भरण्यासाठी महापालिकेला नोटीस पाठविली आहे. थकबाकी भरली नाही तर पुण्याचा पाणी पुरवठा टप्प्या टप्प्याने कमी करण्यात येईल असा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे.

यापार्श्वभूमीवर कालवा समितीच्या बैठकीत काय होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पुण्याच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात विखे पाटील यांनी माहीती देताना पुण्यात तूर्तास तरी कोणतीही पाणी कपात होणार नसल्याचे स्पष्ट केले. "पाणी बिलाची मोठी पुणे महापालिकेकडे थकबाकी आहे. मंजुर कोटा अठरा टिएमसी असूनही पुणे महापालिका २२ टिएमसी इतके पाणी उचलते. शहर वाढत आहे, त्यामुळे पाण्याची मागणी वाढते हे मान्य आहे. पण त्याचवेळी शेतीलाही पाणी द्यावे लागत आहे. पुण्याच्या पाणी पुरवठ्याचे नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी मी जलसंपदा आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांना एकत्रित बसून नियोजन करायला सांगितले आहे. पुण्यात पाण्याचा बेछूट व अमर्याद वापर केला जात आहे, याचे नियोजन करावे लागेल. तसेच पुणे महापालिका किती टक्के पाण्यावर प्रक्रीया करते हा देखील भाग महत्वाचा आहे" असे विखे पाटील यांनी नमूद केले.

### माळशिरस तालुक्याला बारा महिने पाणी ?

● या बैठकीत आठ धरणातील पाणीसाठ्यावर चर्चा झाली. संपूर्ण पाण्याच्या उपलब्धते बाबत अनेक आमदारांचे आक्षेप होते ते आता दूर झाले आहे. नीरा डावा व उजवा कालव्यातून होणारा पाणी पुरवठ्या विषय गंभीर आहे. माळशिरस तालुक्याला १२ महिने पाणी द्यावे अशी मागणी आमदारांची होती, ती मान्य केली आहे. या तालुक्याला इतर ठिकाणाहून पाणी देता येईल का ? याचा विचार केला जाणार आहे. यासंदर्भात पुन्हा एकदा बैठक होणार आहे, अशी माहीती जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी दिली. तसेच फलटण तालुक्याचे पाणी कमी होणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

### कालवा सल्लागार समितीची बैठक

## निरंतर विकास

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**गंगटोक:** सिक्कीम येथील पाक्यंग विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारासह एअर कनेक्टिव्हिटी वाढविण्याबद्दल केंद्रीय हवाई मंत्री मुरलीधर मोहोळ आग्रही आहेत. या संदर्भात शनिवारी सिक्कीमचे पर्यटन मंत्री टी टी भुतिया आणि इंद्रहन सुब्बा यांच्यासोबत त्यांनी बैठक घेतली.

### उत्तराखंडमधील हिमस्खलनातून ४८ जणांचा बचाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात झालेल्या ग्लेशियर कोसळून झालेल्या हिमस्खलनात ५५ मजूर अडकले होते. यानंतर आता ४७ जणांची सुटका करण्यात आली असून ८ जणांचा शोध सुरू आहे. चमोलीचे जिल्हाधिकारी संदीप तिवारी यांनी दिलेल्या माहितीनुसार बचावकार्यासाठी लष्कराच्या ४ हेलिकॉप्टरचा वापर केला जात आहे. ७ जणांना जोशीमठ रुग्णालयात आणण्यात आले आहे. लष्कर, ITBP, BRO, SDRF आणि NDRF चे २०० हून अधिक जवान बचाव कार्यात गुंतले आहेत. ही घटना बद्रीनाथपासून ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या चमोलीच्या माना गावात घडली. ब्रिगेडियर एमएस ढिल्लोन म्हणाले की, » पान ४ वर

## अजित पवार यांनी मोरेंना सुनावलं

# मोरे यांना तोडफोड पडणार महागात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते वसंत मोरे यांनी काल स्वारगेट प्रकरणानंतर शासकीय कार्यालयाची तोडफोड केली. त्याला समाज माध्यमातून बऱ्यापैकी प्रसिद्धी मिळाली. पक्षप्रमुखांनीही कौतुक केले. परंतू आता ही तोडफोड त्यांना महागात पडण्याची शक्यता आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्याच्यावर तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. पालकमंत्री अजित पवार यांनी वसंत मोरेंना चांगलंच सुनावलं आहे. स्वारगेट एसटी स्थानकात झालेली बलात्काराची घटना ही स्थानकातील सुरक्षारक्षक केबिनच्या जवळच घडली. मात्र आता अशा प्रकारची तोडफोड करणाऱ्या व्यक्तींवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करणार असल्याचं अजित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. पुण्यात माध्यमांशी बोलताना अजित पवार म्हणाले, एखादा प्रकार घडल्यानंतर त्याचा पूर्ण तपास होऊन वस्तुस्थिती पुढे येणे आवश्यक असते. मात्र त्यापूर्वीच काहीजण सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान करतात, त्यांना सोडलं जाणार नाही. त्यांच्यावर देखील कारवाई होणार. एखादा आरोपी सापडत नाही म्हणून



तुम्ही तुमच्या स्वतःच्या घराच्या काचा फोडणार का? घरातील खुर्च्या तोडणार का? असा सवाल अजितदादांनी अप्रत्यक्षपणे वसंत मोरेंना केला. मात्र, अशा परिस्थितीत काहीजण काहीतरी अव्वाच्या सव्वा करायला लागलेत. जशी राज्याची देखभाल करण्याची जबाबदारी सर्व यांच्यावर सोपवलेली आहे. हे दाखवण्यासाठी काही अतिउत्साहात हे काही करायला लागले आहेत. त्यांच्यावर पण कायद्याच्या नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं.



"यापूर्वीच कोर्टाने सांगितलं आहे की जर कोणी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणार असेल तर नुकसान करणारा पक्ष असेल किंवा त्या पक्षाचे कार्यकर्ते असतील तर त्याची नुकसान भरपाई ही पक्षांकडून करून घेण्यात येते. राग हा सर्वांना येतो. मात्र राग व्यक्त करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती असू शकतात. अहिंसेच्या माध्यमातून महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल हे संपूर्ण जगाला माहिती आहे."

— **अजित पवार,** उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री

### फरार कोरटकरांचा अद्यापि शोध सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरणी कोल्हापूर आणि नागपूर पोलिसांच्या पथकाडून फरार प्रशांत कोरटकर यांचा शोध सुरु आहे. अद्याप प्रशांत कोरटकर पोलिसांच्या हाती सापडलेले नाहीत. गोपनीय सूत्रांच्या माहितीनुसार प्रशांत कोरटकरांकडून अटकपूर्व जामिनासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती आहे. सुरुवातीला तो आवाज आपला नाही म्हणणारे कोरटकर फरार का झाले? असा प्रश्न आहे. कोल्हापूर येथील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकीचा फोन आला होता. या धमकीच्या फोनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह भाषा वापरण्यात आली होती. इंद्रजीत सावंत यांनी धमकी देणाऱ्या व्यक्तीचं नाव प्रशांत कोरटकर असल्याचा » पान ४ वर

# संजय राऊतांकडून मुख्यमंत्र्यांचे पुन्हा कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सलग दुसऱ्या दिवशी उबाठाचे नेते संजय राऊत यांनी कौतुकाचा वर्षाव केला. जर मुख्यमंत्री भ्रष्टाचार बाहेर काढत असतील तर ते चांगलेच काम करीत आहेत असे ते म्हणाले.


एकनाथ शिंदे यांच्या काळात जी कामे झाली ती कामे झालीच नाही झाला तो केवळ भ्रष्टाचारच. शिंदेंच्या काळात आरोग्यमंत्री कोण होतं हे साऱ्यांना माहिती आहे आणि त्यांच्या अल्प कार्यकाळात किती घोटाळे झाले हेही सर्वांना ठाऊक आहेत. म्हणूनच भाजपकडून अशा भ्रष्ट मंत्र्यांना विरोध होता त्यातील ते एक आहेत. सार्वजनिक आरोग्य खात्याचा थेट जनतेशी संपर्क येतो. मात्र त्या खात्यात भ्रष्टाचार होणार असेल तर ते कसलं खातं आणि कसलं राजकारण. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व थांबवत आहेत आणि पुढेही थांबवणार असतील तर आणि आधीचा भ्रष्टाचार कसा झाला हे जर जनतेसमोर आणणार असतील तर नक्की आम्ही त्यांचं स्वागत करू. त्यांच्या प्रत्येक कृतीचा आम्ही स्वागतच करू. असे म्हणत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा » पान ४ वर

# हवे चंद्र तारे; फुलांचे पसारे...!

## सहकारनगर येथील 'तारांगण' पुन्हा होणार सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेतील आणि अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांना अवकाश, तारे, ग्रह यांची माहिती मिळावी यासाठी महापालिकेने आता एक सकारात्मक पाऊल टाकले आहे. त्यासाठी तब्बल चार वर्षांपासून बंद असलेले सहकारनगर येथील ई-लर्निंग स्कूलमधील 'तारांगण' हा प्रकल्प पुन्हा सुरु करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठी तब्बल ६१ लाख ६५ हजार रुपयांच्याअ खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे विद्यार्थ्यांना 'हवे चंद्र तारे फुलांचे पसारे' हे प्रत्यक्ष अनुभवयास मिळणार आहे. देखभाल दुरुस्ती अभावी बंद पडलेले सहकारनगर येथील तारांगण पुन्हा सुरु केले जाणार आहे. महापालिकेने दोन कोटी रुपये खर्च करून ते उभे केले होते. नियमित देखभाल दुरूस्ती अभावी गेल्या चार वर्षांपासून बंद पडले होते. ते पुन्हा सुरु करण्यासाठी संस्था नियुक्त करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीत मंजुर केला गेला. महापालिकेने शालेय विद्यार्थ्यांना अवकाश, ग्रह, तारे, अवकाश यांची माहिती सहज सोप्या शब्दात व्हावी या उद्देशाने सहकारनगर मधील ई- लर्निंग स्कूलमध्ये तारांगण उभारले होते. मात्र देखभाल दुरुस्ती ने केल्याने ते बंद होते. हे तारांगण



सुरु करावे, अशी मागणी सातत्याने केली जात होती. त्यामागणीला आता यश आले असून तब्बल ४ चार वर्षांनी हे तारांगण सुरू होणार आहे. यासाठी ६१ लाख ६५ हजार ५०० रूपये खर्च येणार आहे. पाच वर्षासाठी हा खर्च होणार आहे. हे तारांगण सुरू करणे, त्यासाठीचे शो तयार करण्याचे काम एका संस्थेला देण्यात आले आहे. महापालिकेकडून उभारण्यात आलेल्या या तारांगणाचे काम हे विशिष्ट स्वरूपाचे आहे. या तारांगणात फुलडोम प्रो या कंपनीचा सर्व्हर व सॉफ्टवेअर बसविण्यात आले होते. मात्र, त्याचे नुतनीकरण करण्यात आले नसल्याने हे तारांगण बंद होते. ही कंपनी या तारांगणासाठी २७ शो तयार करणार असून त्यात, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेच्या शो असणार आहेत. त्यानुसार हे » पान ४ वर



"त्यानंतर हे तारांगण सुरु करण्याची मागणी केली जात होती. त्यामुळे महापालिकेने यासाठी पुन्हा ज्या कंपनीने हे तारांगण तयार केले होते त्या कंपनीशी संपर्क साधला. त्यांच्याकडून या कामासाठी अधिकृतपणे नेमलेल्या संस्थेची माहिती महापालिकेला देण्यात आली. त्यानुसार, संबधित कंपनी या तारांगणाची यंत्रणा तपासणे, सॉफ्टवेअर तपासणे, हार्डवेअर तपासणे दुरूस्त करणे, या तारांगणासाठी नव्याने शो रचना करणे तसेच पुढील देखभाल दुरूस्ती करण्याचे काम देण्यात आले आहे."

— **डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त, पुणे


## प्रसिद्धीकरण

**प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्यातील पहिल्या दिवशी दैनिकाच्या प्रकाशकाने प्रकाशित करण्याचे प्रकाशक, मालक, मुद्रक बाबतचे प्रसिद्धीकरण**

**राष्ट्रसंचार**

दैनिक राष्ट्र संचार हे पत्र मालक प्रकाशक श्री. अनिरुद्ध बाळासाहेब बडवे हे पंढरी संचार मीडिया प्रायव्हेट लिमिटेड मालकी व प्रकाशकाच्या माध्यमातून भारतीय वृत्तपत्र पंजीकरण प्रमाणपत्राद्वारे प्रकाशित करीत आहे.

त्याचा रजिस्ट्रेशन न्यूज पेपर ऑफ इंडिया RNI Reg. No. MAHMAR/2023/89220 क्रमांक असा आहे .

**पत्ता:** गोविंद चेंबर्स , नळ स्टॉप , एरंडवणे , पुणे ४११ ००४

**मुद्रक:** राणे प्रकाशन प्रा. लि. स. नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रकाचे राष्ट्रीयत्व:** भारतीय

**पत्ता:** स. नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११ ०५८

मी श्री अनिरुद्ध बाळासाहेब बडवे, संचालक पंढरी संचार मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, दैनिक राष्ट्रसंचार प्रकाशक मालक मुद्रक बाबतीतील प्रसिद्धीकरण वरील प्रमाणे करीत असून माझ्या समजूती प्रमाणे ही सर्व माहिती पूर्ण सत्य असून शपथ पूर्वक जाहीर करीत आहे.

**अनिरुद्ध बाळासाहेब बडवे**
संचालक, पंढरी संचार मीडिया प्रायव्हेट लिमिटेड
मालक, प्रकाशक : दैनिक राष्ट्र संचार

# स्कूलबसमध्ये सुरक्षारक्षकांची 'करडी नजर'

## महापालिकेचा महत्वपूर्ण निर्णय, महिलांची नेमणूक करणार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या 'पीएमपीएमएल'च्या बसमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव महिला सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. तीन दिवसांपूर्वी स्वारगेट एस. टी स्थानकामध्ये तरुणीवर झालेल्या गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. याची अंमलबजावणी पुढील काही दिवसांमध्ये केली जाणार आहे.

पुणे महापालिकेच्या शाळेत बसने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसमध्ये महिला सुरक्षा रक्षक असणार आहे. शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या स्कूल बस, तसेच स्कूल व्हॅनमध्ये महिला सहाय्यक असतात, मात्र महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बसमध्ये महिला सुरक्षारक्षकांचा अभाव आहे. त्यामुळे महापालिकेने विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक व्हावी, यासाठी पीएमपीएलच्या बसमध्ये महिला सुरक्षा रक्षक नेमण्याच्या दृष्टीने पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे.

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची ने-आण करण्याचे काम पीएमपीएलच्या सुमारे २०० ते ३०० बसच्या माध्यमातून केले जाते. महिला सुरक्षारक्षकांसाठी महापालिका प्रशासनाकडून शिक्षण विभागाबरोबर चर्चा केल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी सांगितले.

पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये बस मधून विद्यार्थी-विद्यार्थिनी येत असतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या शिक्षण मंडळातील अधिकारी तसेच महापालिका प्रशासनातील विविध विभागातील अधिकाऱ्यांची याबाबत चर्चा देखील झाली आहे. त्यानंतर महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

> महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा महापालिकेचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या पीएमपीएमएल बसमध्ये महिला सुरक्षा रक्षक नेमल्या जाणार आहेत.
>
> **— पृथ्वीराज बी. पी.**
> अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा

# एसटी महामंडळात 'आयपीएस अधिकाऱ्यांची' नेमणूक करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट एसटी स्थानकात घडलेली घटना अत्यंत निंदनीय आहे. स्वारगेट डेपो घडलेल्या घटनेच्या निमित्ताने महिलांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. ह्या अनुषंगाने आजच्या बैठकीत त्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला असून येथील सुरक्षा कर्मचारी वाढविणे सोबतच एसटी महामंडळात एक सुरक्षा रक्षक कमिटी नेमून त्यात आयपीएस दर्जाचा सुरक्षा अधिकारी नेमणार असल्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

स्वारगेट येथे घडलेल्या महिला अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर राज्यमंत्री यांनी एसटी महामंडळ आणि पोलिस अधिकाऱ्यांची शनिवारी आढावा बैठक घेतली. यावेळी डीसीपी अमोल झेंडे, एसीपी वाहतूक अश्विनी राख, प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांच्यासह एसटी, पोलिस आणि आरटीओ विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, पूर्वी सारखे सुरक्षा दक्षता अधिकारी नव्याने नेमण्यात येतील. पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. स्वारगेट स्थानकात यापूर्वी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत त्यांची संख्या देखील आता वाढविण्यात येईल. महिला सुरक्षेच्या दृष्टीने ज्या काही उपाययोजना करण्याची गरज आहे त्या तत्काळ करणार असल्याचे सांगताना या प्रकरणाच्या ऑडिट मध्ये जे कोणी अधिकारी किंवा ठेकेदार दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करणार आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने आणलेल्या स्क्रॅप पॉलिसी नुसार ज्या बसेस स्क्रॅप करण्याची गरज आहे, त्या राज्यातील सर्व आगारातील बसेस येत्या १५ एप्रिल पर्यंत स्क्रॅप करणार असल्याचेही मिसाळ यांनी सांगितले.



> एसटी बसस्थानकाच्या आवारात तक्रार निवारण कक्ष, तक्रार नोंदवण्यासाठी एक टोल फ्री क्रमांक राज्यात दिला जाईल, तसेच खासगी बस चालकांची एसटी स्थानकात होणारी घुसखोरी रोखण्यासाठी देखील उपाययोजना आखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
>
> **— माधुरी मिसाळ**
> परिवहन राज्यमंत्री

# जागतिक अभियांत्रिक दिनानिमित्त कार्यक्रम



**पुणे :** इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), एआयएसएसएमएस पॉलिटेक्निक,आणि मराठी विज्ञान परिषद आयोजित जागतिक अभियांत्रिक दिनानिमित्त "शाश्वत विकास आणि अभियांत्रिकांचे योगदान" या विषयावर एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी संगणक व कृत्रिम बुद्धिमत्ता तंज्ञ, तसेच संगणक साक्षरता वृद्धीसाठी मराठी भाषेतून साठ पुस्तके लिहिणारे डॉ दीपक शिकारपूर हे प्रमुख पाहुणे तर ए आयएसएसएमएस, व्यवस्थापकीय समिती सदस्य धवल जितकर सन्माननीय सदस्य म्हणून उपस्थित राहणार आहेत. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी अभियंत्याची बुद्धिमत्ता व कौशल्य याचा वापर या कल्पनेवर आधारित मंगळवार, ४ मार्च रोजी ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), फिरोदिया हॉल, अभियंता भवन शिवाजी नगर ,पुणे येथे सायंकाळी ५ वाजता होणारा आहे.कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.



# विज्ञान दिनानिमित्त आवर्तसारणीची भव्य मांडणी

**पुणे :** न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माननीय उपशिक्षणाधिकारी प्रणिता कुमावत उपस्थित होत्या. विज्ञान उपकरण निर्मिती,बॅजेस स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, विज्ञान प्रश्न कोडे,रांगोळी स्पर्धा, स्केलेटन प्रतिकृती स्पर्धा,आयसर, तारांगण येथे क्षेत्रभेटी, विद्यार्थ्यांसाठी फिरती विज्ञान प्रयोगशाळा इत्यादी उपक्रम राबवण्यात आले. या स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.विज्ञान दिनानिमित्त मूलद्रव्यांच्या आवर्तसारणीची भव्य रांगोळी फरस बंद चौकात साकारण्यात आली.



# संकल्प स्कूलमध्ये विज्ञानदिन उत्साहात साजरा

**पुणे :** संकल्प प्रतिष्ठान संचालित, संकल्प इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, नऱ्हे येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.२८ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याच पार्श्वभूमीवर संकल्प स्कूलमध्ये विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयासंबंधी विविध वैज्ञानिक उपकरणे व मॉडेल्स तयार केली होती. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची गोडी, रुची निर्माण व्हावी यासाठी "विज्ञानाची धरावी कास" या धर्तीवर शाळेच्या संचालिका राधिका गिरमे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या व त्यांच्या या उपक्रमासाठी त्यांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहित केले. तसेच विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. यावेळी मुख्याध्यापक संदिप कुंदप उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान शिक्षिका चारुलता सूर्यवंशी, शुभांगी पुदे यांच्या वतीने करण्यात आले होते.

# नागपूरवरुन पुण्यात आणलेला गांजा पकडला

**पुणे :** नागपूरहून पुण्यात विक्रीसाठी गांजा घेऊन आलेल्या आंतरजिल्हा तस्करांना वाघोली पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून तब्बल ४ किलो ७७१ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

नागेश सुनिल लष्करे (वय २०), सौरभ तपासे (वय २२, रा. नागपूर), रिझवान इस्माईल शेख (वय ३९) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याबरोबरील एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. पोलीस उपनिरीक्षक वैजीनाथ केदार, सहायक पोलीस निरीक्षक अहिरे व त्यांचे सहकारी २६ फेब्रुवारी रोजी गस्त घालत होते. यावेळी पोलीस अंमलदार मोटे यांना मिळालेल्या बातमीवरुन पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख रुपयांचा ४ किलो ७७१ ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आले. त्यातील सौरभ तपासे याने नागपूर येथून गांजा घेऊन आला होता. त्या अगोदरच पोलिसांनी हा गांजा पकडला. ही कामगिरी पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड, सहायक पोलीस निरीक्षक विनायक आहिरे, पोलीस उपनिरीक्षक वैजीनाथ केदार, पोलीस उपनिरीक्षक सुवर्णा इंगळे, पोलीस अंमलदार कर्णवर, मोटे, माने, कोकरे, रोकडे, गायकवाड, वाघ, बोयणे, कुंभार, आव्हाळे यांनी केली आहे.

# शहरातील पर्यटन आणखी 'बहरणार'..!

## पेशवे पार्कसह चार तलावांचे होणार सुशोभीकरण; दोन कोटींचा खर्च अपेक्षित



**तलावांचे रुपडे पालटणार...!**

शहरातील पर्यटन अधिक बळकट करण्यासाठी महापालिका प्रशासनाने शहरातील तब्बल चार तलावांचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी दोन कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे; केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही कामे केली जाणार आहेत.

- तलावालगत असलेल्या उद्यानामध्ये लाकडाची बाके बसविणार
- पाण्याचे कारंजे उभारणार
- भिंतींचे रंगकाम केले जाणार
- पदपथ तयार केले जाणार
- तलावाला सीमाभिंत बांधणार
- तलावात कचरा टाकण्यास बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुण्याकडे केवळ देशातीलच नव्हे तर जगभरातील पर्यटक आकर्षित होत आहेत; आगामी काळात या पर्यटनाला आणखीनच 'बहर' येणार असून पर्यटकांना उल्हसित ठेवण्यासाठी पाच तलावांचे सुशोभीकरण करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठी तब्बल दोन कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार पुणे शहरातील कात्रज, पाषाण, पेशवे तसेच मॉडेल कॉलनी येथील तलावांचे सुशोभीकरण केले जाणार आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही कामे केली जाणार आहेत. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या निविदांना मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या वतीने दर वर्षी शहरातील जलपर्णी काढण्यासाठी खर्च केला जातो. तसेच, तलावांच्या स्वच्छतेसाठीदेखील खर्च होतो. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत महापालिकेला दोन कोटी रुपयांचा निधी तलावांच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेला मिळाला होता. त्यामधून शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने याच्या निविदा काढल्या होत्या.

पाषाण तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये, कात्रज तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये आणि मॉडेल कॉलनी तलावासाठी ४९ लाख ४२ हजार लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच, पेशवे तलावासाठी ४९ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. त्याला मान्यता देण्याचे प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले होते. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

या प्रकल्पात तलावाच्या परिसरात झाडे लावणे, काँक्रीटचे रस्ते तयार करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि तलावाभोवती जॉगिंग ट्रॅक बांधणे असे प्रस्तावित आहे. तलावांजवळ कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

ड्रेनेजमुळे पाणी दूषित होत असल्याने, तलाव स्वच्छ करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. २०१७ मध्ये, महापालिकेने कात्रज तलावात येणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या पाण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा तयार केली. शिवाय, महापालिकेकडून सध्या दररोज दोन दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधला जात आहे. पुणे शहर राहण्यासाठी सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हवेची गुणवत्ता ढासळत असताना या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे, असे या प्रस्तावांमध्ये म्हटले आहे.

# संत्रा महोत्सवात २२ लाख रुपयांची उलाढाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने कोथरुड येथे आयोजित केलेल्या 'संत्रा महोत्सवात' २२ लाख रुपयांची उलाढाल झाली. यात नागपूर व अमरावती येथील 30 शेतकरी सहभागी झाले होते. पणन मंडळाच्या या महोत्सवात मृग बहारातील चविला गोड संत्रा विक्रीला ठेवला गेला होता. सुमारे २१ टन संत्रा विक्री झाला असुन, साधारणपणे

२२ लाखाची उलाढाल महोत्सावात झाली. संत्र्यासोबत संत्र्याचा फ्रेश ज्युसही विक्रीसाठी उपलब्ध होता. सदर महोत्सवात साधारणपणे साईजनुसार ८० ते १२० रुपये प्रति किलो इतका भाव मिळाला. सदर संत्रा महोत्सवास भरघोस प्रतिसाद दिलेला असुन, असा महोत्सव

नियमीत भरविण्यात यावा व पुढिल संत्रा महोत्सवावेळी संत्र्यासोबत संत्रा मुल्यवर्धीत पदार्थ जसे की संत्रा बर्फी, जाम, ज्युस, कॅन्डी, संत्रा सालीपासून बनविण्यात आलेले साबण, सौदर्य

प्रसाधने इत्यादीसारखे पदार्थही महोत्सवात समाविष्ठ करावे, असे पुण्यातील ग्राहकांनी मागणी

केली. कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सुहास काळे, उमेश वाघ आणि आनंद शुक्ला यांनी महोत्सवाच्या आयोजनात महत्वाची भुमिका बजाविली.



# भारतातील विद्यार्थ्यांसाठी असलेली सर्वात मोठी रोबोटिक्स स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शाळा आणि ज्युनियर कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आयोजित भारतातील सर्वात मोठी रोबोटिक्स स्पर्धा 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया चॅम्पियनशिप २०२४-२५' चे उद्घाटन आज विश्वकर्मा विद्यापीठच्या वतीने श्री शिव छत्रपती क्रीडांगण, बॉक्सिंग स्टेडियम, म्हाळुंगे, पुणे येथे अत्यंत उत्साहात पार पडले. या ऐतिहासिक स्पर्धेत देशभरातून ६० संघ आणि कझाकस्तान, श्रीलंका, युएई येथून ६ आंतरराष्ट्रीय संघ सहभागी झाले आहेत.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी विश्वकर्मा विद्यापीठचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जाबडे, पद्मश्री प्रमोद कळे (पूर्व डायरेक्टर, इस्रो), Circanaचे विश्वनाथ शास्त्री आणि प्रगती चौहान, RTXचे अमित सावर्कर, बजाज ऑटोचे विकस साव्हनी, जॉन डिअरचे महेश मसूरकर, TMFचे सजीत चाकिंगल यांच्यासह विविध शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सिद्धार्थ जाबडे यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितले, "फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होणारे विद्यार्थी केवळ रोबोटिक्सच नाही, तर शालेय जीवनातही उत्कृष्टता साधतात. ही स्पर्धा त्यांना आत्मविश्वास, तांत्रिक ज्ञान आणि जीवन कौशल्ये मिळविण्याची संधी देतो. यावर्षीपासून विश्वकर्मा विद्यापीठ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णय घेतला आहे."




पुणे रोबोटिक्स स्पर्धा 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया चॅम्पियनशिप २०२४-२५' चे उद्घाटन शनिवारी विश्वकर्मा विद्यापीठच्या वतीने श्री शिव छत्रपती क्रीडांगण, बॉक्सिंग स्टेडियम, म्हाळुंगे, पुणे येथे अत्यंत उत्साहात पार पडले.

# कर्णकर्कश सायलेन्सरचा आव्वाज बंद, फिरवला रोडरोलर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रात्री अपरात्री फटाक्यासारख्या आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध कोंढवा पोलिसांनी कारवाई केली. बुलेट बसविण्यात आलेले सायलेन्सर पोलिसांनी जप्त केले. डांबरीकरणासाठी वापरल्या जाणारा रोड रोलर सायलेन्सरवर चालवून नष्ट करण्यात आले. पोलिसांनी या कारवाईत २० सायलेन्सर नष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून शहर, परिसरात भरधाव वेगाने बुलेट चालवून सायलेन्सरमधून फटाक्यासारखे आवाज काढण्यात येत असल्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. फटाक्यासारखा आवाज सायलेन्सरमधून निघत असल्याने त्याचा त्रास नागरिकांना विशेषत : ज्येष्ठांना होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. आठवड्यापूर्वी लोणी काळभोर भागात पोलिसांनी बुटेलचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले होते. दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने कर्णकर्कश आवाज काढणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी कोंढवा परिसरातील नागरिकांनी केली होती.

त्यानंतर कोंढवा पोलिसांनी २० बुलेटचालकांविरुद्ध कारवाई केली. कर्णकर्कश सायलेन्सर वापरल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलिसांनी बुलेटचे सायलेन्सर काढून जप्त केले. सायलेन्सरवर महापालिकेचा रोडरोलर चालवून नष्ट करण्यात आले. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, गुन्हे शाखेचे निरीक्षक रऊफ शेख आणि पथकाने ही कारवाई केली.

> बुलेट गाड्यांना कर्णकर्कश आवाज असणारे सायलेन्सर बसविण्यात येतात. अशा प्रकारच्या सायलेन्सरवर बंदी घालण्यात आली आहे. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध यापुढील काळात तीव्र कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **— डॉ. राजकुमार शिंदे,**
> पोलीस उपायुक्त,परिमंडल पाच

राष्ट्रसंचार रविवार, २ मार्च २०२५
विज्ञानवार्ता ३
विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर


# प्राणीही होतात 'टल्ली'



मद्यपान आरोग्यासाठी हानिकारक आहे; पण तरीही अनेक जण त्याच्या आहारी जातात. पण, एका संशोधनानुसार असे आढळून आले आहे की, माणूसच नाही, तर प्राणीदेखील नशा करतात. आफ्रिकेच्या जंगलातील याबाबतचा एक व्हिडीओ समोर आला आहे. आफ्रिकेच्या जंगलातून एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये जंगलातील प्राणी धुंद अवस्थेत पाहायला मिळाले. जंगलातील एका खास झाडाची फळे खाल्ल्यानंतर हे सर्व प्राणी नशेत टल्ली होतात, असे यात दिसून आले.

आफ्रिकेतील जंगलात आढळणाऱ्या मारुला वृक्षाची फळे खाऊन प्राण्यांना नशा होते. तिथे ही झाडे अगदी सहज आढळतात. याला दरवर्षी फळे येतात. ही फळे पुरेशी पिकल्यावर खाली पडू लागतात. जेव्हा जंगलातील प्राणी हे फळ खातात, तेव्हा हळूहळू त्यांना नशा चढते आणि सर्व धुंद असल्यासारखे वागू लागतात. याचा एक मजेदार व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत अनेक प्राणी झाडाची पिकलेली फळे खाताना दिसले. ते आरामात बसून फळे खात होते; मात्र काही वेळातच अनेकांना त्याची नशा झाली.

पोटभर फळे खाऊन जेव्हा ते चालण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांना सरळ चालता येत नाही. यासोबतच एकदा पूर्ण नशेत गेल्यानंतर थेट दुसऱ्या दिवशी त्यांना जाग आली, त्यावेळी देखील ते बरेच सुस्तावलेले दिसून आले. सदर फळांमध्ये असा कोणता अर्क होता, यावर संशोधन सुरू आहे. मात्र, त्यापूर्वी हा व्हिडीओ सोशल मीडियावर सातत्याने व्हायरल होत आला आहे. नेटिझन्सनी यावर अनेक मतमतांतरे नोंदवली आहेत. काहींच्या मते फळांमध्ये प्राण्यांना गुंगवणारा एखादा अंश असू शकतो, तर काहींनी असे चित्र जंगलात सातत्याने दिसून येत असेल, असे म्हटले आहे.



# ब्रेन स्कॅनिंगद्वारे मनोविकार उलगडणार

सध्याच्या काळात अनेक लोक मानसिक आजारांच्या विळख्यात अडकत आहेत. अशा आजारांचे योग्य निदान व उपचार महत्त्वाचे ठरतात. मेंदूचे स्कॅनिंग करून मानसिक आजारांचा शोध घेणे सहज शक्य असल्याचे एका संशोधनात स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे मेंदूसंबंधी अन्य आजारांचे निदान करणेही शक्य आहे.

या संशोधनाची माहिती 'न्यूरॉन' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली आहे. एमआयआर स्कॅनिंगद्वारे मेंदूतील महत्त्वाच्या भागातील प्राथमिक फरक ओळखणे सहजशक्य होते. मेंदूचा विकार नसलेल्यांना या आजारांपासून दूर ठेवणे शक्य आहे. मेंदूच्या स्कॅनिंगच्या माध्यमातून मेंदूसंबंधी विकार दूर करण्याकडे पहिले पाऊल पडल्याचे वॉशिंग्टन वैद्यकीय विद्यापीठाचे प्राध्यापक स्टीव्हन पीटरसन यांनी सांगितले. स्कॅनिंगसाठी आम्ही एमआरआय चाचणीचा विकास केला तसेच या चाचणीतून नेमके काय साध्य करायचे याचा विचार करणे आवश्यक होते. मात्र या चाचणीद्वारे वैद्यकीय चाचणी क्षेत्रासाठी नवी कवाडे खुली झाली आहेत. या संशोधनासाठी संशोधकांनी दहा तासांत नऊ नागरिकांच्या मेंदूचे स्कॅनिंग केले. प्रत्येकाची एक तास तपासणी केल्यानंतर संशोधकांनी वरील निदान केले. चाचणीच्या आधी व्यक्तीचे मानसिक आजार, क्षमता, वाचनाची क्षमता आणि अन्य गुणांचा विचार करण्यात आला होता. चाचणीत व्यक्तीच्या मेंदूच्या विविध भागांची, बदललेल्या घटकांची माहिती होते. त्याद्वारेच रुग्णाचा आजार शोधणेही शक्य असल्याचा शोध घेण्यात आला.

# महासागरांची महती

पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१ टक्के भाग पाण्यानेच व्यापलेला आहे. त्यामध्ये महासागरांचा हिस्सा सर्वात मोठा आहे. एका संशोधनानुसार जगातील महासागर हे केवळ सागरी जीवांसाठीच नाही, तर मानवी आरोग्य आणि कल्याणासाठी देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पाणी, हवा याप्रमाणेच महासागर आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत. 'वनअर्थ'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या नव्या अभ्यासानुसार, मानवी आरोग्य आणि कल्याणासाठीचे महासागराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर, हार्वर्ड इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ आणि ड्यूक युनिव्हर्सिटी मरीन लॅबोरेटरी यांनी केलेल्या या अभ्यासातून सागरी संरक्षित क्षेत्र निसर्ग आणि मानव या दोघांसाठीही कशी फायदेशीर ठरू शकतात, याची माहिती मिळते. रिपोर्टमध्ये २३४ सागरी संरक्षित क्षेत्रांचे विश्लेषण करण्यात आले. त्यापैकी ६० टक्के क्षेत्रांमध्ये जैवविविधता आणि मानवी कल्याणात सकारात्मक बदल दिसून आले. याचा अर्थ सागरी संरक्षित क्षेत्रांचा विस्तार केल्यास सागरी पर्यावरण अधिक बळकट तर होऊ शकतेच, शिवाय आजूबाजूच्या किनारपट्टीच्या नागरिकांसाठीही फायदेशीर ठरू शकते. अशा भागात जैवविविधता संवर्धनाबरोबरच शाश्वत वापराला परवानगी दिली जाते. उदाहरणार्थ, सागरी पर्यावरणाला हानी न पोहोचवणाऱ्या काही मासेमारी पद्धतींना येथे परवानगी आहे. महासागरांमध्ये मानवी आरोग्यासाठी आवश्यक असणारे भरपूर पोषक घटक असतात. आपले खंड आणि बेटे विविध जलीय स्रोतांनी वेढलेले आहेत. येथून जीवनसत्त्वे, खनिजे आणि फॅटी ॲसिड असलेले पदार्थ मिळतात. जलीय पदार्थांमधील ही पोषक द्रव्ये शरीरात सहज शोषली जातात आणि पौष्टिकदृष्ट्या कमकुवत लोकांपर्यंत पोहोचवल्यास कुपोषणाचा मुकाबला करण्यास मदत होते. वाढत्या लोकसंख्येबरोबर जलचरांच्या अन्नाची मागणी



वाढत असल्याने समुद्रावरील ताण वाढत आहे. संयुक्त राष्ट्र पुरस्कृत जैवविविधता योजनेअंतर्गत २०३० पर्यंत जगातील ३० टक्के जमीन आणि महासागरांचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत महासागरांचे संवर्धन महत्त्वाचे आहे. कारण, मानवी जीवन महासागरांच्या निरोगी अवस्थेवर अवलंबून असते. सागरी संरक्षित क्षेत्रांचा विस्तार मानवी कल्याणासाठी किती आवश्यक असू शकतो हे दर्शविणारा हा अभ्यास या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. सागरी संवर्धन शास्त्रज्ञ डॅनियल वियाना यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १९७३ पासून सागरी संरक्षित क्षेत्रांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला. सागरी संरक्षित क्षेत्रांचा आणखी एक फायदा म्हणजे मासे व इतर सागरी जीवांची संख्या वाढविण्यास ते उपयुक्त ठरतात. मात्र, सागरी संरक्षित क्षेत्रातून कुपोषणाची समस्या सोडविणे आव्हानात्मक ठरणार आहे. सागरी संरक्षित क्षेत्रात मानवी हस्तक्षेप मर्यादित केल्यास सागरी जीवांची लोकसंख्या आणि सागरी आरोग्य सुधारू शकते, असे या अभ्यासात सुचविण्यात आले आहे.

# जुन्या केकची किंमत दोन लाख?

केक हा नाशवंत खाद्यपदार्थ आहे, ही बाब आपल्या सर्वांना माहितीच असेल; मात्र सध्या ८० वर्षांपूर्वीचा एक केक चर्चेत आला आहे. जवळपास ८० वर्षे जुना असलेला हा केक लाखो रुपयांना विकला गेला आहे. हा केक ब्रिटनची महाराणी एलिझाबेथ द्वितीय आणि प्रिन्स फिलिप यांच्याशी संबंधित आहे. या केकची लाखो रुपयांना खरेदी-विक्री का झाली, तो खाण्यायोग्य नाही तरीही त्याला लाखो रुपये किंमत का मिळाली, असे अनेक प्रश्न मनात आल्याशिवाय राहणार नाहीत.

२० नोव्हेंबर १९४७ रोजी ब्रिटनची महाराणी एलिझाबेथ द्वितीय आणि प्रिन्स फिलिप यांचा विवाह झाला होता. हा केक त्यांच्याच लग्नात सर्व्ह करण्यात आला होता. हा केक जवळपास आठ दशके सुरक्षित ठेवण्यात आला. त्यावर तत्कालीन राजकुमारी एलिझाबेथची चांदीची प्रतिमादेखील कोरलेली होती. आता स्कॉटलंडमध्ये या केकचा लिलाव करण्यात आला होता. एलिझाबेथ द्वितीय आणि फिलिप यांच्या लग्नाच्या वेळी कापलेल्या केकचा हा तुकडा आहे. या दोघांच्या लग्नसोहळ्यात नऊ फूट उंच आणि २०० किलोग्रॅमपेक्षा जास्त वजनाचा



केक तयार करण्यात आला होता. सध्या लाखो रुपये किमतीला विकला गेलेला केक सुरक्षित राहावा यासाठी एका बॉक्समध्ये ठेवण्यात आला होता. हा बॉक्स बकिंगहॅम पॅलेसमधून एडिनबर्ग इथल्या होलीरूड हाऊसमध्ये घरकाम करणाऱ्या मेरियन पोल्सन यांना राणीने पाठवला होता. भव्य लग्नसोहळ्यानंतर भेटवस्तूच्या रूपात मेरियन यांना हा केकचा तुकडा पाठवण्यात आला होता. याच तुकड्याला आता २.३६ लाख रुपये (२,८०० डॉलर्स) किंमत मिळाली आहे.

एलिझाबेथ द्वितीय आणि फिलिप यांच्या सोहळ्यासाठी तयार करण्यात आलेल्या केकचे दोन हजारांहून अधिक तुकडे करण्यात आले होते. उर्वरित केक धर्मादाय संस्था आणि इतर संस्थांना पाठवण्यात आला होता. याच केकचा एक तुकडा प्रिन्स चार्ल्सच्या नामकरणविधीसाठी (बाप्तिस्मा) बाजूला ठेवण्यात आला होता. राजघराण्यातल्या शाही केकची विक्री होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेक दशकांपूर्वीच्या शाही केकचे तुकडे विकले गेले आहेत. २०१३मध्ये अशाच एका वेडिंग केकच्या तुकड्याला २३०० डॉलर्स (सुमारे २ लाख रुपये) किंमत मिळाली होती. किंग चार्ल्स आणि प्रिन्सेस डायना यांच्या लग्नात सर्व्ह केलेल्या केकचा देखील २०२१ साली लिलाव करण्यात आला होता. त्याला २,५६५ डॉलर्स (२.२५ लाख रुपये) किंमत मिळाली होती.



# इथे नाही एकही भारतीय...!

वेगवेगळ्या कारणांमुळे जगभरात भारतीय लोक पोहोचलेले आहेत. अनेक देशांमध्ये तर भारतीय लोक आपले कर्तृत्वही गाजवत आहेत. मोठ्या कंपन्यांचे सीईओपासून ते इतर महत्त्वाच्या पदांवर भारतीय लोकांचा दबदबा दिसतो. पण, तुम्हाला माहीत आहे का, की अनेक देशांमध्ये भारतीयांची उपस्थिती खूपच कमी आहे. एक देश तर असा आहे जिथे सामान्य भारतीय माणूस आढळणारही नाही. हा देश म्हणजे उत्तर कोरिया. उत्तर कोरियात कठोर नियम आहेत. हा एक हुकूमशाही शासन असलेला देश आहे. त्यामुळे येथे बाहेरील देशांतून येणाऱ्या लोकांवर कडक नजर ठेवली जाते. येथील सरकार परदेशी नागरिक आणि स्थलांतरितांसाठी खूप कठोर नियम बनवते, ज्यामुळे इतर देशांतील लोक येथे स्थायिक होण्यासाठी किंवा काम करण्यासाठी येऊ शकत नाहीत.

उत्तर कोरियामध्ये भारतीय समुदाय आढळणार नाही. भारत आणि उत्तर कोरियाचे राजनैतिक संबंध असले, तरी त्यांच्यात सांस्कृतिक किंवा राजकीय संपर्क फारच कमी आहे. येथे भारतीयांना नोकरी किंवा इतर कारणांसाठी जाणे देखील अवघड आहे. कारण उत्तर कोरियामध्ये आर्थिक संधी खूप मर्यादित आहेत. महत्त्वाचे म्हणजे इथे कठोर व्यवस्था असल्यामुळे दुसऱ्या देशांतील लोकांना येथे स्थायिक होणे कठीण जाते. उत्तर कोरियामध्ये इंटरनेट आणि सोशल मीडियावर देखील कठोर निर्बंध आहेत. ज्यामुळे बाहेरील देशांतील लोकांना तेथे राहणे आणखी कठीण झाले आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे उत्तर कोरियाचे सरकार परदेशी नागरिकांच्या हालचालींवर कडक नियंत्रण ठेवते असते. पर्यटकांनाही तेथे नेहमी गाईडसोबतच राहावे लागते. पर्यटकांच्या प्रत्येक हालचालींवर येथील व्यवस्था बारीक लक्ष ठेवून असते. त्यामुळे भारतीयांसह इतर बहुतांश देशांतील नागरिकांना तेथे जाणे अवघड झाले आहे. येथे कठोर राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती आहे. ज्यामुळे भारतीयांना तेथे राहणे जवळजवळ अशक्य आहे.

# न्याहारी चुकवताय? मग हे वाचा

सकाळची न्याहारी राजासारखी करावी, अशी म्हण प्रचलित आहे. सकाळची न्याहारी पोटभर केल्याने अनेक फायदे आरोग्याला होतात. त्यातच न्याहारी




टाळणाऱ्या लोकांना लठ्ठपणाचा धोका असून त्यांचे पोट सुटण्याचीही शक्यता असल्याचा दावा एका अभ्यासात करण्यात आलेला आहे.

जे लोक सकाळी न्याहारी करणे टाळतात, त्यांतील २६.७ टक्के लोकांमध्ये लठ्ठपणा आढळून आला असून जे लोक नियमित न्याहारी करतात, त्यांच्यामध्ये हे प्रमाण १०.९ टक्के एवढे असल्याचे अमेरिकेतील मायो चिकित्सालयातील संशोधकांना आढळले. त्याचप्रमाणे कधीही न्याहारी न करणाऱ्या लोकांनी मागील काही वर्षांत त्यांच्या वजनात सर्वाधिक वाढ झाल्याची माहिती दिल्याचे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. अनियमित न्याहारी करणे हे वजन वाढणे आणि लठ्ठपणाशी संबंधित असल्याचे कधीच न्याहारी न करणाऱ्यांमधील लठ्ठपणाच्या प्रमाणामुळे अधिक स्पष्ट झाले आहेत, असे संशोधकांनी सांगितले. अभ्यासासाठी संशोधकांनी ३४७ लोकांच्या न्याहारीच्या सवयीचे २००५ पासून २०१७ पर्यंत विश्लेषण केले. यामध्ये सहभागी झालेले लोक १८ ते ८७ वयोगटातील होते. या अभ्यासात सहभागी झालेल्यांची उंची, वजन, कमरेचा आकार आदी माहिती घेण्यात आली होती. जे लोक न्याहारी टाळतात, त्यांच्या कमरेने सरासरी माप ९७.५ सेमी असून हे नियमित न्याहारी करणाऱ्या लोकांच्या तुलनेने ९.८ सेमी जास्त होती.

# ब्रेन एजिंग रोखणे शक्य

सातत्याने सक्रिय राहण्याचा सल्ला नेहमी दिला जातो आणि त्यामागे शास्त्रीय कारण देखील आहे. जसे आपले वय वाढत असते, तसे मेंदूचे वयही वाढत असते. ब्रेन एजिंग ही एक अशी संज्ञा आहे, जी न्यूरो सायन्समध्ये अनन्यसाधारण महत्त्वाची मानली जाते. यावर नवनवी संशोधने देखील होत आली आहेत. अशाच एका संशोधनात रोज आपण नवनव्या बाबी आत्मसात करण्यावर भर दिला, तर ब्रेन एजिंग रोखता येते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.



ब्रेन एजिंग ही एक प्राकृतिक प्रक्रिया आहे. ती साधारणपणे २८ ते ३० वर्षांपासून सुरू होते. यामध्ये मेंदूचे कॉग्निटिव्ह फंक्शन अर्थात स्मृती व एकाग्रता यावर हळूहळू परिणाम होऊ लागतो. आता यातील प्रत्येकाचा अनुभव वेगळा असतो. मात्र, शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, आपल्या जीवनशैलीचा प्रभाव ब्रेन एजिंगवर हमखास पडतो. यामध्ये आपल्या मेंदूतील न्यूरॉन, प्लॅस्टिसिटी कमी होत जाते. यामुळे तणाव वाढत राहतो. ब्रेन प्रोसेसिंगचा वेग आणि व्यक्तीची समस्या निकालात काढण्याची क्षमतादेखील कमी होत जाते. ब्रेन एजिंगमुळे अल्झायमर, डिमेंशिया व पार्किन्सनसारख्या स्मृतीशी संबंधित आजार सुरू होतात.

ऑनलाईन जर्नल न्युरॉलॉजीमध्ये प्रकाशित एका संशोधनानुसार, ज्या लोकांना झोपेशी संबंधित समस्या होत्या, त्यांच्या ब्रेन एजिंगचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमाण अनेक मार्गांनी कमी करता येते, असे या संशोधकांचे मत आहे. न्युरो सायंटिस्ट डॉ. लीसा मॉस्कोनी यांच्या मतानुसार, जेनेटिक्स, लाईफस्टाईल याचा ब्रेन एजिंगवर बराच फरक पडतो. यामुळे ब्रेन एजिंग रोखायचे असेल तर रोज काही ना काही नवे शिकण्यावर, नवे आत्मसात करण्यावर भर द्यायला हवा. यामुळे न्यूरल कनेक्शन्सचे प्रमाण वाढते आणि यामुळे मेंदू अधिक सक्रिय राहतो. नवी भाषा शिकणे किंवा नवे वाद्य शिकणे अवघड असते; पण असे केल्यास आपण आपल्या मेंदूला अधिक चालना देऊ शकतो.

आपण सतत तणावात राहात असल्यास यामुळे ब्रेन एजिंग आणखी वेगाने वाढत राहते, असाही निष्कर्ष यात नोंदवला गेला आहे. संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा परिस्थितीत आपल्या दैनंदिनीत ध्यान व सखोल श्वासावर भर असेल, तर त्याची उत्तम फलिते दिसून येतात. कम्फर्ट झोनमधून बाहेर येण्याची सवय असल्यास यामुळे आपण मानसिक व शारीरिकदृष्ट्या अधिक तंदुरुस्त असतो आणि अशा व्यक्तींना मेडिकल सायन्समध्ये सुपरएजर्स असे म्हटले जाते. अशा व्यक्तींच्या मेंदूत सेल लॉसही कमी असतो आणि त्यांची एखादी समस्या निकालात काढण्याची क्षमता अधिक सरस असते. सुपरएजर्स व्यक्तींचे नवनवे विषय अभ्यासण्यावर अधिक भर असतो. एखादे जटिल गणित सोडवणे, कोडे सोडवणे, आर्टिकल वाचणे किंवा एखादी नवी भाषा शिकणे यात त्यांचा हातखंडा असतो.

# जेजुरीची ग्रामदेवता जानाईदेवी पालखी प्रस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



जेजुरी नगरीची ग्राम दैवता जानाई देवीचा पालखी सोहळा सातारा जिल्ह्यातील निवकने कडे मार्गस्थ होताना.

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची जागृत ग्रामदेवता आणि हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या जानाई देवीचा पायी पालखी सोहळा जेजुरीतून अतिशय उत्साहात सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील निवकनेकडे आज दि.1 रोजी सायंकाळी मार्गस्थ झाला.

जानाई देवींचा पालखी सोहळ्याला महाशिवरात्री दिवशी प्रारंभ झाला. जानाई पालखी सोहळ्याचे मुख्य मानकरी नागनाथ झगडे यांच्या निवासातून देवीची पालखी काढण्यात आली. जेजुरी गडावर खंडोबा देवाची भेट घेवून शहरातून मिरवणूक काढून पालखी मेंडके वाड्यात ठेवण्यात आली.येथे चार दिवस देवीचा जागर भजन कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. शनिवार दि 1 रोजी सकाळी देवीचे मानकरी व ग्रामस्थांनी देवींची महापूजा,अभिषेक केला. दुपारी साडे तीन वाजता मेंडके वाड्यातून वाजत गाजत पालखी सोहळा सुरु झाला. ग्रामस्थांनी सडा रांगोळी घालून सोहळ्याचे औक्षण केले. त्यांनतर सुमारे चार किलो मीटर हजारो भाविक पालखी सोहळ्या बरोबर पायी शिवखिंडीत आले. शिवखिंडीत देवीची परडी पूजन व समाज आरती झाली .परडी पूजना नंतर जानाई देवी पालखी सोहळा निवकनेकडे मार्गस्थ झाला. दि.1 रोजी पालखी सोहळ्याचा मुक्काम कामठवाडी येथे असून दि 2 रोजी नीरा नदीवर शाही स्नान होवून सालपे येथे मुक्काम,दि 3 रोजी वडूथ आंबा दि.4 रोजी माहुली येथे अभिषेक कृष्णा नदीचे ओटी भरण,परडी पूजन व मुक्काम,दि 5 रोजी तारळे मुक्काम,दि 6 रोजी कावदरा येथे निसर्ग पूजन होवून सोहळा निवकने येथे पोहोचणार आहे. मंगळावर दि.7 रोजी मुख्य यात्रेदिवशी क्षेत्र धारेश्वर येथे देवी स्नान निवकने येथे मुख्य यात्रेनिमित्त महापूजा अभिषेक व सुमारे पन्नास हजार भाविकांना महाप्रसाद , छबिना आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दि 8 रोजी देवीचा चौक फुटून यात्रेची सांगता होवून परतीच्या प्रवासाला सुरुवात होणार आहे.

या पालखी सोहळ्याचे नियोजन श्री,जानाईदेवी पालखी पदयात्रा अन्नदान सेवा ट्रस्ट तसेच जानाईभक्त नागू माळी ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. या पायी सोहळ्यात सहभागी झालेल्या भाविकांना अन्नदान नाष्टा,पाणी आरोग्य सुविधा ट्रस्टच्या वतीने पुरविण्यात आल्याचे श्री जानाई देवी पालखी सोहळ्याचे शिवाजी कुतवळ,तसेच जानाई भक्त नागू माळी ट्रस्टचे प्रमुख नागनाथ झगडे यांनी सांगितले.

या पालखी पदयात्रा सोहळ्यासाठी जेजुरी शहरातील शेकडो तरुण ,महिला ग्रामस्थ सहभागी झाले आहेत.नव्यानेच जेजुरीत जानाई देवीचे मंदिर,नवीन मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना तसेच कलशारोहण सोहळा झाल्याने या सोहळ्यासाठी ग्रामस्थांचा मोठा उत्साह पाहण्यास मिळाला.

## ग्रामस्थांनी गावामध्ये रात्रगस्त सुरु करावी : दिपरतन गायकवाड



शिक्रापूर ता. शिरुर येथे पोलीस पाटील यांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड.

**शिक्रापूर :** गावामध्ये होणाऱ्या चोऱ्यांसह आदी घटना टाळण्यासाठी पोलीस पाटलांनी नागरिकांच्या मदतीने आपल्या गावामध्ये रात्रगस्त सुरु करत गावामध्ये सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवण्यावर भर द्यावा असे आवाहन पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले आहे. शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील यांच्या बैठकीत बोलताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड बोलत होते, याप्रसंगी पोलीस पाटील पांडुरंग नरके, कृष्णा गाजरे, राजेश गायकवाड, जयसिंग भंडारे, दत्ता माने, जालिंदर पवार, आत्माराम डफळ, सतीश गावडे, प्रकाश करपे, महिला पोलीस पाटील सोनाली वाजे, वंदना साबळे, वर्षा थिटे, चित्रा इंगवले यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान यावेळी बोलताना पोलीस पाटलांनी गावातील घडामोडीवर लक्ष ठेवून काही संशयास्पद आढळून आल्यास पोलिसांना कळवावे आणि ज्या गावामध्ये ग्राम सुरक्षा यंत्रणा बंद असेल त्यांनी यंत्रणा कार्यन्वित करुन घ्यावी असे आवाहन देखील पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले आहे.

## नादुरुस्त लालपरीमुळे शैक्षणिक सहलीचा बट्ट्याबोळ

**सासवड :** शिवरी (ता.पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शैक्षाणिक सहल २५ फेब्रुवारी रोजी वाई,पाचगणी,महाबळेश्वर,प्रतापगड येथे गेली होती.सहलीसाठी सासवड आगाराने सीएनजीची लाल परी एसटी उपलब्ध करुन दिली होती. माञ सकाळी ७.४५ ते १०.०० वाजेपर्यंत म्हणजे २ तास १५ मि. सदर एसटी वाई येथे बंद पडली. वाई बसस्थानकातून दुसऱ्या बसची मागणी केली माञ दुसरी एसटी मिळण्याऐवजी सदर एसटी बस तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त करुन देण्यात आली. याच एसटीने पुढील प्रवास सुरु झाला.प्रतापगडवरुन महाबळेश्वरकडून परतीच्या मार्गावर आंबेनळी घाटात अवघड वळणावर चढणीला दु.३ वा.एसटी पुन्हा बंद पडली. इ.२ री ते ४ थी च्या ६० विद्यार्थ्यांना भर दुपारी कडक उन्हात जीवमुठीत धरुन ताटकळत उभे राहावे लागले. घाटात मोबाईलला रेंज नव्हती. त्यामुळे वरिष्ठ व लोकप्रतिनिधींशी संपर्क होत नव्हता.सुमारे अडीच तास घाटात अवघड वळणावर भर उन्हात सर्व विद्यार्थी व शिक्षक उभे राहिल्यानंतर सुदैवाने सायं.५.२३ वा. महाबळेश्वरला नियमित जाणारी प्रवासी एसटी मिळाली.सर्व मुले व शिक्षक प्रवासी एसटीमध्ये गर्दीने उभी राहून १३८६ रुपये तिकिट काढून महाबळेश्वरला पोहोचले. तोपर्यंत नादुरुस्त एसटी दुरुस्त करण्यासाठी महाबळेश्वर आगारातून बस दुरुस्ती करणारे कामगार सदर ठिकाणी गेले. सायं ७ वा.पर्यंत महाबळेश्वर आगारात नादुरुस्त एसटी आणली. सदर ना दुरुस्त एसटीच घेवून जाण्यासाठी महाबळेश्वर आगारातून आग्रह होता.

# निमगाव म्हाळुंगी-कासारी रस्ता खुला

## परिसरातील सुमारे दोनशे शेतकऱ्यांना होणार रस्त्याचा फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील शेजारील कासारी या दोन्ही गावांच्या सीमेवरील अंदाजे पाच किलोमीटर अंतर असलेला शिवरस्ता अनेक वर्षांपासुन अतिक्रमण झाल्याने बंद झालेला असताना तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या माध्यमातून खुला झाल्याने परीसरातील सुमारे दोनशे शेतकऱ्यांना या रस्त्याचा फायदा होणार आहे.

निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील शेजारील कासारी या दोन्ही गावांच्या सीमेवरील शिवरस्ता बंद असल्याने तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय शंभर दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत सदर बंद शिवरस्ता दोन किलोमीटर अंतरावर रस्ता खुला करण्यात आला असून लवकरच तीन किलोमीटर रस्ता खुला करण्यात येणार असल्याने सदर शिवरस्ता खुला झाल्याने दोन्ही गावातील अनेक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. सदर अतिक्रमित व बंद पडलेला शिवरस्ता खुला करण्यासाठी तळेगाव ढमढेरे मंडलाधिकारी माधुरी बागले, रांजणगाव गणपती मंडलाधिकारी स्वाती तावरे, निमगाव म्हाळुंगीचे ग्राम महसूल अधिकारी आबासाहेब रूके, कासारी ग्राम महसूल अधिकारी संतोष पोटावळे, निमगाव म्हाळुंगीचे तंटामुक्ती अध्यक्ष संतोष करपे, पोलीस पाटील किरण काळे, कृषी सहाय्यक जयश्री रासकर, ग्रामविकास अधिकारी गुलाब नवले, ग्रामपंचायत सदस्य अश्विनी लांडगे, कासारीचे माजी उपसरपंच किरण रासकर, पोलीस पाटील रूपाली भुजबळ, तंटामुक्ती अध्यक्ष बबन भुजबळ, ग्रामविकास अधिकारी वसंत पवार यांसह दोन्ही गावच्या ग्रामस्तरीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व शेतकरी उपस्थित होते. गेली २५ वर्षापासून निमगाव म्हाळुंगी ते कासारी शिवरस्ता बंद असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेती पिकविणे अडचणीचे होते. आता माञ हा शिवरस्ता खुला झाल्याने परिसरातील सुमारे दोनशे २०० शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर व कासारी या दोन्ही गावांचा शिवरस्ता सुरु करताना प्रशासकीय अधिकारी व आदी.

## धानोरेच्या येवले परिवाराने जागवल्या वडिलांच्या स्मृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** धानोरे ता. शिरुर येथील केरबा येवले पाटील यांचे नुकतेच निधन झालेले असताना त्यांच्या दशक्रियादिनी त्यांच्या मुलांनी वडिलांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी स्मशानभूमीत वृक्षारोपण करत ओटा बांधून विविध धार्मिक व सामाजिक कार्याला हजारोंची देणगी देत आपल्या वडिलांच्या स्मृती जागवल्या आहे.

त्यांच्या हरिष येवले पाटील व आण्णासाहेब येवले पाटील या दोघा मुलांनी आपल्या वडिलांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी स्मशानभूमी परिसरात मोठ्या देशी झाडांचे वृक्षारोपण करत दशक्रिया विधी ओटा बांधून ग्रामदैवत घनोबा महाराज प्रसारिक दिंडी धर्मशाळासाठी एक्कावण हजार, पेरणे प्रसारिक दिंडी धर्मशाळा साठी पंचवीस हजार, श्री संत निळोबाराय दिंडी विठ्ठलवाडी साठी अकरा हजार, घनोबा माध्यमिक विद्यालय धानोरे - दरेकरवाडी साठी पंचवीस हजार, अंगणवाडी धानोरे साठी अकरा हजार, जिल्हा परिषद शाळा धानोरे साठी पंचवीस हजार, ग्रामपंचायत कार्यालय धानोरे साठी अकरा हजार रुपयांची देणगी देत आपल्या वडिलांच्या स्मृती जिवंत ठेवल्या, याप्रसंगी माजी आमदार अशोक पवार, जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष नाथा शेवाळे, युवक प्रदेशाध्यक्ष संग्राम शेवाळे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष नवनाथ कांबळे, भाजपा किसान आघाडीचे प्रदेश सचिव जयेश शिंदे, माजी सभापती सुभाष उमाप, आनंदा हरगुडे, माजी जिल्हा परिषद सदस्य बंडोपंत नवले, पंचायत समिती सदस्या अर्चना भोसुरे, रामदास धनवटे, रवी काळे, दत्ता हरगुडे, पंडित दरेकर, विक्रम पाचुंदकर, माजी सरपंच भरत भोसुरे, राहुल गवारे, आबासाहेब गव्हाणे, सोपान गवारे, दादासाहेब रणसिंग, महेश ढमढेरे, समाजसेवक संपत गाडे, राहुल करपे, रोहित खैरे यांसह आदी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## वाल्मिक हाच मास्टरमाइंड

२९ नोव्हेंबर रोजी सुदर्शनच्या फोनवरूनच वाल्मिक कराडने खंडणीची मागणी केली होती. त्यानंतर सहा डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचा सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि सांगळे याच्याशी वाद झाला होता. ही माहिती आता पाच गोपनीय साक्षीदारांच्या बाबानंतर कराडविरुद्ध पुरावे मिळाले आहेत. त्यामुळे आता या प्रकरणांमध्ये वाल्मिक कराड हाच प्रमुख सूत्रधार असल्याचे स्पष्ट झालं आहे. गेल्या प्रत्येक दिवसांपासून खंडणी ॲट्रॉसिटी आणि हत्या या प्रकरणावरून अवघा महाराष्ट्रात राज्याचे राजकारण ढवळून निघालं आहे. त्यामुळे आरोपपत्रामध्ये तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, संतोष देशमुख यांना सुदर्शन घुले मारहाण करतानाचा व्हिडिओ सुद्धा सीआयडीच्या हाती लागला आहे.

सोमवार पर्यंत मुंडेंच्या राजीनामा नसेल तर रान पेटवू

वाल्मिक कराड हा मास्टरमाइंड असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अंजनी दमानिया यांनी पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. यामध्ये राजकीय हस्तक्षेप आहे मुंडे यांचा स्पष्ट सहभाग आहे सोमवार पर्यंत त्यांचा राजीनामाचा मिळाला नाही तर आम्ही रान पेटवू असा इशारा त्यांनी दिला.

राज्यात राजकीय दहशत असावी तरी किती? हे यातून दिसून आले आहे. किंबहुना या प्रकरणात जर कोणी म्हणेल की यात मंत्री धनंजय मुंडे यांचा सहभाग नव्हता, तर ते मी कधीही माणूच शकतं नाही.

## संजय राऊतांकडून...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे. ते नाशिक येथे बोलत होते.

माणिकराव कोकाटे हे कायद्याने अपात्र ठरलेले आहेत. सध्या मंत्रीपद वाचवण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. नियम आणि कायदा पाहिला तर २४ तासात सुनील केदार यांची आमदारकी गेलीय. उत्तर प्रदेशच्या विधानसभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांचेही तेच झालं. मात्र माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणात स्वतःचा बचाव करण्यासाठी संधी दिली जाते. असे असले तरी अद्यापही आमचा न्यायदेवतेवर विश्वास आहे. हे प्रकरण न्यायालयात सुरू असून न्यायदेवता यांना सोडणार नाही अशी आम्हाला खात्री असल्याचेही खासदार संजय राऊत म्हणाले.

## फरार कोरटकरांचा अद्यापि शोध सुरू

दावा केला होता. यानंतर त्यांनी कोल्हापूर पोलिसात तक्रार दिली होती. ही घटना उघडकीस आली तेव्हा प्रशांत कोरटकरांनी तो आवाज आपला नसल्याचं म्हटलं होतं. मात्र, त्यानंतर ते फरार झाले आहेत. 24 फेब्रुवारीच्या रात्री प्रशांत कोरटकर नावाने इंद्रजीत सावंत यांना धमकीला फोन आला. सावंत यांनी 25 फेब्रुवारीच्या सकाळी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्याला प्रशांत कोरटकरनं धमकी दिल्याचा दावा केला. यासोबत ऑडिओ क्लीप देखील शेअर केली. सोशल मीडियावर ऑडिओ क्लिप व्हायरल होताच प्रशांत कोरडकर यांना राज्यभरातून फोन यायला सुरुवात झाली. सकाळी मुलीला परीक्षा केंद्रावर सोडायला जात असताना प्रशांत कोरटकर यांनी मीडियाशी बोलून तो आवाज आपला नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना फोन करून आपल्याला धमकी येत असल्याचे सांगत सुरक्षेची मागणी केली. खबरदारी म्हणून नागपूर पोलिसांनी प्रशांत कोरटकर यांच्या मनीषनगर येथील घरावर पोलिसांचा बंदोबस्त लावला.

## ज्येष्ठ लेखिका...

स्मशानभूमीत कोणतेही धार्मिक विधी न करता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पुत्र व इंग्लंडमधील सुप्रसिद्ध उद्योजक तुषार प्रभू, लंडनमधील अभियंते हर्षवर्धन ऊर्फ आशू प्रभू, कन्या ॲड. वर्षा ऊर्फ रेवती प्रभू-काळे, जावई राहुल प्रभाकर काळे तसेच सुना व नातवंडे असा परिवार आहे.

मीनाताईंचे वडील खडकी कॅन्टोन्मेंट कार्यालयात कार्यरत होते

## आ. सावंत यांना इंजेक्शन

बातम्या समोर आल्या आहेत. कावळ्यांमध्ये बर्ड फ्लू आढळला असला तरी कोणत्याही व्यक्तीला या आजाराची लागण झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरू नये. सध्या चिकन शॉप बंद करण्याची गरज नाही, मात्र आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. कॅन्सरचे रुग्ण वाढत आहेत, यामध्ये केवळ व्यसन करणाऱ्यांनाच हा आजार होत नाही, तर लहान मुलींनाही तो होत आहे,ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. यामुळे महिला आणि तरुणींना कॅन्सरची मोफत लस देण्याचा विचार आम्ही करत आहोत" असे आबिटकर यांनी सांगितले.

## पुणे मनपाला ...

**यामध्ये अभिनेते आणि वक्ते म्हणून राहुल सोलापूरकर यांची वर्णी लावण्यात आली आहे. सोलापूरकर यांनी छत्रपती शिवरायांबद्दल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे ते वादामध्ये आहेत. मनपाच्या यादीवर आता चौफेर टीका होत आहे.**

## उत्तराखंड मधील...

लष्कर काल सकाळपासून सातत्याने बचावकार्य करत आहे. रात्रभर बचावकार्य राबविण्यात आले. आज 14 जणांची सुटका करण्यात आली आहे. त्यांना जोशीमठ येथील लष्करी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. एकाची प्रकृती गंभीर आहे.

## हवे चंद्र तारे; फुलांचे पसारे...!

तारांगण सुरू करण्यासाठी पहिल्या वर्षी ३३ लाखांचा खर्च केला जाणार आहे. त्यानंतर पुढील चार वर्षे देखभाल दुरूस्तीसाठी ६ लाख ९६ हजार रूपयांचा खर्च कंपनीस दिला जाणार आहे. तर, या वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत हे तारांगण सुरू करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या माहितीला दुजोरा दिला.

# कोयत्याने झालेल्या हल्ल्यात दोघे जखमी

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव येथे अत्यंत क्षुल्लक कारणावरुन तरुणांच्या टोळक्याने दोघा भावांना कोयता, लोखंडी गज व बॅटने अमानुष मारहाण केल्याची घटना मंगळवार दि.२५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात दोघे बंधू जखमी झाले असून १४ जणांवर इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी दिली.

प्रशांत मोहन आरडे ( वय २३ वर्षे, रा. हिंगणगाव ) यांच्या फिर्यादी वरून स्वप्रिल जगताप, निखिल बगाडे, स्वप्रिल बगाडे, स्वयंम, समीर वाघमारे, प्रज्वल वाघमारे, रोहन भोसले, दीपक जगताप, प्रेम रणदिवे, अक्षय बापु आरडे, सूरज आरडे, धीरज पिंगळे, धीरज निरवणे, योगेश जाधव, सुमित जगताप ( सर्व जण रा. हिंगणगाव, ता. इंदापूर) अशी आरोपींची नावे आहेत.

आमचे घरी कार्यक्रम आहे हे माहित असताना फिर्यादीचा मोठा भाऊ ओंकार आरडे हा गाडीने धुळ उडवत गेला, तुम्हाला लई माज आला आहे या क्षुल्लक कारणावरुन आरोपीनी फिर्यादी व त्याच्या कुटुंबियांना शिवीगाळ करुन, त्यांना मारहाण करण्याच्या हेतूने कोयता, लोखंडी गज, बॅट घेवून त्यांच्या अंगावर चालून गेले.

## बाल विकास मंदिर शाळेत विज्ञान प्रदर्शन

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शन आणि चित्रकला, हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी, शाळेच्या माजी विद्यार्थीनी डॉ. रचना म्हेत्रे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. इ. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी हवा, पाणी, आहार , शेतीच्या आधुनिक पद्धती अशा विविध विषयांवर आधारित ५० प्रकल्प यावेळी सादर केले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा हा या प्रदर्शनामागचा उद्देश होता.

तसेच, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभर बनवलेल्या वस्तूंचे, चित्रांचे यावेळी प्रदर्शन भरवण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी टाकाऊ पासून टिकाऊ अशा सुंदर वस्तू बनवलेल्या होत्या. या विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षिका राजगौरी जगताप यांनी मागदर्शन केले होते. या प्रदर्शनाला शाळेचे माजी विद्यार्थी, पालक यांनी भेट दिली आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रदर्शनाचे नियोजन मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. या उपक्रमाचे शाला समिती अध्यक्ष ॲड सागर नेवसे, महामात्र सुधीर भोसले यांनी कौतुक केले.

यावेळी, म. ए. सोसायटीच्या प्रतिनिधी वर्षा न्यायाधीश, पालक प्रतिनिधी डॉ. राकेश आत्राम, रुपाली टिळेकर सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी कदम यांनी केले. आभार मीना खोमणे यांनी मानले

**बंद निविदा लिलाव नोटीस**
**- कचरा आणि लाकूड**
**लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे**
- संकेतस्थळ -
www.auctionindia.com
लिलावाची तारीख
04- मार्च -2025

**रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या.**
**स.न. १/१०/२, बालेवाडी, पुणे-४११ ०४५. दूरध्वनी क्र.: ९०२८५९३१५९**
**ई-मेल आयडी: regulus.manager@gmail.com**

**निविदा सूचना**

निविदा सूचना क्रं: RCHSL/ELEV/TENDER/001/24-25, दिनांक: ०२/०३/२०२५

रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या. संस्थेच्या सभासदांनी संस्थेसाठी **नवीन लिफ्ट बसवण्याचे** ठरले आहे. याकरिता नामांकित लिफ्ट कंपनीच्या लिफ्ट बसवण्याबाबत निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कागदपत्राची किंमत रु.१००/- रोख भरून संस्थेच्या खालील कार्यालयातून खरेदी करावयाची आहे. बयाना रक्कम (E.M.D.) रु. २५,०००/- डिमांड ड्राफ्ट स्वरूपात भरायची आहे.

**निविदा अर्जाची विक्री बंद होण्याची तारीख- दि. १४/०३/२०२५ संध्या. ६.०० वाजेपर्यंत**
**निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख- दि. १४/०३/२०२५ संध्या. ६.०० वाजेपर्यंत**
**निविदा उघडण्याची तारीख- दि. १६/०३/२०२५ दुपारी ३.०० वाजता**

कोणतेही कारण न देता सदर निविदा पूर्णतः किंवा अंशतः स्वीकारण्याचा किंवा निविदा पूर्णतः किंवा अंशतः नाकारण्याचा हक्क संस्थेने राखून ठेवलेला आहे. तरी इच्छुकांनी निविदा खालील पत्यावर व्यक्तिशः पाठवण्यात याव्या.

**चेअरमन/ सचिव,**
**रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या.**
**स.न. १/१०/२, बालेवाडी, पुणे-४११०४५**

**रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या.**
**स.न. १/१०/२, बालेवाडी, पुणे-४११ ०४५. दूरध्वनी क्र.: ९०२८५९३१५९**
**ई-मेल आयडी: regulus.manager@gmail.com**

**निविदा सूचना**

निविदा सूचना क्रं: RCHSL/ELEV/TENDER/002/24-25, दिनांक: ०२/०३/२०२५

रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या. संस्थेच्या सभासदांनी संस्थेतील **लिफ्टच्या आधुनिकीकरणासाठी निविदा** सादर करीत आहे. याकरिता नामांकित लिफ्ट कंपनीकडून लिफ्ट आधुनिकीकरणासाठी निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कागदपत्राची किंमत रु.१००/- रोख भरून संस्थेच्या खालील कार्यालयातून खरेदी करावयाची आहे. बयाना रक्कम (E.M.D.) रु. २५,०००/- डिमांड ड्राफ्ट स्वरूपात भरायची आहे.

**निविदा अर्जाची विक्री बंद होण्याची तारीख- दि. १४/०३/२०२५ संध्या. ६.०० वाजेपर्यंत**
**निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख- दि. १४/०३/२०२५ संध्या. ६.०० वाजेपर्यंत**
**निविदा उघडण्याची तारीख- दि. १६/०३/२०२५ दुपारी ३.०० वाजता**

कोणतेही कारण न देता सदर निविदा पूर्णतः किंवा अंशतः स्वीकारण्याचा किंवा निविदा पूर्णतः किंवा अंशतः नाकारण्याचा हक्क संस्थेने राखून ठेवलेला आहे. तरी इच्छुकांनी निविदा खालील पत्यावर व्यक्तिशः पाठवण्यात याव्या.

**चेअरमन/ सचिव,**
**रेग्यूलस सहकारी गृहरचना संस्था मर्या.**
**स.न. १/१०/२, बालेवाडी, पुणे-४११०४५**

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
2•3•2025




**स्वारगेटच्या घटनेनंतर महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला.. तथापि निर्माण झालेली परिस्थिती, त्यावर उपाययोजना, घेण्याची खबरदारी या मुद्द्यांपेक्षा राजकीय रणकंदन जास्त माजले. त्यामुळे मूळ प्रश्न आणि त्यावरील उत्तर हे मागे पडले. राजकारण्यांचा धांगडधिंगा, सामाजिक संस्था, व्यक्तींचा आरडाओरडा, त्यातील आंदोलन, मंत्री, लोकप्रतिनिधी, सरकार यांची बदनामी ... या पलीकडे जाऊन या सगळ्या घटनेकडे बारकाईने पाहिले पाहिजे आणि विशेष म्हणजे त्याची दुसरी बाजू देखील पाहिली पाहिजे, जी आजपर्यंत कुणीही चर्चित देखील आणली नाही.**

# दुसरी बाजू

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला. स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बसस्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती.

शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभनीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्राला शरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

मुख्य म्हणजे कोणत्याही स्थितीमध्ये शंका किंवा भीती वाटत असल्यास त्वरित मदतीसाठी जोरात ओरडायची खबरदारी महिलांनी जरुर घ्यावी. एखाद्या



विश्लेषण
अनिरुद्ध बडवे
(मुख्य संपादक)
राष्ट्रसंचार

अनोळखी व्यक्तीसोबत जायची वेळ आल्यास आणि त्याने चुकीचे वागणे सुरू केल्यास त्वरित विरोध करायला मुलींना शिकवायला हवे. ताज्या दुर्घटनेमध्ये मुलीने घाबरुन जात पुढचा प्रवास सुरू केला. मात्र अशा वेळी विश्वासातल्या मित्रांना किंवा कुटुंबातील सदस्यांना संपूर्ण घटनाक्रम तात्काळ सांगायला हवा. यामुळे मदत लवकर मिळते, खेरीज आरोपीला पकडण्यासाठी तात्काळ उपायोजना करता येतात. तेव्हा एकटे न राहता सुरक्षिततेसाठी कोणाची तरी सोबत घेणे आणि परिचितांना कळवणे गरजेचे ठरते.

## घटनेची दुसरी बाजू

दुसरी बाजू मांडणे खूपच धाडसाचे ठरेल. त्यामुळे कदाचित कुठल्याही माध्यमातून या बाजूवर चर्चा झाली नाही. किंबहुना ही बाजू तथाकथित समाजसेवक, आंदोलन किंवा एका मोठ्या प्रमाणात सरकारला आणि व्यवस्थेला धारेवर धरू पाहणाऱ्या, आरोपीच्या कठडीत उभ्या करणाऱ्या व्यापक लोकसमूहासाठी फारशी हिताची नसावी किंवा आपण तो जो स्त्री दाक्षिण्य याचा विचार मांडत असतो, त्याला ती अनुरूप नसावी. म्हणून यावर कोणी कधी चर्चा केली नाही.

परंतु प्रत्येक नाण्याला जशी दुसरी बाजू असते. तशी पुण्यातील स्वारगेट घटनेला दुसरी बाजू आहेच आणि त्यावर कोणीतरी कधीतरी व्यक्त झाले पाहिजे. ही घटना घडल्यानंतर जेव्हा राज्य सरकारची प्रतिनिधी म्हणून गृहराज्य मंत्र्यांना याबाबत प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा या त्यांनी या दुसऱ्या बाजूचे डोळे थोडेसे किलकिले करून उघडण्याचा प्रयत्न केला. परंतु तात्काळ त्यांच्यावर चहूबाजूने भडीमार करण्यात आला आणि त्यांना तोंड बंद करावे लागले.

कदाचित या लेखानंतर तो भडिमार आमच्या माध्यम समूहावर देखील होईल. परंतु सत्य मांडणे हे कधी कधी त्या प्रसंगाची नाही तर काळाची गरज असते, या पत्रकारितेच्या मूल्याशी इमान राखून ही बाजू जनतेसमोर आणली पाहिजे.

स्वारगेटचा झालेला प्रकार पाहण्यासाठी जेव्हा पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले त्यावेळी सकाळी पाचच्या सुमारास संबंधित आरोपी दत्ता गाडे शांतपणे उतरून निघून गेला. त्यानंतर १५ मिनिटानंतर संबंधित स्त्री देखील उतरून त्याच पद्धतीने निघून गेली, हे सर्वांनी पाहिले.

त्या ठिकाणी त्या स्त्रीने घटना घडल्यावेळी किंवा तो प्रकार घडतेवेळी आरडाओरडा का केला नाही ? ही साधी सरळ शंका प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली असेल.

परंतु स्त्रीवर अत्याचार करणारा पुरुष म्हणजे तोच आरोपी, तोच दंडास पात्र. त्याला मारा, खोडा, फासावर लटकवा अशी एक सार्वत्रिक भावना असते म्हणून या गोष्टीकडे कोणी फारसे कुणी पाहिले नाही. सगळे दत्ता गाडे या आरोपीच्या मागे लागण्याच्या पाठीमागे गुंतले.

## सुविधेचा वापर का नाही केला

पण त्या महिलेने आरडाओरडा का केला नाही ? या साध्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेही नाही.

महिला सुरक्षेसाठी सरकारने, पोलीस प्रशासन तसेच अन्य प्रशासनाच्या मदतीने इमर्जन्सी ॲप पासून ते संकटग्रस्त महिलांनी मिस कॉल देण्यापर्यंतच्या अनेक सोयी सविधा उपलब्ध करून दिले आहेत. त्याचा वापर करण्यासाठी जागरूकता करण्यात आली आहे. त्यासाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च सरकारने आणि प्रशासनाने केला आहे. यातील एकाही टूल्सचा, सुविधेचा वापर त्या महिलेने का केला नाही ?

घटना घडल्यानंतर चार तासानंतर तिने एका मित्राच्या मदतीने पोलिसांना ही माहिती दिली. मग या चार तासांमध्ये असा काय विचार विनिमय, विचारमंथन झाले की यामुळे तिने तात्काळ निर्णय घेतला नाही. अशा प्रकारची तक्रार देण्यासाठी साधारणतः तिचे पती किंवा आई-वडील किंवा जवळच्या नातेवाईक याने पुढाकार घेतला पाहिजे. हे कुठलेही नातेवाईक चर्चेत, दृष्टीपथात नसताना तिचा कोणी एक मित्र ह्या गुन्हा दाखल करण्यासाठी पुढाकार घेतो. याचे काय कारण असावे ?

संबंधित महिला इतके रात्री तेथे का गेली? कोणत्या प्रवासाला निघाली होती, तिची गाडी कधी आली, पुणे शहरांमध्येच राहणाऱ्या या महिलेला स्वारगेट वरून अन्य सोयीच्या वेळांमध्ये त्या गावाला निघणाऱ्या गाड्या नव्हत्या का ? तिला पहाटेचीच वेळ का निवडावीशी वाटली ? हे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत.

## घटनेला नेमका कशाचा

आरोपींनी दिलेल्या प्राथमिक माहितीतून तर या महिलेचे आणि त्या आरोपीचे पहिल्यापासूनची ओळख आहे असे समजते. मग ठराविक गावाला जाणारी गाडी कुठे उभी राहते ? ही विचारणा महिलेने केली, ती दाखवण्यासाठी आरोपी गेला आणि गाडीत आत गेल्यानंतर त्याने अत्याचार केला. या घटनेला नेमका कशाचा आधार आहे ?

ती गाडी इतका कोपऱ्यामध्ये बंद अवस्थेमध्ये पडली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ होती. गंदगी होती. अस्वच्छता होती. साधारण रोजच्या चलनात असणारी गाडी आणि बंद पडलेली गाडी हा फरक सहज लक्षात येतो. अशावेळी त्या महिलेने संबंधित आरोपीवर विश्वास ठेवला आणि त्या गाडीमध्ये ती चढून आत देखील गेली. हे तिने का केले असावे ? तिला जरा सुद्धा याबाबत शंका आली नाही का ?

..... पुन्हा त्यांच्यामध्ये मतभेद झाले म्हणून मित्राच्या मदतीने ते प्रकरण गुन्हा नोंदणी पर्यंत गेले ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. संबंधित आरोपी दत्ता गाडे यांनी केलेले कृत्य हे निश्चितच नालायकपणाची कृती आहे, त्याचे कुणीही समर्थन करणार नाही. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये ही वेळ येईपर्यंत महिलेच्याही काही चुका आहेत का ? हे देखील तपासले पाहिजे.

# संमेलनाचे सूप वाजल्यानंतर...





दिल्लीतील ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडून काही दिवस उलटले तरी या मंथनातून नेमके काय मिळाले, यावर चर्चा करणे गरजेचे आहे. या संमेलनासाठी सरकारने चार कोटी रुपये, साहित्यिकांनी आपले विचार आणि साहित्यप्रेमींनी आपला वेळ देऊ केला. त्यामुळेच यातून काय गवसले याचा लेखाजोखा मांडला जायला हवा. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पार पडलेले हे पहिले साहित्य संमेलन होते. अर्थातच मराठीला हा दर्जा मिळवण्यासाठी अनेक पुरावे द्यावे लागले होते. सातव्या शतकापासून वा त्या आधीपासून ही भाषा अस्तित्वात असल्याचे आपण सिद्ध केले. अकराव्या शतकाच्या शेवटी संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या खंबीर आधार समोर मांडला आणि त्या संचितावरच भाषेला हा अभिजात दर्जा मिळाला. आता पुढची सातशे वर्षे ही भाषा आणि त्यातील सौंदर्य टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

साहित्य संमेलनाने ही जाणीव जनांमध्ये जागृत केली का, हा मूलभूत प्रश्न आहे. संमेलनाच्या अध्यक्षांच्या भाषणामध्ये संतसाहित्याचा गौरव होताच आणि त्यांच्यामुळेच भाषा टिकून राहिल्याचे स्पष्टीकरणही होते. मात्र यापुढेही मराठी समृद्ध, सशक्त करण्यासाठी ताराबाईंनी एखादी योजना दिली का, या प्रश्नाचे उत्तर मिळवणे गरजेचे आहे. माझ्या मते त्यांच्याकडून असे काहीही दिले गेलेले नाही. संत, पंत, तंत आणि साहित्यिकांचा गौरव करत असताना आपण सध्या काय करतो, हेदेखील पहावे लागेल. यात काय करता येईल यासंबंधीचा आराखडा त्यांच्याकडे येणे अपेक्षित होते. मुख्य म्हणजे हे करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा वेळही होता. संमेलनाध्यक्ष जाहीर झाल्यानंतरच्या चार-पाच महिन्यांमध्ये त्या हे काम करु शकल्या असत्या. मात्र याबाबत त्यांची ठोस भूमिका दिसली नाही.

सध्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न होत असून लवकरच नवीन शैक्षणिक धोरण लागू होणार आहे. त्यामुळेच याची भाषेशी सांगड कशी घालता येईल, यासंबंधी त्यांचे भाष्य वा धोरण समोर येणे अपेक्षित होते. मात्र त्यांच्या भाषणात हेदेखील आले नाही. ठरावांमध्येही तोचतोचपणा होता. अध्यक्षीय भाषणामध्ये केवळ पंतप्रधानांना सुनावणे वा अन्य राजकारण्यांवर भाष्य करणे हा विषय असू शकत नाही. मात्र ताराबाईंनी याचाच आधार घेतलेला दिसला. खरे पाहता खुद्द पंतप्रधान उपस्थित असल्यामुळे त्यांच्या रुपाने संपूर्ण यंत्रणा हाती होती. पंतप्रधानांपुढे मराठीशी संबंधित अनेक मुद्दे त्या मांडू शकल्या असत्या. मात्र ही संधी दवडली. उदाहरणार्थ, विद्यापीठे स्थापन करणे, कर्मचाऱ्यांना नियमित पगार देण्याबाबत तुम्ही काय करु शकता हे विचारणे, मॅनेजमेंटच्या पातळीवरील सुयोग्य बदलांची अपेक्षा व्यक्त करणे, शिक्षण धोरणासंदर्भातील आवश्यक बदलांवर भाष्य करुन त्यांनी ही भाषा पुढची सातशे वर्षे टिकवण्यासाठी पहिला दगड रोवणे अपेक्षित होते. मात्र दुर्दैवाने यातील काहीही दिसले नाही. त्यामुळेच पुन्हा एकदा हे संमेलन आणि व्यासपीठ राजकारण, राजकीय लोकांच्या चर्चा आणि त्या निमित्ताने पुढे आलेला वाद याभोवतीच फिरत राहिलेले दिसले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबरोबरच वर्षभर अनेक विभागीय संमेलने होत असतात. विदर्भ, पुणे, मुंबई वा राज्याबाहेरच्या गावा-शहरांमध्येही अशी संमेलने आयोजित होतात. महामंडळ या सर्वांचे प्रमुख आहे. मात्र महामंडळातील मंडळी आणि वा घटकसंस्थांमध्ये काम करणारी मंडळी केवळ संस्थेतील शोभेसाठी असल्यासारखी वागतात. नाव, प्रसिद्धी मिळावी



साहित्य
मधुसूदन पत्की
राष्ट्रसंचार

एवढ्यासाठीच जणू ती तिथे असतात. वर्षभर जवळपास २०० संमेलने भरत असल्याचे लक्षात घेता खरे तर या प्रत्येक ठिकाणी होणारे ठराव महामंडळाला माहिती असायला हवेत. उदाहरणार्थ पुण्यातील मसापच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये आयोजित होणाऱ्या संमेलनांमध्ये झालेले ठराव आपला निरीक्षक पाठवून जाणून घेतले पाहिजेत आणि ते महामंडळाकडे पाठवले पाहिजेत. पुढे त्यावर महामंडळाने काम करणे अपेक्षित आहे. कबहुना, मराठीच्या उध्दारासाठी तसेच प्रचार-प्रसारासाठी हे काम आवश्यक असल्याचे घटनेत म्हटले आहे. मात्र इतक्या मूलभूत गोष्टी होत नसतील तर ते मराठीच्या संवर्धनासाठी, प्रचार-प्रसारासाठी नेमके काय करतात, हा प्रश्न उरतो. इथे जमणाऱ्या मंडळींनी, साहित्यवर्तुळात वावरणाऱ्यांनी केवळ संमेलनाला उपस्थित राहून आणि वृत्तपत्रात येणाऱ्या फोटो वा बातमीवर समाधान मानले तर हे लक्ष्य साध्य करणे केवळ अशक्य आहे. कारण साहित्य संमेलनाचे व्यासपीठ ही केवळ मिरवण्याची जागा नाही. ही जागा जमलेल्या लोकांना शहाणपणा शिकवण्याचीही नाही. या भूमिकेतून बाहेर पडून होणारे कामच मराठीच्या उध्दाराला पोषक आणि कारक ठरेल.

महामंडळातील पदाधिकाऱ्यांनी मांडले गेलेले ठराव सरकारदरबारी पाठवून त्याचे पुढे काय झाले, हे जाणून घेतले पाहिजे. दर तीन, सहा, नऊ वा बारा महिन्यांनी त्याची आठवण करुन दिली पाहिजे. कारण यावर काम करणारी खाती आपल्याकडे आहेत. त्यासाठी निधी राखून ठेवला जातो. दिला जातो. पण राजकारणी मंडळी आपल्या मर्जीतील लोकांना निधीचे वाटप करुन मोकळे होतात आणि वाचनालय काढून वा मराठीची एखादी कार्यशाळा घेऊन आपण काही तरी केल्याचे दाखवत थांबतात. इथेच विषय संपतो पण मूलभूत आणि महत्त्वाचे प्रश्न मात्र अनुत्तरित राहतात. खरे तर अनेक मोठ्या मंडळींना ही कामे कशी मार्गी लावायची वा करुन घ्यायची याचे ज्ञान, अक्कल, शहाणपण, हुशारी सगळे आहे. मात्र ते आज प्रत्यक्ष उतरुन काम करण्यास तयार नाहीत. म्हणूनच मराठीचा दरबार देखणा करायचा असेल तर सर्व पातळ्यांवर काम होणे गरजेचे आहे. त्यासाठी महामंडळाच्या लोकांनी घटक संस्थांच्या लोकांना जबाबदार धरले पाहिजे तर घटक संस्थांच्या लोकांनी जिल्ह्यातील संस्थांना तर त्यांनी शाखांना जबाबदार धरले पाहिजे. अशा पद्धतीने एकमेकांकडून कामकाजाची माहिती एकत्रित झाली तरच कामामध्ये सूसुत्रता येईल आणि अनेक प्रश्न मार्गी लागतील.

## साहित्यिकांनी कणा असल्याचे दाखवून द्यायला हवे

दर वर्षी वेगळ्या ठिकाणी साहित्य संमेलन पार पडते. आता दिल्लीत झाले तर पुढल्या वर्षी ते वेगळ्या ठिकाणी असेल. मात्र या दोन माणसांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो. म्हणजेच 'सरहद' वाले आपल्या पद्धतीने हे काम करुन मोकळे झाले तर उद्याचे संमेलन नवे आयोजक आपल्या पद्धतीने पाडतील. प्रत्येकाचे ठोकताळे, पद्धत वेगळी असते. आता तर पैसा आणि मनुष्यबळ असल्यामुळे इथे राजकीय मंडळींचे वर्चस्व दिसते. खरे तर महामंडळाकडे साहित्य संमेलने घेण्याइतका स्वत:चा निधी असायला हवा. एका संमेलनासाठी दोन कोटी रुपयांचा खर्च येत असेल तर २० कोटी जमा करुन वर्षभरात येणारे दोन कोटीचे व्याज वापरुन संमेलनाचे आयोजन करायला पाहिजे. हे झाले तर सरकारकडे हात पसरण्याचा प्रश्नच राहणार नाही. मात्र महामंडळ कधीच हा विचार करताना दिसत नाही. मग हेच लोक पुरेसा फंड नसल्यामुळे पुढाऱ्यांच्या मागे लागतात आणि तोदेखील आपल्याकडे अक्कलहुशारी असल्याचे दाखवण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली हा सोहळा करुन घेतो. हे टाळण्यासाठी आधी साहित्यिकांनी कणा असल्याचे दाखवून द्यायला हवे. तो केवळ मंचीय भाषणातून नव्हे तर एकूण वर्तनातून, देहबोलीतून दिसायला हवा.

साहित्य संमेलनाला येणाऱ्या निमंत्रितांनीही आपल्या मागण्यांचे भान राखणे गरजेचे आहे. अनेकजण कोणत्या भागात संमेलन आहे, तिथे कोणती आणि किती सोय असेल याचे भान न राखता अवाजवी अपेक्षा ठेवतात आणि तशा मागण्या रेटत राहतात. संयोजक म्हणून काम केल्यामुळे असे अनेक अनुभव माझ्याकडे आहेत. जागाच नसेल तर संयोजक चोख सोय कशी करणार, ही गोष्ट संबंधितांनी लक्षात घेतली पाहिजे. बरेचदा साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचा फोन केला की मान्यवर राहण्याची सोय कोणत्या हॉटेलमध्ये आहे हा प्रश्न विचारतात. अमूक तमूक ठिकाणी सोय करण्याचा आग्रह धरतात. खरे पाहता हा फोन केल्यानंतर संबंधितांनी आपला विषय काय आहे, आपण काय बोलणार आहोत, हे सांगणे अपेक्षित असते. मात्र याबाबत ते शब्दही बोलत नाहीत. आपल्याला किती दिवसांचे आमंत्रण आहे हे न बघता तीन दिवस येणार असल्याचे सांगून मोकळे होतात. अशा वेळी काय बोलायचे तेच समजत नाही. म्हणूनच साहित्य संमेलनांची दशा बदलायला हवी, असे प्रकर्षाने वाटते.

खरोखरच मराठीला चांगले दिवस दाखवायचे असतील तर हे व्रत हाती घेऊन काम केले पाहिजे. नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले पाहिजेत. मागे एका साहित्यिकाने आपला धडा शाळेत जाऊन शिकवण्याचा निश्चय केला होता. या योगे तो साहित्यिक मुलांसमोर येतो, विचार पोहोचतात आणि त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा वेगळा प्रभावही जाणवतो. अशा पद्धतीचे उपक्रम वर्षभर सुरू ठेवणे आणि त्यायोगे मराठीचा जागर करणे गरजेचे आहे. महामंडळाने अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले तरच संमेलनाचे वेगळे आणि देखणे चित्र समोर येऊ शकेल.

# माहिती तंत्रज्ञान कंपन्यांची उत्पन्न व नोकर भरतीत वाढ !

**देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये संगणक प्रणाली व सेवा देणाऱ्या कंपन्यांच्या राष्ट्रीय संघटनेने म्हणजे नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनीज अर्थात "नॅसकॉम्" यांनी २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षाचा "धोरणात्मक पुनरावलोकन अहवाल" नुकताच प्रसिद्ध केला.या अहवालात काढण्यात आलेले निष्कर्ष महत्वपूर्ण असून संगणक प्रणाली व सेवा कंपन्यांनी प्रशंसाजनक कामगिरी केली असल्याचा उल्लेख केला असून चालू वर्षात आणखी चांगली कामगिरी होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्याचा घेतलेला वेध.**

देशातील संगणक प्रणाली विकसन व सेवा देणाऱ्या कंपन्यांच्या नॅसकॉम या राष्ट्रीय संघटनेने चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस या क्षेत्राचा महसूल ३०० अब्ज डॉलर्सच्या घरात जाईल असा अंदाज व्यक्त केला असून या क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये सव्वा लाख नवीन नोकऱ्यांची भर पडण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

एकंदरीत चालू आर्थिक वर्षांमध्ये भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये विकासामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वाटा हा अत्यंत महत्त्वपूर्ण राहणार असल्याचा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. या क्षेत्राचा वार्षिक विकासाचा दर सहा टक्क्यांच्या घरात राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २०२५ या कॅलेंडर वर्षामध्ये भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा विकास दर ५.१ टक्के राहण्याची शक्यता असून या काळातील महसूल २८२.६ अब्ज डॉलर्स राहील असे नमूद करण्यात आले आहे. याच वर्षांमध्ये एक लाख २६ हजार नवीन नोकऱ्या निर्माण होण्याची शक्यता या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर करण्यात येऊन विकसित विकसित करण्यात येणारी वितरण यंत्रणा,क्लाऊड नेटिव्ह तंत्रज्ञान व सायबर सुरक्षा सेवा व जागतिक क्षमतेची केंद्रे (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स - जीसीसी) यांच्या परिपक्व विस्तारामुळे या क्षेत्रातील विकासाला चांगली चालना मिळणार आहे असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

भारतातील संगणक प्रणाली कंपन्यांची निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४.६ टक्क्यांनी वाढून २२४.४ अब्ज डॉलरच्या घरात जाईल असाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०२४ या वर्षांमध्ये या क्षेत्राला जास्तीत जास्त स्थैर्य निर्माण झाल्यामुळे अनेक प्रदेशांमध्ये सुधारित आर्थिक व्यवहार वाढलेले आढळून आले. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये गेल्या वर्षात १०.८० टक्के वाढ संगणकाच्या विविध भागांसाठी म्हणजे हार्डवेअरसाठी व संगणक प्रणालीसाठी -सॉफ्टवेअरच्या खर्चासाठी करण्यात आली. मात्र माहिती तंत्रज्ञान सेवांमध्ये मात्र फारशी वाढ झाली नाही व ती ४. ७० टक्क्यांवर कायम राहिली.

मार्च २०२५ अखेर संपलेल्या वर्षांमध्ये भारतीय तंत्रज्ञान उद्योगाने जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान व सर्जनशीलता व नवकल्पना निर्माण करण्याचे केंद्र (इनोव्हेशन हब) असे स्थान निर्माण करण्यात मोठे यश संपादन केले आहे. अमेरिकेसह युरोपातील अनेक देशांमध्ये सार्वत्रिक निवडणुका झालेल्या असतानाही भारतीय उद्योगाने या वर्षांमध्ये केलेली प्रगती ही अत्यंत समाधानकारक झाली. संगणकाचे विविध भाग म्हणजे हार्डवेअर तसेच संगणक प्रणाली यांची विक्री २८३ बिलियन डॉलरच्या घरात जाण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल १४ बिलियन डॉलर्सची वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे संगणक प्रणाली व सेवांच्या निर्यातीमध्येही या वर्षात ४.६ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली असून ही निर्यात २०० बिलियन डॉलर्स पेक्षा जास्त होऊन २२४ बिलियन डॉलर्स होईल असा अंदाज आहे. मात्र देशांतर्गत तंत्रज्ञान क्षेत्राची कामगिरी फारशी वाढलेली नसून ती ५८.२ बिलियन डॉलर्सच्या घरात आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या या चांगल्या कामगिरीमुळे या क्षेत्रातील नोकऱ्यांमध्येही लक्षणीय रित्या वाढ झालेली असून या वर्षाखेरीस १.२६ लाख नोकऱ्या वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे या क्षेत्रातील एकूण रोजगाराचा आकडा ५.८० मिलियन म्हणजे ५ कोटी ८० लाखाच्या घरात जाण्याची शक्यता आहे. भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योगाची ही चांगली कामगिरी होण्यासाठी महत्त्वाचा हातभार लावला लागला आहे तो सायबर सुरक्षा सेवा तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवांचा विस्तार व क्लाऊड नेटिव्ह तंत्रज्ञान यांचा प्रमुख वाटा आहे. त्याचप्रमाणे संगणक प्रणालींची विविध उत्पादने आणि त्यांचे सखोल तंत्रज्ञान (डीप टेक्नॉलॉजी) यांच्यामुळे आपण नाविन्यता व बदल निर्माण करण्यामध्ये आघाडीवर राहिलो आहोत.



### कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जनरेटिव्ह ए आय चा सुरेख संगम

- भारतातील अभियांत्रिकी व संशोधन व विकास या क्षेत्रामध्ये ही नवनवीन संधी निर्माण झालेल्या आहेत. भारतीय तंत्रज्ञान क्षेत्राने जागतिक पातळीच्या क्षमतेची केंद्रे निर्माण केल्यामुळे संपूर्ण जगाचे भारताकडे लक्ष आकर्षित झालेले आहे. त्यामुळेच अमेरिकेसह युरोपातील अनेक देशांमध्ये भारतीय मनुष्यबळाची सातत्याने मागणी होताना दिसत आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनीही भारतातील मनुष्यबळाला अमेरिकेमध्ये संधी देण्याच्या दृष्टिकोनातून काही नियम शिथिल केल्याचे नुकतेच लक्षात आले आहे.भारतीय तंत्रज्ञांची क्षमता व कुवत यावर मोठ्या प्रमाणावर अनेक देशांनी विश्वास टाकलेला आहे. एवढेच नाही तर भारतातील तंत्रज्ञान उद्योगाने एंटरप्राइज एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जनरेटिव्ह ए आय यांचा अत्यंत सुरेख संगम घडवून आणलेला आहे व तो अलीकडच्या काळात जास्त यशस्वी झाल्याचे दिसले आहे.

### माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती

- देशातील तरुणांमध्ये माहिती तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण देऊन या क्षेत्राला चांगला रोजगार पुरवण्यामध्ये या क्षेत्राने चांगली कामगिरी केल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने गेल्या वर्षभरात केलेली प्रगती ही २०४७ मधील विकसित भारत मन होण्याच्या दृष्टिकोनातून टाकलेले यशस्वी पाऊल आहे असेही अहवालाच्या अखेरीस नमूद करण्यात आले आहे. या भारतीय उद्योगाने केलेल्या भांडवली खर्चाचा अहवालही नेस्कॉमने प्रसिद्ध केला असून त्यात तंत्रज्ञानासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डिजिटल गोष्टींसाठी जास्त खर्च झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. पुढील वर्षात मागील वर्षापेक्षाही जास्त रक्कम भांडवली खर्चापोटी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.
- भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला यशस्वी होण्यासाठी को-क्रियेट ( सह तयार), कोलॅबरेट (अभिसरण), कॉन्व्हर्ज ( एकत्र येणे ) व कॅटेलाईज( उत्प्रेरक) या चार धोरणात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे अहवालाच्या अखेरीस नमूद करण्यात आले आहे.या माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने आगामी काळात टेलिकॉम, किरकोळ बाजारपेठ व आरोग्य सेवा क्षेत्र यामध्ये व्यापक प्रमाणावर पदार्पण केले तर त्यांना जास्त चांगले यश लावण्याची शक्यता असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले आहे.



तंत्रज्ञान
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

# भाकीत उष्णतेच्या लाटेचे!

**यावर्षी देशभर कडाक्याची थंडी पडेल अशी शक्यता असताना म्हणावी तशी थंडी पडली नाही. भारताच्या उत्तर भागात डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यात कडाक्याची थंडी पडली. जानेवारीमध्ये तर सर्व शहरांचे तापमान नीचांकी स्तरावर पोहचले मात्र महाराष्ट्रात कडाक्याची थंडी अभावानेच पाहायला मिळाली. जानेवारी महिन्यात काही ठिकाणी थंडी पडली मात्र फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच थंडी गायब झाली आणि उष्णता वाढली.**



हवामान
- श्याम ठाणेदार, पुणे
राष्ट्रसंचार

**१९०१** नोंदीनुसार सरासरीपेक्षा अधिक किमान तापमानात यंदाचा फेब्रुवारी महिना प्रथम क्रमांकावर आहे. फेब्रुवारी महिन्यात देशात १५.०२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यातच फेब्रुवारी महिन्याचे सरासरी कमाल तापमान २९.०७ देखील दुसऱ्या सर्वोच्च पातळीवर होते. सध्या तर अतिशय विचित्र प्रकारचे हवामान अनुभवयास मिळत आहे. सकाळी गार वाऱ्यांसह कडाक्याची थंडी असते तर दुपारी कमालीचे गरम होते. काही शहरांचे सकाळचे तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी असते तर दुपारचे तापमान ३० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असते. राज्यातील सर्वच शहरात जवळपास हेच तापमान आहे. सकाळी हुडहुडी भरणारी थंडी तर दुपारी घामाच्या धारा. वातावरणातील या बदलाने अनेकांचे आरोग्य बिघडले आहे. वातावरणातील या बदलाने थंडी, खोकला आणि सर्दीच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. लहान मुलांमध्ये तर थंडी तापाची साथच आली आहे. आता आपण मार्चच्या सुरुवातीस असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होऊ शकते. हवामान खात्याने तर तसा अंदाजच वर्तवताना सांगितले आहे की आगामी काळात उष्णतेच्या प्रमाणात वाढ होणार आहे. याशिवाय तापमानातील चढ उतार कायम राहणार आहे. इतकेच नाही तर अधूनमधून वाहणाऱ्या उष्णतेतही चढउतार होऊ शकेल. हवामान खात्याने वर्तवलेली ही शक्यता चिंताजनक आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते सध्या सौम्य ला निना स्थिती असून लवकरच अल निनोचा पॅटर्न तयार होणार आहे. तज्ज्ञांच्या मते भारतात यावर्षी मागील वर्षापेक्षा अधिक उष्णतेची लाटा येऊ शकतात. मार्च ते मे महिन्यात या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका बसू शकतो. मार्च ते मे महिन्यात महाराष्ट्रासह देशातील काही राज्यात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात उष्णतेच्या लाटेचे प्रमाणही जास्त राहू शकते असा इशाराही भारतीय हवामान विभागाने दिला आहे. जुलै ते सप्टेंबर या काळात देशात अल निनोचा प्रभाव दिसून येईल. असेही हवामान खात्याने सांगीतले आहे मात्र उष्णतेच्या लाटेच्या शक्यतेने सर्वांची चिंता वाढवली आहे. मागील वर्षीही उष्णता मोठया प्रमाणात वाढली होती मात्र यावर्षी उष्णतेच्या लाटेचे प्रमाण अधिक असल्याने चिंता अधिक वाढली आहे. मागील वर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. राज्यातील पाणी साठा कमी होत असताना तीव्र उन्हाळ्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात जमिनीचा ओलावा कायम राखून पिके जागवण्यासाठी धरणांच्या पाण्याचे नियोजन सरकारी पातळीवर वेळीच करणे गरजेचे आहे. दिवसा आणि रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा अधिक राहणार असल्याने विजेचा वापर अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात विजेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. परीक्षांचे दिवस असल्याने विद्यार्थ्यांनाही काळजी घ्यावी लागणार आहे. अल निनोच्या प्रभावाने जगभर वातावरणात बदल होत आहे. जगात एकाच वेळी वेगवेगळे हवामान पहावयास मिळत आहे. जगात कुठे उष्णतेची लाट अनुभवयास मिळते तर कुठे प्रचंड पाऊस पाहायला मिळतो तर कुठे कडाक्याची थंडी अनुभवयास मिळत आहे. अल निनोचा प्रभाव भारतासह जगातील सर्वच देशांवर पडत असल्याने केवळ भारताचीच नव्हे तर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे.

# तरुणींमध्ये ट्रेंडिंग स्टाईल स्टेटमेंट

**भारतीय पारंपरिक पेहरावाला मॉडर्न टच देणारी व्हिस्कोस साडी तरुणींमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. तिच्या सौंदर्य, सोयीस्करता आणि स्टाइलमुळे ती आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत परिपूर्ण फॅशन स्टेटमेंट ठरते. त्यामुळे, तुम्हीही स्टायलिश आणि आरामदायक अशा व्हिस्कोस साडीचा ट्रेंड कधीही ट्राय करू शकता! साडी हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून, काळाच्या ओघात तिच्या विविध शैली आणि प्रकार विकसित झाले आहेत. पारंपरिक कापडांपासून आधुनिक आणि हलक्या कपड्यांपर्यंत साड्यांचे वैविध्य मोठ्या प्रमाणात दिसून येते. याच प्रवाहात व्हिस्कोस साडी हा नवा फॅशन ट्रेंड म्हणून उदयास आला आहे. हलकी, मऊ आणि स्टायलिश असल्यामुळे ही साडी विशेषतः तरुणींमध्ये लोकप्रिय होत आहे. कॉलेज तरुणींपासून ते तरुण प्रोफेशनल महिलांपर्यंत या साड्यांची क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे.**





फॅशन
ज्योती हांडगे,
फॅशन डिझायनर पुणे
राष्ट्रसंचार

### व्हिस्कोस साडी कशी स्टाईल करावी?

- १) बोल्ड ब्लाउज: जर तुमची साडी साधी असेल, तर स्टायलिश कट असलेला बोल्ड ब्लाउज घालून तुमचा लुक उठावदार करता येतो.
- २) बेल्ट स्टाईल: साडीवर स्टायलिश बेल्ट घालून वेस्टर्न टच देता येतो.
- ३) ऑक्सिडाईज किंवा सिल्व्हर ज्वेलरी: ट्रेंडी दागिन्यांसह व्हिस्कोस साडी अधिक उठून दिसते.
- ४) स्नीकर्स किंवा हील्स: आधुनिक फॅशनप्रेमींना पारंपरिक साडीला मॉडर्न टच देण्यासाठी स्नीकर्ससोबत स्टाईल करणे हा नवीन ट्रेंड आहे. तर, क्लासिक लुकसाठी ब्लॉक हील्स किंवा स्टायलिश सँडल उत्तम पर्याय ठरतो.
- १) कपड्याचा दर्जा: खऱ्या व्हिस्कोस तंतूपासून बनवलेल्या साड्या अधिक टिकाऊ आणि मऊ असतात.
- २) रंग आणि प्रिंट: तुमच्या त्वचेच्या टोनला साजेसा रंग आणि योग्य प्रिंट निवडल्यास लुक अधिक खुलतो.
- ३) ब्रँड आणि विश्वसनीयता: दर्जेदार आणि चांगली साडी मिळण्यासाठी नामांकित ब्रँड्समधून खरेदी करणे श्रेयस्कर ठरते.

### व्हिस्कोस साडी म्हणजे काय?

- व्हिस्कोस हा नैसर्गिक सेल्युलोजपासून तयार केलेला कृत्रिम तंतू आहे, जो रेशमासारखा गुळगुळीत आणि चमकदार असतो. या तंतूपासून बनवलेल्या साड्या हलक्या, मऊ आणि प्रवाही असल्यामुळे त्या नेसताना सहजतेचा अनुभव येतो. व्हिस्कोस साड्या पारंपरिक साड्यांपेक्षा अधिक हलक्या आणि आरामदायक असतात, त्यामुळे त्या नियमित वापरासाठी उत्तम पर्याय ठरतात. याशिवाय, त्या सहज धुतल्या जाऊ शकतात आणि विशेष आयर्निंगची गरज नसते, त्यामुळे देखभाल करणेही सोपे जाते.

### तरुणींमध्ये व्हिस्कोस साडीची वाढती क्रेझ

- व्हिस्कोस साडी फक्त दिसायला सुंदरच नाही, तर ती वापरण्यासही सोयीस्कर आहे. हाच या साडीच्या लोकप्रियतेचा मुख्य कारण आहे. चला, जाणून घेऊया की तरुणींमध्ये या साडीची क्रेझ का वाढत आहे:

### १. मॉडर्न आणि एलिगंट लुक

- व्हिस्कोस साडीला नैसर्गिक चमक असल्याने ती कोणत्याही प्रसंगी एलिगंट आणि स्टायलिश लुक देते. ऑफिसमधील मिटींग, कॉलेज फेस्टिव्हल, मित्रांसोबत एखादा खास इव्हेंट, किंवा कुटुंबासोबत पारंपरिक कार्यक्रम – प्रत्येक ठिकाणी ही साडी तुमचा लुक उठून दिसतो.

### २. विविध रंग आणि डिझाईन्स

- व्हिस्कोस साड्या पारंपरिक कॉटन किंवा सिल्क साड्यांपेक्षा अधिक रंगीबेरंगी आणि ट्रेंडी असतात. बाजारात या साड्या अनेक प्रकारांत उपलब्ध आहेत, जसे की:
- सिंगल कलर साड्या – ऑफिस किंवा कॅज्युअल लुकसाठी उत्तम
- प्रिंटेड साड्या – कॉलेज तरुणींमध्ये विशेष लोकप्रिय
- फ्लोरल आणि अ‍ॅब्स्ट्रॅक्ट डिझाईन्स – उन्हाळ्यात फॅशनेबल आणि कंफर्टेबल पर्याय
- एम्ब्रॉयडरी असलेल्या साड्या – खास प्रसंगांसाठी उत्तम

### ३. नेसण्यास सोपी आणि हलकी




- कॉलेज किंवा ऑफिसला जाताना जड साड्या नेसणे कठीण जाते. मात्र, व्हिस्कोस साडी अत्यंत हलकी असल्यामुळे ती सहज नेसता येते आणि दिवसभर आरामदायक वाटते. शिवाय, या साड्या सुरळीदार आणि प्रवाही असल्यामुळे त्या नेसताना सहजपणे शरीरावर बसतात.

### ४. हायब्रिड फॅशन – ट्रेडिशनल आणि मॉडर्नचा परिपूर्ण मिलाफ

- आजच्या तरुणींना आधुनिक लुकसह पारंपरिकतेचा स्पर्श हवा असतो. व्हिस्कोस साडी हा दोन्हीचा उत्तम मिलाफ आहे. ती पारंपरिक साड्यांसारखी दिसते, पण तिचे कापड आणि डिझाईन्स अत्याधुनिक असतात. त्यामुळे ती कोणत्याही प्रसंगासाठी परिपूर्ण ठरते.

# सोलो ट्रॅव्हल... स्वतःला शोधण्याचा उत्तम मार्ग



**प्रवास हा फक्त नवनवीन ठिकाणे पाहण्यासाठी नसतो, तर स्वतःला शोधण्याचा आणि समजून घेण्याचा एक सुंदर मार्ग असतो. सोलो ट्रॅव्हल म्हणजे एकट्याने केलेला प्रवास – जिथे तुम्ही स्वतःच्या सोबतीने जगाचा शोध घेता. आजच्या धावपळीच्या आणि व्यस्त जीवनशैलीत स्वतःसाठी वेळ काढणे आणि एकट्याने प्रवास करणे ही आत्म-अनुभवाची आणि आत्मपरिक्षणाची एक महत्त्वाची पायरी ठरते.**

पर्यटन
प्रा. योगेश हांडगे-पाटील
राष्ट्रसंचार



सोलो ट्रॅव्हल म्हणजे केवळ नवीन ठिकाणे पाहण्याचा अनुभव नाही, तर स्वतःला शोधण्याचा एक प्रवास आहे. हा अनुभव तुम्हाला आयुष्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवतो. स्वतंत्र निर्णय घेणे, अडचणींवर मात करणे आणि स्वतःबद्दल नव्याने जागरूक होणे हे या प्रवासाचे खरे सार आहे. जर तुम्ही कधी स्वतःला हरवले असेल, तर सोलो ट्रॅव्हल हा स्वतःला पुन्हा सापडण्याचा आणि स्वतःला समृद्ध करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे !

## • सोलो ट्रॅव्हलचे महत्व आणि फायदा

**१) स्वतःला समजून घेण्याचा अनोखा अनुभव :**

– रोजच्या जबाबदाऱ्या आणि जीवनाच्या गडबडीत आपण स्वतःसाठी वेळ द्यायला विसरतो. सोलो ट्रॅव्हलमुळे तुमच्याकडे स्वतःसोबत संवाद साधण्याची संधी मिळते.

– एकट्याने प्रवास करताना तुम्ही स्वतःच्या विचारांवर अधिक स्पष्टपणे विचार करू शकता आणि आयुष्यातील ध्येय-उद्दिष्टे यांचा नव्याने मागोवा घेऊ शकता.

**२) स्वतंत्रता आणि आत्मनिर्भरता :**

– सोलो ट्रॅव्हलमुळे निर्णयस्वातंत्र्य वाढते. कोणत्याही वेळापत्रकाचा किंवा इतरांच्या पसंतीचा विचार करण्याची आवश्यकता नसते.

– प्रवासात येणाऱ्या अडचणींवर स्वबळावर मात करताना आत्मविश्वास वाढतो आणि नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते.

**३) नवीन लोक आणि संस्कृतींची ओळख:**

– एकट्याने प्रवास करताना तुम्ही नवीन लोकांशी संवाद साधायला अधिक मोकळे होता. यामुळे वेगवेगळ्या संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली यांची जवळून ओळख होते.

– अनोळखी ठिकाणी स्थानिक लोकांशी गप्पा मारणे, त्यांच्या जीवनशैलीत सामील होणे, यामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडतो.

**४) भावनिक आणि मानसिक ताजेतवानी:**

– निसर्गाच्या सान्निध्यात किंवा नवीन ठिकाणी वेळ घालवल्यामुळे मानसिक ताण-तणाव कमी होतो.

– एकांतात प्रवास केल्याने मन शांत होते आणि नव्या ऊर्जा आणि दृष्टिकोनासह आयुष्याकडे पाहण्याची प्रेरणा मिळते.

## • सोलो ट्रॅव्हलची तयारी कशी कराल?

**योग्य ठिकाण निवडा:**

– पहिल्यांदा सोलो ट्रॅव्हल करत असाल तर सुरक्षित आणि सुलभ पोहोचता येईल अशा ठिकाणांची निवड करा.

– भारतात हिमाचल प्रदेश, गोवा, केरळ, राजस्थान, किंवा उत्तराखंड हे सोलो ट्रॅव्हलसाठी लोकप्रिय पर्याय आहेत.

**अग्रिम नियोजन करा:**

– प्रवासात कोणत्याही अडचणी टाळण्यासाठी हॉटेल बुकिंग, स्थानिक वाहतूक आणि आपत्कालीन संपर्क यांची माहिती आधीच मिळवा.

– प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रे (ओळखपत्र, विमा, तिकीट) नेहमी स्वतःसोबत ठेवा.

**सुरक्षेची काळजी घ्या:**

– एकटे प्रवास करताना आपल्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करू नका. स्थानिक नियम पाळा आणि आपल्या ठिकाणाची माहिती कुटुंबीयांना द्या.

– शक्य असल्यास GPS ट्रॅकिंग अॅप वापरा, जेणेकरून आपला ठावठिकाणा ओळखीच्या लोकांना कळेल.

**प्रवासासाठी आवश्यक वस्तू:**

– हलके आणि आवश्यक गोष्टी पॅक करा. कपडे, औषधे, मोबाईल चार्जर, पॉवर बँक यांची काळजी घ्या.

– तुमच्याकडे नेहमी थोडा अतिरिक्त रोख पैसा आणि डिजिटल पेमेंटची सुविधा ठेवा.

सोलो ट्रॅव्हलमधील आव्हाने आणि त्यावर उपाय

**एकटेपणा आणि संवादाचा अभाव:**

– काही वेळा एकटे प्रवास करताना एकटेपणा जाणवतो. यावर उपाय म्हणजे नवीन लोकांशी संवाद साधा, स्थानिक कार्यक्रमांत सहभागी व्हा.


– हॉटेल किंवा होमस्टेऐवजी हॉस्टेल्स मध्ये राहा, जिथे इतर सोलो ट्रॅव्हलर्स भेटतात.

**भाषेची अडचण:**

– स्थानिक भाषेचे ज्ञान नसल्यास संवाद साधताना अडचण येऊ शकते. यावर उपाय म्हणजे ट्रान्सलेशन अॅप्सचा वापर करा आणि मूलभूत शब्द शिकून जा.

**सुरक्षा चिंता:**


– प्रवासात अनोळखी लोकांवर सहज विश्वास ठेवू नका. महत्त्वाच्या वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवा आणि गर्दीच्या ठिकाणी सतर्क राहा.






# “ब्रिटिश” जेम्स बॉण्ड आता “अमेरिकन” होणार

**प्रत्येक देशाच्या चित्रपटांची खास ओळख असते. जसे की फ्रेंच चित्रपट, इटालियन चित्रपट, इराणी चित्रपट, चिनी चित्रपट इत्यादी. चित्रपट कथा, कथानक सांगण्याची पद्धत, taking, looknfeel, नट-नट्यांचे (दिसणे-असणे-भासणे) आणि अगदी संगीतसुद्धा. आपल्याकडे बॉलीवूड चित्रपटांची तशी वेगळी ओळख आहे.**



मनोरंजन
गायत्री चंदावरकर
राष्ट्रसंचार



देशांच्या या नामावलीत गेल्या आठवड्यापर्यंत नाव होतं ब्रिटिश जेम्स बॉण्ड चित्रपटांचं! आता मात्र अस्सल ब्रिटिश हेर आणि हेरगिरी करणारा चित्रपट म्हणून ओळखले जाणारे बॉण्ड पट आता अमेरिकन म्हणून ओळखले जाणार आहेत. कारण अॅमेझॉन आणि MGM स्टुडिओने हे अस्सल ब्रिटिश फ्रांच्यासी विकत घेतले आहे.

बॉण्ड चित्रपटांची जादू

१९६२ सालापासून ते २०२१ पर्यंत प्रदर्शित झालेल्या सगळ्या म्हणजेच पंचवीसही बॉण्ड चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर तुफान लोकप्रियता मिळवली. शॉन कॉनेरी, रॉजर मूर, टिमोथी डाल्टन, पिअर्स ब्रॉन्सन आणि डॅनियल क्रेग सारख्या मातब्बर नटांनी बॉण्ड चित्रपटांना शूर, धाडसी, रगेल, रंगेल आणि माचो (macho) हेरगिरी करणाऱ्या अशा हिरोंची वेगळी ओळख निर्माण केली.

बॉण्डपटांमध्ये हेरगिरी बरोबर आधुनिक तंत्रज्ञान तसेच विज्ञान कथेसारखा बाज असल्याने रंजकता, थरार, सृष्ट विरुद्ध दुष्ट असा संघर्ष आणि त्यात उत्तान ललनांचा वावर इत्यादी बाबींमुळे बॉण्डपट लोकप्रिय झाले नसते तरच नवल म्हणावे लागले असते.

बॉण्डपटांमधील कथा नाविन्यपूर्ण असे. त्यातही जगातल्या वेगवेगळ्या देशात शूटिंग केलं जात असे. या चित्रपटात जबरदस्त अॅक्शन, हाणामाऱ्या आणि तुफान गोळीबार दाखवला जाई. संगीतही अतिशय उत्कंठावर्धक आणि रोचक असे. इतकंच काय तर बॉण्डपटांची नावे देखील फार वेधक असत उदाहरणार्थ, From Russia With Love, Diamonds Are Forever, For Your Eyes Only, Licence to Kill, Tomorrow Never Dies, The World is Not Enough, Die Another Day, Quantum of Solace इत्यादी.

बॉण्ड या नायकाचा निर्माता आणि प्रॉडक्शन ब्रिटिश

इयान फ्लेमिंग या ब्रिटिश लेखकाने कॅसिनो रोयाल नावाची कादंबरी लिहिली.

दुसऱ्या महायुद्धानंतर मित्र राष्ट्रांच्यातील राजकीय समीकरण बदलले आणि रशिया हा नंबर एकचा शत्रू बनला तो आजतागायत. त्यामुळेच, मग 007 कोड असलेला ब्रिटिश गुप्तहेर संघटना MI16 साठी काम करणारा शूर, धाडसी आणि क्लृप्त्या वापरणारा हेर असा नायक फ्लेमिंग यांनी रंगवला आणि तो नायक वाचकांना फार आवडला. मग काय, काही ब्रिटिश निर्मात्यांनी फ्लेमिंग कडून मालकीहक्क विकत घेतले आणि चक्क १९६२ पासून चित्रपट निर्मिती सुरु केली आणि बॉक्स ऑफिसवॉर धुमाकूळ घालणारे चित्रपट दार तीन-चार वर्षांनी येऊ लागले.

बॉण्ड चित्रपटांचे अमेरिकीकरण आणि हॉलीवूडीकरण आता निश्चित

आत्तापर्यंतचा प्रत्येक बॉण्डपट हा खास ब्रिटिश चित्रीकरण तसेच  चित्रभाषा यामुळे वैशिष्ट्यपूर्ण असे. आता मात्र बॉण्डपट हा ब्रिटीश बाज हरवणार यात शंका नाही. कारण हॉलीवूड मधील दिग्दर्शक आता हे चित्रपट दिग्दर्शित करणार. खरे तर गेल्या वर्षी ऑस्कर जिंकणारा क्रिस्तोफर नोलन याने ब्रिटिश निर्मात्यांना नवी बॉण्ड कथा ऐकवली होती. मात्र अमेरिकन दिग्दर्शक नको म्हणून त्यांनी नोलन सारखया ताकदीच्या आणि सिद्धहस्त दिग्दर्शकाला नाकारले. अर्थातच तेव्हा कराल काळाची कठोरता त्यांना तेव्हा माहित नव्हती. अमेरिकेतील चार प्रचंड मोठया टेक कंपन्यांची आर्थिक-राजकीय-तंत्रज्ञानातील ताकद अफाट आहे. त्यामुळे, कंपन्या विकत घेणे हे त्यांच्यासाठी फारच सोपे आहे. तीव्र स्पर्धा असणाऱ्या व्यापारी-व्यवसायिक जगतात असे म्हटले जाते की “either you eat breakfast or be breakfast” (एकतर तुम्ही नाश्ता करा नाहीतर तुमचाच नाश्ता होऊन दुसरी मोठी कंपनी तुम्हांला गिळंकृत करेल).

हॉलिवूडचे चित्रपट वाईट असतात का? अजिबात नाही. मात्र त्यांची चित्रभाषा, त्यांची कथनाची पद्धत, चित्रीकरण पद्धती खूप वेगळी आहे. तसेच त्यांची आर्थिक-राजकीय-व्यावहारिक समीकरणे देखील फार वेगळी असतात. त्यामुळे अस्सल ब्रिटिश बाज जाऊन पुढे येणारे बॉण्ड पट हे तद्दन अमेरिकन आणि त्यातही हॉलिवूडचा बाज घेऊन येणार यात शंका नाही.

पुढे येणारे बॉण्ड पट आता अधिकच हिंसा दाखवणारे असणार, अधिकच अश्लीलता असू शकेल आणि एकंदरीत कथा आणि कथनातून वेगळी राजकीय समीकरणे दाखवली जातील. आत्तापर्यंत हॉलिवूड मध्ये अनेक FBI आणि CIA वर आधारित असंख्य चित्रपट आले आहेत. त्यातील अनेक गाजले आहेत. त्यामुळे बॉण्ड franchise विकत घेऊन FBI आणि CIA सारख्या गुप्तहेर संघटनांभोवती कशी कथा आणि कथानक आकार घेईल हे बघणं रंजकतेचं ठरेल. बाकी ऍक्टींग, संगीत आणि प्रोडक्शनचा दर्जा उत्तम असणार यात शंका नाही. येणाऱ्या काळाची पावलं ओळखण्यात हॉलिवूड फार पुढे आहे. त्यामुळे, ते लेडी बॉण्ड आणण्याची शक्यता आहे. तसे झाले तर बॉण्डपट अधिक रंजक होतील आणि येणारा काळ घडवणारे असतील.



# कडुनिंब केसांसाठी फायदेशीर



कडुलिंबाच्या पानांमध्ये अद्भुत औषधी गुणधर्म आहेत, ज्याचे असंख्य फायदे आहेत. कडुलिंब केसांसाठी देखील खूप फायदेशीर आहे. केसांच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना निरोगी ठेवण्यासाठी कडुलिंबाचे पाणी वापरले जाऊ शकते. परंतु कडुलिंबाच्या पाण्याचा पूर्ण फायदा घेण्यासाठी त्याचा योग्य वापर करणे महत्वाचे आहे.

## कडुलिंबाच्या पाण्याचे फायदे

कडुलिंबाच्या पाण्यात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ, अँटीफंगल आणि अँटीइंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. हे केस आणि टाळूसाठी खूप फायदेशीर आहे.

कडुलिंबाच्या पाण्याचे काही फायदे येथे आहेत:

१) कोंडा दूर करते : कडुलिंबाच्या पाण्यात अँटीफंगल गुणधर्म असतात जे कोंडा दूर करण्यास मदत करतात.

२) केस गळणे कमी करते: कडुलिंबाचे पाणी टाळूला पोषण देते, ज्यामुळे केस गळणे कमी होते.

३) केस मजबूत करते: कडुलिंबाचे पाणी केसांना मजबूत आणि दाट बनवते.

४) टाळू निरोगी ठेवते : कडुलिंबाचे पाणी टाळू स्वच्छ करते आणि निरोगी ठेवते.

५) नैसर्गिक कंडिशनर : कडुलिंबाचे पाणी नैसर्गिकरित्या केसांना कंडीशनिंग करते आणि ते चमकदार बनवते.

## कडुलिंबाचे पाणी कसे वापरावे

१. कडुलिंबाच्या पाण्याने केस धुवा

एका भांड्यात पाणी घ्या, त्यात कडुलिंबाची पाने घाला आणि उकळा. पाणी थंड होऊ द्या आणि नंतर पाने काढून टाका आणि पाणी गाळून घ्या. शाम्पू केल्यानंतर, या पाण्याने केस धुवा.

यामुळे केस गळणे आणि कोंडा कमी होण्यास मदत होईल.

२. कडुलिंबाच्या पाण्याचा केसांचा मास्क

कडुलिंबाची पाने बारीक करून पेस्ट बनवा. या पेस्टमध्ये थोडे दही आणि मध मिसळा आणि केसांना लावा. अर्ध्या तासाने केस धुवा. यामुळे केस मजबूत आणि चमकदार होण्यास मदत होईल.

३. कडुलिंबाचे पाणी टोनर

कडुलिंबाचे पाणी एका स्प्रे बाटलीत भरा. केसांवर आणि टाळूवर स्प्रे करा. यामुळे टाळू निरोगी राहण्यास आणि केसांना पोषण मिळण्यास मदत होईल.

कडुलिंबाचे पाणी वापरण्यापूर्वी, तुम्हाला त्याची अॅलर्जी नाही याची खात्री करा. जर तुमची टाळू संवेदनशील असेल तर कडुलिंबाचे पाणी वापरण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.





# ट्रोलर्सवर बरसला वीर



वीर पहाडिया या अभिनेत्याला आतापर्यंत चित्रपटातील अभिनयापेक्षा ट्रोलिंगचा जास्त सामना करावा लागला आहे. कधी त्याची तुलना करण सिंग ग्रोव्हरशी केली गेली तर कधी लंगड्या डान्ससाठी त्याची खिल्ली उडवली गेली. इतकंच नाही तर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये जीन्स घातल्याबद्दल त्याला ट्रोलही करण्यात आले होते. या वर्षी त्याने 'स्काय फोर्स' या चित्रपटाद्वारे पदार्पण केले. मात्र अलिकडेच त्याने मौन सोडले आहे. यात त्याने ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. व्हिडिओमध्ये निळ्या रंगाच्या बूट कट जीन्स आणि ब्लॅक हुडीमध्ये दिसल्याने त्याला ट्रोलर्सचा रोष सहन करावा लागला होता. या व्हिडिओवर अनेक मीम्सही व्हायरल झाले. मात्र आता वीर पहाडियाने लेडीज जीन्सबाबत केलेल्या कमेंटवर प्रतिक्रिया देताना सांगितले की. या जीन्स ९० च्या दशकात लोकप्रिय होत्या आणि अनेक सुपरस्टार त्या परिधान करायचे. वीर पुढे म्हणाला, 'या जीन्स कुठल्या आहेत हे तुम्हाला माहीत आहे का? कारण तेव्हा अशा जीन्स सलमान खान वापरत असे.' तेव्हा हे स्पष्ट करुन एकाअर्थी त्याने सलमान खानच्या प्रेमींना सुखावले असून दुसरीकडे आपल्यावर टीका करणाऱ्यांची तोंडे बंद केली आहे. आपण जाणतो की 'स्काय फोर्स' हा वर्षातील पहिला हिट चित्रपट होता. व्यापारी संजय पहाडिया यांचा धाकटा मुलगा आणि शिखर पहाडियाचा भाऊ असणाऱ्या वीर पहाडिया याने स्क्वाड्रन लीडर टी विजय (टेडी) ची भूमिका 'स्काय फोर्स'मध्ये साकारली होती. भूमिका काही मिनिटांची असली तरी तिने लोकांचे लक्ष वेधून घेतले होते. अक्षय कुमार आणि सारा अली खान स्टारर या चित्रपटाने जवळपास १३० कोटींची कमाई केली होती. तेव्हा त्यांच्याबरोबरच्या अनुभवातून समृद्ध झालेला वीर यापुढील चित्रपटांमध्ये अधिक दमदार अभिनय करेल आणि विनाकारण टीका करणाऱ्यांना जागा दाखवेल, असे वाटते.

# ओटीटीवर मनोरंजनाचा वसंत



प्लॅटफॉर्मसाठी फेब्रुवारीचा शेवटचा आठवडा खूप महत्त्वाचा असून या काळात चाहते अनेक वेब सीरीज आणि चित्रपट रिलीज होण्याची वाट पाहत आहेत. या आगामी ओटीटी रिलीजमध्ये तुम्हाला ॲक्शन आणि सस्पेन्सचा संपूर्ण थरार पाहायला मिळेल. यादीवर एक नजर टाकू या. 'जिद्दी गर्ल्स' या वेबसिरीजमध्ये पाच जिद्दी मुलींच्या उत्साहाची आणि उत्कटतेची कहाणी पाहायला मिळत आहे. 'जिद्दी गर्ल' प्राइम व्हिडिओ (अमेझॉन प्राइम व्हिडिओ) वर ऑनलाइन प्रदर्शित होईल. दुसरीकडे नेटफ्लिक्सवर 'डब्बा कार्टेल' ही वेब सीरिज क्राइम आणि सस्पेन्स थ्रिलर घेऊन येत आहे. ही मल्टीस्टारर मालिकेत शबाना आझमी, ज्योतिका, शालिनी पांडे, गजराव असे अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. खेरीज बॉबी देओल स्टारर वेब सीरिज 'आश्रम'ची चाहत्यांमध्ये खूप क्रेझ आहे. या मालिकेच्या तिसऱ्या सीझनचा भाग रिलीजसाठी सज्ज आहे. याच्या ट्रेलरने प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे. त्यामुळे ही मालिकाही रसिकांचे चांगले मनोरंजन करेल.

सस्पेन्स आणि ॲक्शन थ्रिलर वेब सीरिज 'रिचर'चा तिसरा सीझन अलिकडेच रिलीज झाला. तथापि, या सीझनच्या तीन भागांनंतर दर आठवड्याला एक नवीन भाग प्रसारित केला जाईल. त्या अंतर्गत 'रिचर ३' चा चौथा भाग चर्चेत आहे. खेरीज पहिल्या सीझनच्या अफाट यशानंतर निर्माते सस्पेन्स थ्रिलर वेब सिरीज 'सुझल'चा सीझन २ घेऊन येत आहेत. अलीकडेच, त्याचा उत्कृष्ट ट्रेलर रिलीज झाला आणि त्याने चाहत्यांना प्रभावित केले. तेव्हा तुम्हालाही सस्पेन्स थ्रिलर पाहण्याची आवड असेल तर प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणारी ही मालिका चुकवू नका. त्याचबरोबर 'लव्ह अंडर कन्स्ट्रक्शन' या साउथ सिनेमाच्या रोमँटिक कॉमेडी वेब सिरीजही उत्सुकता वाढवत आहे. तेव्हा तुम्हीही ओटीटीवरील हा वसंत अनुभवा आणि मनोरंजनचा आनंद घ्या.



# 'छावा'ने उडवली चर्चेची राळ

विकी कौशल आणि रश्मिका मंदान्ना स्टारर 'छावा' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असून त्याला जगभरातील चाहत्यांचे प्रेम मिळत आहे. मात्र त्यात दाखवलेल्या काही दृश्यांवर आक्षेप घेत काही लोकांनी गुन्हा दाखल केल्याची बातमीही 'छावा'शी जोडली जात आहे. गणोजी आणि कान्होजी शिर्के यांच्या वंशजांनी हा गुन्हा दाखल केला असल्याने नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. चित्रपटात आपल्या पूर्वजांना देशद्रोही दाखवण्यात आले असून, ऐतिहासिक तथ्यांशी छेडछाड केली जात असल्याचे त्यांचे म्हणणे वादळ उठवणारे ठरु शकते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दिग्दर्शकानेही याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर तसेच निर्मात्यांनी गणोजी आणि कान्होजी शिर्के यांच्या वंशजांनी माफी मागावी अशी मागणी केली होती. या दोन्ही ऐतिहासिक व्यक्तिरेखा चित्रपटात चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आल्याचा आरोप केला होता. हे दोघे छत्रपती संभाजी महाराजांचे निष्ठावान सैनिक असल्याचे त्यांनी सांगितले होते. या पार्श्वभूमीवर गणोजी आणि कान्होजी यांचे वंशज भूषण शिर्के यांनी लक्ष्मण उत्तेकर यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले आणि त्यांना जाहीर माफी मागण्याची विनंती केली. दिग्दर्शकाने यावर मोठे पाऊल उचलले आणि आरोपांवर प्रतिक्रिया देताना लक्ष्मण उत्तेकर यांनी भूषण शिर्के यांची माफी मागितली. चित्रपटात गणोजी आणि कान्होजी या आडनावांचा उल्लेख नाही, तसेच त्यांच्या गावाचे नावही सार्वजनिकरित्या घेतलेले नाही, असे ते म्हणाले. उत्तेकर पुढे म्हणाले, 'कोणत्याही व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या भावना दुखावण्याचा आमचा हेतू नव्हता. या चित्रपटामुळे कोणाचे मन दुखावले गेले असल्यास मी खेद व्यक्त करतो.' मात्र या माफीनाम्यानंतरही गणोजी आणि कान्होजींचे तेरावे वंशज लक्ष्मीकांत राजे शिर्के यांनी चित्रपटाविरोधात कायदेशीर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले असून त्यांनी निर्मात्यांना नोटीसही पाठवली आहे. तेव्हा आमच्या वंशजांचे अचूक चित्रण न केल्यास १०० कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल करण्याचे त्यांचे वक्तव्य पुढे कोणते वळण घेते हे बघावे लागेल.

# ...म्हणून शो सोडला




दीपिका कक्कर नामक टेलिव्हिजन इंडस्ट्रीतील प्रसिद्ध चेहरा कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे सतत चर्चेत असतो. तिने अनेक टीव्ही शोमध्ये काम केले आहेच मात्र अलीकडेच 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या रिॲलिटी शोद्वारे तिने रुपेरी पडद्यावर केलेले पुनरागमनही गाजले. पण नंतर तिने हा शो सोडत असल्याची घोषणाही केली. अलिकडेच तिने यामागील कारणांचा उघड केला आहे. दीपिका कक्करने एका ब्लॉगमध्ये 'सेलिब्रिटी मास्टरशेफ इंडिया'मधील आपल्या प्रवासाबद्दल सांगितले. 'दिवसभर शूट करायचे होते. दुसरीकडे वेदना वाढत होत्या. म्हणून मी डॉक्टरकडे गेले आणि सोनोग्राफी केल्यावर कळले की माझ्या लिम्फ नोड्समध्ये काही समस्या आहेत. नंतर मी औषधांचा कोर्स सुरू असतानाही शोमध्ये आव्हान स्विकारण्याचे काम सुरू ठेवले. पण तरीही वेदना न शमल्याने एमआरआय करवून घेतला. त्यात आढळून आलेल्या समस्येपासून दूर होण्यासाठी उपचाराची प्रक्रिया संथ आहे. त्यामुळेच मी १२ फेब्रुवारी चा शेवटचा एपिसोड करुन मालिकेचा निरोप घेतला...' तिला लवकर दुखण्यापासून आराम मिळो, हीच चाहत्यांकडून शुभेच्छा.



# मैदानावर चर्चा उर्वशीची

आपल्या फॅशन सेन्स आणि स्टेटमेंटमुळे चर्चेत असणारी उर्वशी रौतेला क्रिकेटची मोठी चाहती आहे. ती अनेकदा क्रिकेट सामन्यांचा आनंद लुटताना दिसते. अलीकडेच, ती भारतीय क्रिकेट संघाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारत-पाकिस्तान सामना पाहण्यासाठी दुबई स्टेडियममध्ये पोहोचलेली दिसली. २३ फेब्रुवारीला दुबईत भारत-पाकिस्तानदरम्यानचा हा बहुप्रतिक्षित सामना झाला. तो पाहण्यासाठी भारतीय चाहत्यांसोबतच अनेक सेलिब्रिटीही स्टेडियममध्ये पोहोचले होते. त्यापैकी एक उर्वशी रौतेलाही होती. ती क्रिकेट स्टेडियमच्या प्रेक्षक गॅलरीत उभी राहून संघाचा जयजयकार करताना दिसली. यादरम्यान तिला एक सरप्राईजही मिळाले. तिच्या वाढदिवसाआधी एका चाहत्याने अप्रेक्षक गॅलरीत तिच्यासाठी वाढदिवसाचा केक आणला होता. त्यासोबत अभिनेत्री पोज देताना दिसली. नंतर उर्वशीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओही शेअर केला. क्लिपसोबत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'वाढदिवसाच्या सरप्राईजबद्दल धन्यवाद.' त्यानंतर या व्हिडिओवर चाहत्यांच्या मजेशीर प्रतिक्रिया बघायला मिळाल्या. झोमॅटोनेही टिप्पणी केली, 'भारत पाकिस्तान सामन्यादरम्यान केक खाणारे पहिले सेलिब्रिटी...' त्याचवेळी एका यूजरने म्हटले की, 'जगातील पहिली महिला जिने भारत आणि पाकिस्तान सामन्यादरम्यान आपला वाढदिवस साजरा केला.' दुसरीकडे एकजण म्हणाला, 'भारत-पाकिस्तान सामना चांगला चालला आहे पण 'डाकू महाराज' यापेक्षा मोठा ब्लॉकबस्टर आहे.



# 'स्पायडर-मॅन ४'च्या जाळ्यात...



टॉम हॉलंडचे चाहते त्याला पुन्हा एकदा पडद्यावर पाहण्यासाठी आतुर आहेत. हा अभिनेता त्याच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असतो. त्यामुळेच त्याच्या प्रसिद्ध स्पायडर-मॅन फ्रँचायझीचा चौथा भागाच्या रिलीजच्या बातम्या चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. हा चित्रपट डेस्टिन डॅनियल क्रेटन दिग्दर्शित करणार आहे. 'स्पायडर-मॅन ४' २४ जुलै २०२६ रोजी रिलीज होणार असल्याचे 'सोनी पिक्चर्स' ने सुरुवातीला जाहीर केले होते. मात्र आता रिलीज डेटमध्ये मोठा बदल होत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. नवीन रिलीजच्या तारखेबद्दल 'स्पायडर-मॅन ४' आता ख्रिस्तोफर नोलनच्या 'द ओडिसी'नंतर काही वेळाने थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. तेव्हा 'स्पायडर-मॅन: होमकमिंग' (२०१७), 'स्पायडर-मॅन: फार फ्रॉम होम' (२०१९), आणि 'स्पायडर-मॅन: नो वे होम' (२०२१) नंतर आता नवीन काय बघायला मिळते, हे लवकरच कळेल. खेरीज चाहत्यांना क्रिस्टोफर नोलनच्या आगामी चित्रपट 'द ओडिसी' चीही प्रतीक्षा आहे.

# नव्याच्या निमित्ताने जुन्याची चर्चा



धक्कादायक ॲक्शन आणि पॉवर पॅक्ड डायलॉग्स असणाऱ्या चित्रपटांच्या यशाचा मार्ग त्यामानाने सुकर असतो कारण ते रसिकांना लवकर अपील होत असल्याचे मनोरंजनविश्वाचा इतिहास सांगतो. मात्र सध्या या चौकटीत नसणारा एक चित्रपट फिल्म कॉरिडॉरमध्ये खळबळ उडवून देताना दिसत आहे. ज्यात ना कोणी नायक आहे ना कोणता रोमान्स; ना कोणती कारवाई ना कोणी गुंड. तरीही या चित्रपटाने भल्याभल्यांनाही विचार करायला भाग पाडल्याचे दिसत आजे. होय, अगदी बरोबर... ही चर्चा सान्या मल्होत्राच्या 'मिसेस' या बहुचर्चित चित्रपटाबद्दल सुरू आहे. आमिर खानबरोबर 'दंगल'मध्ये दिसलेली सान्या मल्होत्रा सध्या 'मिसेस' मुळे चर्चेत आहे. या भूमिकेबद्दल तिचे भरभरुन कौतुक होत असल्याचे सोशल मीडियावरील सर्व रीलवरुन दिसून येते. सान्याच्या प्रसिद्धीदरम्यान तिच्या दोन जुन्या चित्रपटांची चर्चाही वाढली आहे कारण तिचे 'पगलाईट' आणि 'मीनाक्षी सुंदरेश्वर' हे जुने चित्रपटदेखील नेटफ्लिक्सच्या टॉप १० मध्ये वेगाने पुढे जात आहेत. तेव्हा तुम्हालाही नेटफ्लिक्सवर सान्याच्या सुंदर आणि अतिशय दमदार अभिनयाने नटलेल्या या चित्रपटांचा आनंद घेता येईल.

# संजूबाबाचा सत्संग



बॉलीवूड अभिनेता संजय दत्तने बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याबद्दल अनेकदा आदर व्यक्त केला आहे. बाबा बागेश्वर यांना तो आतापर्यंत अनेकदा भेटला आहे. अलिकडेच संजय दत्तने पुन्हा एकदा त्यांची स्तुती केली असून मी नेहमीच त्यांच्यासोबत राहणार असल्याचे म्हटले आहे. इतकेच नव्हे तर 'बागेश्वर धाम मेडिकल अँड रिसर्च सेंटर'च्या २३ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने, ते समाजातील प्रत्येक घटकासाठी मनापासून काम करत असल्यामुळे मी बाबाजींच्या पाठीशी सदैव असेन, असे म्हटले आहे. काही आठवड्यांपूर्वीच संजय दत्तने बाबा बागेश्वरसोबतचा फोटो शेअर केला होता. त्याने पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते,'श्री धीरेंद्र शास्त्रीजी माझ्या घरी आले आणि आम्हा सर्वांना आशीर्वाद दिला. आता गुरुजी आणि मी एका कुटुंबासारखे आहोत. जय भोले नाथ, हा माझ्यासाठी मोठा सन्मान आणि आशीर्वाद होता.'

# जीवनाची हमी देण्याचे काम करुया : पवार

## स्वास्थ्य शिबिरात विशेष तपासणी मोहीमेचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासन प्रत्येक बालकांचे आरोग्य व उज्ज्वल भविष्याची जबाबदारी पूर्ण निष्ठेनी पार पाडेल; सर्वांनी मिळून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत आयोजित विशेष तपासणी मोहीम यशस्वी करुया व या माध्यमातून प्रत्येक बालकांना सशक्त आणि निरोगी जीवनाची हमी देण्याचे काम करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

औंध येथील इंदिरा गांधी मॉडेल स्कूल येथे आयोजित राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत विशेष तपासणी मोहीमेचा शुभारंभ आणि राज्यस्तरीय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे (दूरदृष्यप्रणीलीद्वारे) तर व्यासपीठावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, पुणे महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, शहरी आरोग्य सेवा संचालक डॉ. स्वप्नील लाळे, अतिरिक्त संचालक डॉ. बबिता कमलापूरकर आदी उपस्थित होते.




- बालकांचे आरोग्य एखाद्या कुटुंबापुरते मर्यादित नसून ते समाज, देशाच्या उज्ज्वल भविष्याकरीता महत्वाचे असते. त्यामुळे राज्यातील बालके सदृढ असली पाहिजे,
- आरोग्य चांगले असले पाहिजे, अभ्यासात प्राविण्य मिळवले पाहिजे, यापद्धतीने सुदृढ व जबाबदार नागरिक घडविण्याचे काम केले पाहिजे.
- बालकांना जन्मजात कुपोषण, ॲनेमिया, डोळे व दाताचे आजार, हृद्यरोग, कुष्ठरोग आदीप्रकारचे आजार असतात त्यामुळे त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते..
- या मोहिमेचा माध्यमातून अशा बालकांवर शासकीय रुग्णालय, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत असलेल्या रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टराद्वारे वेळेत उपचार, शस्त्रक्रिया करण्यात येणार.



**सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील ० ते १८ वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. याअंतर्गत ६ हजार शाळांमधील १४ लाख विद्यार्थी आणि ३० हजार अंगणवाडीतील २० लाख बालकांची डोक्यापासून ते नखा पर्यत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे.**

**— अजित पवार**
उपमुख्यमंत्री

# शरद तळवलकर स्मृती करंडक दीर्घांक स्पर्धा २०२५ चे आयोजन

मराठी रंगभूमीची मध्यवर्ती संघटना
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

**पुणे :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पुणे शाखा, नव्या जुन्या रंगकर्मींसाठी सतत नवे नवे उपक्रम आयोजित करून सर्वांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य करत असते. त्याचबरोबर कलाकारांच्या अडी - अडचणीच्या वेळी त्यांना अनमोल सहकार्य करत असते. यावर्षीपासून, रंगकर्मींना नवे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आणि त्यांना अडी - अडचणीच्या वेळी त्यांना अनमोल सहकार्य करता यावे या उद्देशाने, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पुणे शाखा, एक दीर्घांक स्पर्धा भरवत आहे. ही स्पर्धा, ज्येष्ठ अभिनेते शरद तळवलकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ असेल. ज्याचे नांव शरद तळवलकर स्मृती करंडक दीर्घांक स्पर्धा २०२५ असे असेल. ही स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्प्यात होईल. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी भाग घेणाऱ्या प्रत्येक संघाने त्याच्या दीर्घांकाचे, व्हिडिओ शूटिंग करून त्याचा पेन ड्राइव्ह आयोजकांकडे पाठवायचा आहे. हे शूटिंग तालीम स्वरूपातील असेल तरीही चालू शकेल. ते अगदी साध्या पद्धतीने दिवसा उजेडी शूट केलेलं असावे. दोन किंवा तीन कॅमेरा सेटअप लावून शूट केलेले किंवा एडिटिंगच्या खूप कल्पत्या वापरून केलेलं शूटिंग नसावं. सादरीकरण कमीत कमी ७५ मिनिटांचे आणि जास्तीत जास्त ९० मिनिटांचे असावे. प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी १५ संघ निवडले जातील आणि अंतिम फेरी २६ मे ते ३० जून २०२५ रोजी भरत नाट्य मंदिर पुणे येथे होईल. प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १५ एप्रिल असून पेन ड्राईव्ह पोहचविण्याची अंतिम तारीख २० एप्रिल आहे.

# संजोग वाघेरेंच्या पत्नीची राष्ट्रवादीच्या बैठकीला हजेरी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेचे (ठाकरे) प्रभारी शहरप्रमुख संजोग वाघेरे यांच्या पत्नी, महापालिका स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा उषा वाघेरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या शहर कार्यकारिणीच्या बैठकीला हजेरी लावली. उषा वाघेरे यांनी लोकसभा निवडणुकीत पती संजोग वाघेरे यांचा प्रचार केला होता.

वाघेरे पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष पदही भूषविले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अतिशय निकटवर्तीय अशी त्यांची ओळख आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी पवार यांची साथ सोडली. शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश केला. या पक्षाकडून त्यांनी मावळमधून लोकसभेची निवडणूक लढविली. शिवसेनेच्या (शिंदे) श्रीरंग बारणे यांना कडवी झुंज दिली. पण, अपयश आले.

- १) विधानसभा निवडणुकीनंतर वाघेरे पुन्हा स्वगृही राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात जाणार असल्याची चर्चा सुरू असताना ७ फेब्रुवारी रोजी त्यांची शहर शिवसेनेच्या (ठाकरे) प्रभारी शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- २) लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात वाघेरे यांच्या पत्नी उषा वाघेरे सक्रिय होत्या. त्यांनी आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या बैठकीला हजेरी लावल्याने वाघेरे हे पुन्हा स्वगृही परतण्याची चर्चा सुरू झाली आहे.
- ३) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आरोप करून चिंचवड विधानसभेची निवडणूक अपक्ष लढलेले भाऊसाहेब भोईर हे देखील राष्ट्रवादीच्या बैठकीला हजर होते.

'उषा वाघेरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला नाही. माझ्यासोबत त्या व्यासपीठावर उपस्थित नव्हत्या. लोकसभेला त्यांनी माझा प्रचार केला. परंतु, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडला नव्हता आणि नाही'.

**- संजोग वाघेरे**
प्रभारी शहरप्रमुख
शिवसेनेचे (ठाकरे)

# 'हाय सिक्युरिटी नंबरप्लेट' साठी ३० एप्रिलची डेडलाईन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सन २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या जुन्या वाहनांना अत्याधुनिक अशी 'उच्च सुरक्षा पाटी' (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट) ३० मार्चपूर्वी बसविणे अनिवार्य करण्यात आले होते. त्याला आता ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

यासाठी राज्य सरकारकडून तीन कंपन्यांना टेंडर देण्यात आले आहे. त्यानुसार पुणे प्रादेशिक परिवहन विभागात उच्च सुरक्षा पाटी बसवण्याचे काम सुरू असून, त्याला वाहनधारकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शिवाय याला एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन आयुक्तांकडून देण्यात आली.

देशातील सर्व वाहन उत्पादक कंपन्यांना १ एप्रिल २०१९ पासून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट देणे बंधनकारक केले आहे. तेव्हापासून नव्याने वाहन खरेदी केल्यानंतर या नंबरप्लेट उपलब्ध होतात. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार करण्यात आली आहे. एप्रिल २०१९ नंतर बाजारात येणाऱ्या सर्व वाहनांना ती अनिवार्य आहे. तसेच २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांनादेखील परिवहन विभागाने उच्च सुरक्षा पाटी (एचएसआरपी) बंधनकारक केले आहे. त्यानुसार ३० एप्रिलपर्यंत हाय सिक्युरिटी नंबरप्लेट लावून घ्यावी लागणार आहे, असे आवाहन पुणे आरटीओकडून करण्यात आले आहे.

**हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेटचे कमिटीने निश्चित केलेल्या नियमानुसार दर निश्चित केले आहेत. इतर राज्यांतील दर आणि राज्यातील दर यामध्ये तफावत नाही. वाहनधारकांनी २०१९ पूर्वीच्या वाहनांना नंबरप्लेट बसवून घ्यावी. याला ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे.**

**- विवेक भीमनवार,**
परिवहन आयुक्त




- वाहन प्रकार इतर राज्यातील जीएसटी वगळून दर राज्यातील जीएसटी वगळून दर
- राज्य दुचाकी ४२० ते ४८० ४५०
- तीनचाकी ४५० ते ५५० ५००
- चारचाकी ६९० ते ८०० ७४५
- जड वाहने ६९० ते ८०० ७४५

# मुलींना मोफत कर्करोग प्रतिबंधक लस देण्याचा निर्णय



**सांगवी :** राज्यातील सर्व मुलींना शासनातर्फे गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधक लस मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली. राज्याचे अर्थमंत्री लवकरच त्यासाठी आवश्यक तरतूद करून घोषणा करतील, असेही त्यांनी सांगितले. अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिरात त्यांनी ही घोषणा केली. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार उमा खापरे, , माजी महापौर माई ढोरे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संपर्क प्रमुख मिलिंद देशपांडे तसेच शत्रुघ्न काटे, नामदेव ढाके, विलास मडिगेरी, राजेंद्र राजापुरे, शशिकांत कदम, सागर आंगोळकर, हर्षल ढोरे, बाबा त्रिभुवन, चेतन भुजबळ,आदी उपस्थित होते. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन केल्याबद्दल संयोजकांचे कौतुक केले. मतदार संघाच्या विकासाबरोबरच लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारा लोकप्रतिनिधी मिळणे हे भाग्याचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या, 'मी लक्ष्मणभाऊंसोबत काम केले आहे आणि आमदार शंकर जगताप यांच्या कार्यशैलीत त्यांची झलक दिसते.'

# अटल महाआरोग्य शिबिरास 'रेकॉर्ड ब्रेक' प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी सांगवी :** लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिराला शनिवारी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर आयोजित या शिबिरात पहिल्याच दिवशी पन्नास हजार नागरिकांनी हजेरी लावत मोफत आरोग्य तपासणी व उपचारांचा लाभ घेतला. महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि अटल चॅरिटेबल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, महा शिबिराचे मुख्य संयोजक व पिंपरी-चिंचवड भाजपचे अध्यक्ष आमदार शंकर जगताप यांनी ही माहिती दिली.

शिबिराचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पार पडले. शिबिरात कॅन्सर तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे, रक्त तपासण्या, डायलिसिस, नेत्ररोग तपासणी, कृत्रिम अवयव वाटप यांसारख्या मोफत सेवा पुरविण्यात आल्या



# ज्योतिष अभ्यासक केंजळे,गौरी केंजळे यांना 'रोटरी सन्मान'



**पुणे :** पुण्यातील ज्योतिष अभ्यासक कैलास केंजळे आणि सौ.गौरी केंजळे यांना ज्योतिष क्षेत्रातील योगदानाबद्दल 'रोटरी सन्मान-२०२५'जाहीर झाला आहे.रोटरी क्लब ऑफ नागपूर इलाईट, रोटरी क्लब ऑफ नागपूर एन्कलेव्ह,रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजन, रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ,विदर्भ संशोधन मंडळ यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येणार आहे. दि.३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी पावणे सात वाजता विदर्भ संशोधन मंडळ येथे हा कार्यक्रम होणार आहे. प्रांतपाल रजिंदरसिंग खुराणा यांनी ही माहिती दिली. याच कार्यक्रमात उभयतांची 'विस्मयकारक ज्योतिष विश्व' या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.कैलास केंजळे आणि गौरी केंजळे हे गौरीकैलास ज्योतिष संस्थेचे संस्थापक असून या क्षेत्रात ३ दशकाहून अधिक काळ कार्यरत आहेत.

# विवाहास नकार दिल्याने तरुणाची आत्महत्या

**पुणे :** विवाहास नकार दिल्याने तरुणाने रेल्वेखाली आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागात नुकतीच घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणे, तसेच त्याच्याकडून वेळोवेळी पैसे घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी एका तरुणीविरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.गणेश राजू सिंग (वय ३०, रा. गोसावी वस्ती, वैदुवाडी, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी एका तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गौरी राजेंद्र कांबळे (वय ३३, रा. इंदिरानगर, ससाणेनगर, हडपसर) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' चे पाद्यपूजन


## तमाम शिव-शंभू प्रेमींच्या संकल्पाची पूर्तता




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोशी :** हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. राज्यातील शिव-शंभू प्रेमी युवकांचे प्रेरणास्थान म्हणून नावारुपाला येणाऱ्या या "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" चे पाद्यपूजन विधीवत करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा प्रखर हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी- मोशी येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा उभारण्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याच्या चौथऱ्याचे झाले आहे. त्यामुळे पुतळा ज्या ठिकाणी उभारला जाणार आहे. त्या ठिकाणी पाद्यपूजन करण्यात आले..



'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' अर्थातच छत्रपती संभाजी महाराज यांचा सर्वात उंच पुतळा उभारण्याचे भाग्य लाभले, याचे समाधान वाटते. पिंपरी-चिंचवडकरांसह संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटेल, असा भव्य पूर्णाकृती पुतळा साकारत आहे. शंभू सृष्टीसुद्धा आहे. हा पुतळा हिंदू धर्म आणि संस्कृती संरक्षणाची कायम प्रेरणा देत राहील.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड

### ... असा आहे 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'

- छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची १४० फूट उंची
- चौथऱ्यांची उंची ४० फूट
- सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पुतळा १० फूट
- सरदार आणि मावळे एकूण १६ पुतळे प्रत्येकी १० फूट
- ओपन एअर थिएटर, प्रमुख प्रसंगांवर आधारित ब्रॉंझ म्यूरल्स
- शंभुराजांची गाथा ऐकण्या-साठी एलईडी स्क्रीन
- चलचित्र, प्रकाश योजना, हॉलोग्राफिक प्रेझेंटेशन व्यवस्था.



## वाचनासाठी पायपीट करणारा अनोखा अवलिया

**शिक्रापूर :** पिंपळे खालसा ता. शिरुर येथील दादासाहेब गोडसे यांना वाचनाचा छंद असून वृत्तपत्र वाचनासाठी दररोज पहाटे पाच सहा किलोमीटर पायी प्रवास करुन ते वाचन संस्कृती जपत शालेय मुलांना देखील मदत आणि मार्गदर्शन करत आहे. पिंपळे खालसा ता. शिरुर येथील दादासाहेब गोडसे यांना लहानपणापासून वाचनाचा छंद असून ते स्वतः उच्चशिक्षित आहे, त्यांना अनेक वर्षांपासून वृत्तपत्र वाचनाची आवड असल्याने पिंपळे खालसा या खेडेगावात वृत्तपत्र विक्री केंद्र नसल्याने दादासाहेब हे दररोज पहाटे पाच सहा किलोमीटर पायी प्रवास करुन शिक्रापूर गाठत सर्व वृत्तपत्र वाचून काढत आहेत, पेपर वाचत असताना परिसरातील व्यक्तींबाबत काही बातमी असल्यास सकाळच्या सुमारास लगेचच संबंधित इसमाला बातमीचा आशय व वृत्तपत्राचे नाव आपल्या साध्या मोबाईल मधून मेसेज करुन माहिती देत आहेत.

## आदिवासी कृती समिती जुन्नर तालुकाच्या वतीने मोर्चा

**शिक्रापूर :** जुन्नर पोलिसांकडून एका प्रकरणामध्ये एका उच्च शिक्षित आदिवासी तरुणावर खंडणी चा खोटा गुन्हा दाखल केल्या प्रकरणी आदिवासी कृती समिती जुन्नर तालुका च्या वतीने मोर्चा काढण्यात येऊन या सर्व प्रकरणाची निरपेक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद माजी अध्यक्ष देवराम लांडे यांच्या विरोधात तर आदिवासी सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक संजय साबळे यांच्या समर्थनार्थ जुन्नर मध्ये मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते. काळू शेळकंदे, दत्ता गवारी, मारुती वायाळ, ललित जोशी, कावा गागरे, लक्ष्मण जोशी आदींसह आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. जुन्नर तहसीलदार यांना मोर्चाच्या वतीने निवेदन देण्यात आले. संजय साबळे यांच्या विरोधात देवराम लांडे यांनी त्यांच्याकडे 1 लाखाची खंडणी मागितली असल्याची तक्रार पोलिसांकडे देण्यात आली होती. याची कोणतीही चौकशी न करता पोलिसांनी राजकीय दबावातून गुन्हा दाखल करीत साबळे यांनी अटक केली. न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली.

## जिल्हा परिषद निवडणुका लांबणीमुळे इच्छुकांची धाकधूक

**शिक्रापूर :** राज्याचे मिनी मंत्रालय समजली जाणारी जिल्हा परिषद व पंचायत समितीचा पंचवार्षिक कार्यकाळ संपून अनेक वर्ष पुढे जात असताना अद्याप जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होत नसून सदर निवडणुकांसाठी न्यायालयाच्या निकालासाठी वेगवेगळ्या तारीख दिल्या जात असल्याने जिल्हा परिषद निवडणुका लांबणीमुळे इच्छुकांची धाकधूक वाढू लागली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती व ग्रामपंचायतचा कार्यकाळ काही वर्षापूर्वी संपला असून सदर स्थानिक स्वराज्य संस्थांवर सध्या प्रशासक असून त्यांच्या निवडणुका वेगवेगळ्या कारणाने पुढे ढकलल्या जात आहे, यापूर्वी सदर स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच अनेक इच्छुकांनी त्यांची मोर्चेबांधणी करत मतदारांना आपलेसे करण्याचे काम सुरु केलेले होते, दोन तीन वर्षांपासून अनेक इच्छुकांचे हे कार्य सुरु असल्याने लाखो रुपयांचा भुर्दंड त्यांना सोसावा लागलेला आहे.

## साईड पट्ट्या नसल्यामुळे घडत आहेत अपघात



**रांजणगाव गणपती :** १ मलठण ते शिक्रापूर या रस्त्यावरती मोठ्या प्रमाणात अपघातांची संख्या वाढली असून हे अपघात बऱ्याचदा साईड पट्ट्या नसल्यामुळे घडत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या रस्त्यावरती साईड पट्ट्या लवकरात लवकर भरण्याची ग्रामस्थांकडून मागणी केली जात आहे.

वाघाळे तालुका शिरूर येथील संतोष कारकूड व त्यांचा मुलगा करण कारकुड हे मलठण ला जात असताना अवजड वाहनाची तधडक बसून झालेल्या अपघातामध्ये करण कारकुड हा गंभीर जखमी झाला असे आहे, तर संतोष कारकुड यांच्या पायाला दुखापत झाली आहे. कराड करणच्या डोक्याला व कवटीला मोठ्या प्रमाणात मार लागला असून त्याला उपचारासाठी नगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. सध्या शिरूर तालुक्यामध्ये कारखान्यांच्या ऊस तोडणीचा हंगाम मोठ्या प्रमाणामध्ये सुरू आहे. त्याचप्रमाणे शिक्रापूर- मलठण रस्त्यावरती डंपर सारख्या वाहनांची वाहतूक ही मोठ्या प्रमाणात चालू आहे. त्यामुळे दुचाकी स्वारांना समोरून अवजड वाहन आल्यावरती वाहन रस्त्याच्या खाली घेताना वाहन चालकांना कसरत करावी लागते.


# अजब राजकारणाची गजब कहाणी

## तळेगाव ढमढेरेत विरोधी गटाकडून सत्ताधाऱ्यांना पाठींब्याचे व्यंगचित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे हे शिरुर तालुक्यातील प्रत्येक पक्षाचा पदाधिकारी गावात असलेले आणि यापूर्वी दोन उपमुख्यमंत्रीच्या धर्तीवर दोन उपसरपंच करुन महाराष्ट्रात गाजलेले गाव या गावातील सरपंच पदाचा तिढा चार वर्षापासून संपत नसताना विरोधी गटाच्या ग्रामपंचायत सदस्यांने गावामध्ये लावलेले फ्लेक्स सध्या चर्चेचा विषय बनत असून तळेगाव ढमढेरेच्या अजब राजकारणाची गजब कहाणी यातून दिसून येत आहे.

तळेगाव ढमढेरे ता. शिरुर ग्रामपंचायतचे सरपंच पद ओबीसी महिलेला राखीव असताना २०२१ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीत एका गटाचे दहा तर एका गटाचे सात सदस्य निवडून आले, सत्ताधारी गटाची महिला सरपंच झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे काही काळाने राजीनामा देणे गरजेचे असताना सदर महिलेने राजीनामा दिला मात्र



तळेगाव ढमढेरे ता. शिरुर येथे राजकारणाचा लागलेला अनोखा फ्लेक्स (छायाचित्र – शेरखान शेख)

● गावामध्ये पॅनल प्रमुखांमुळे अनेक घडामोडी घडल्या असल्याने त्यामुळे अनेक विकास कामांना बाधा आलेली आहे, सरपंच बदला नंतर काही चित्र बदलून अनेकांना काही दिवस मिळून काहुत्री होईल म्हणून आपण होणाऱ्या सरपंचांना पाठींबा दर्शवला असल्याचे ग्रामपंचायत सदस्य अॅड. सुरेश भुजबळ यांनी सांगितले.

नंतर पंचायत समितीकडे जाऊन राजीनामा पुन्हा मागे घेतला, त्यांनतर वर्षभरात पुन्हा राजीनामा दिल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार करत त्यांच्याच गटातील सूचक व अनुमोदक याच्या दबावाने राजीनामा दिल्याचे सांगत राजीनामा मागे घेतला.

दरम्यानच्या काळात सत्ताधारी गटाने चार जणांना उपसरपंच करत एकदा उपमुख्यमंत्रीच्या धर्तीवर दोन उपसरपंच करुन गावच्या पॅनल प्रमुखांनी अनोखा प्रताप रचला, तर सध्या एक वर्षाचा कार्यकाळ शिल्लक असल्याने अनेकांना सरपंच पदाचे वेध लागलेले असताना उपसरपंच देखील त्यांच्या पदाचा राजीनामा देत नसून आधी सरपंच पद सोडा मगच आमचे पद सोडू असे म्हणत आहे, मात्र या राजकारणाच्या खेळात दोनच सदस्य विरोधी गटात असताना आता विरोधी गटातील ग्रामपंचायत सदस्य अॅड. सुरेश भुजबळ यांनी गावामध्ये फ्लेक्स लावत सरपंच पदासाठी इच्छुक उमेदवारांना पाठींबा दर्शल्याचे फ्लेक्स लावले असून या फ्लेक्सवर गावातील पॅनल प्रमुखांचे व्यंगचित्र लावत त्याखाली त्यांचे असलेले नाना, आबा, काका, दादा, भाऊ, आण्णा, शेठ हे टोपण नावे दिले असून सध्या हे फ्लेक्स शिरुर तालुक्याच चर्चेचा विषय बनून सोशल मिडीयावर चांगलेच गाजून तळेगाव ढमढेरेच्या अजब राजकारणाची गजब कहाणी दाखवत आहे.

## जुन्नरमध्ये ५३ वर्षीय शेतकऱ्याला लुटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** जुन्नर मध्ये लग्न समारंभाकरिता आलेला 53 वर्षीय शेतकरी आपल्या घरी जाण्याकरिता जुन्नर बस स्थानकातील एसटी बस मध्ये चढत असताना चार तरुणांनी त्याचा गळ्यातील 2 तोळे वजनाची सोन्याची साखळी व खिशातील एक हजार रुपये हातचलाखीने लंपास केले. परंतु त्याने आरडाओरडा करीत कोणालाही खाली उतरू न देता पोलिसांना सांगितल्यानंतर पोलिसांनी एसटी मध्ये बसलेल्या चार जनांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

श्रीराम गोपाळे रा आलमे जुन्नर या शेतकऱ्याने फिर्याद नोंद केली आहे. पोलिसांनी आदित्य बोरकर, अमोल मासाळ, बाळू मासळकर, सुनिल म्हस्के सर्व राहणार राहुरी शेवगाव पाथर्डी असे ताब्यात घेतलेल्या तरुणांची नावे आहेत. श्रीराम हे नातेवाईकांच्या लग्नाकरिता जुन्नरमध्ये आलेले होते. लग्नानंतर ते आपल्या घरी जाण्याकरिता जुन्नर बस स्थानकामध्ये आलेले असताना तेथे हे चार तरुण त्यांना दिसले होते.

## सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांची

# एमएमसीमध्ये स्वतंत्र नोंद होणार

### वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे निर्देश, २२ हजार डॉक्टरांना होणार थेट फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांची एमएमसी मध्ये स्वतंत्र नोंद घेण्याचे स्पष्ट निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री, नामदार हसन मुश्रीफ यांनी दिनांक २५ फेब्रुवारी रोजी मुंबई मंत्रालयात दिल्याने त्याचा थेट फायदा सीसीएमपी उत्तीर्ण २२ हजार होमिओपॅथिक डॉक्टरांना होणार आहे. त्यामुळे या निर्णयाचे होमिओपॅथिक डॉक्टरांनी जोरदार स्वागत केले आहे.

सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथिक डॉक्टरांची एमएमसी मध्ये स्वतंत्र नोंद घ्यावी, कौन्सिल सदस्य संख्या वाढविणे तसेच अधिनियमा तील इतर दुरुस्त्यासंबंधी महाराष्ट्र होमिओपॅथी सल्लागार समितीने केलेल्या शिफारसीनुसार महाराष्ट्र होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर ऍक्ट मधे दुरुस्त्या करणे या व होमिओपॅथीच्या इतर प्रलंबित विषयावर दिनांक २५ फेब्रुवारी रोजी वैद्यकीय शिक्षण मंत्री, नामदार हसन मुश्रीफ यांच्या दालनात व्यापक बैठक संपन्न झाली. या बैठकीस भारतीय जनता पक्षाचे मुख्य विधिमंडळ प्रतोद अकोला पूर्व मतदार संघाचे आमदार रणजीत सावरकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष डॉक्टर सेल चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, महाराष्ट्र शासना च्या होमिओपॅथी सल्लागार समितीच्या अध्यक्ष डॉ. रजनीताई इंदुलकर, सदस्य



डॉ. नितीन गावडे, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेचे प्रशासक डॉ.बाहुबली शहा, समिती सदस्य डॉ. सुधीर म्हात्रे, अकोला जिल्हा होमिओपॅथिक संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण अग्रवाल,सचिव डॉ. प्रशांत सांगळे,इतर सदस्य तसेच वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, प्रधान सचिव श्री धीरजकुमार, आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन डॉ.अजय चंदनवाले, अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर, महाराष्ट्राचे मुख्य औषध नियंत्रक डी. आर. गहाणे,अन्न व औषध प्रशासन उपायुक्त डॉ. संतोष काळे, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य उपसचिव डॉ. तुषार पवार, कार्यसन अधिकारी अनिल चौरे, एमएमसी प्रबंधक डॉ. वाघमारे, एमसीएचचे मुख्य लिपिक दि.सा.भुयार मंत्री महोदयांचे स्वीय सहाय्यक श्री. आंदळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत सर्वप्रथम डॉ. बाहुबली शहा यांनी सीसीएमपी कोर्स बाबतच्या सर्व कायदेशीर व तांत्रिक बाजूंचा ऊहापोह करून एमएमसी कोणतेही कारण नसताना अडवणुकीचे धोरण अवलंबून एक प्रकारे सरकार व विधी मंडळाला आव्हान देत असल्याचे प्रतिपादन केले. त्यावर मा.मंत्री महोदयांनी एमएमसी प्रबंधकांना विचारले असता त्यांनी कायद्यातील तरतुदी व परिशिष्टात क्रमांक २८ ला सीसीएमपी अर्हतेची नोंद असल्याचे कबूल केले पण कोर्ट केस ७८४७/२०१४ अनिर्णित असल्याने आम्ही नोंद करून घेत नाही असे सांगितले. त्यावर डॉ. बाहुबली शहा यांनी आक्षेप घेत यासंदर्भात कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नसल्याचे सांगितले.

## विज्ञान दिनानिमित्त

## वाघिरे महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर मधील रसायनशास्त्र विभागामध्ये डीबीटी स्टार कॉलेज योजने अंतर्गत विविध उपक्रम घेण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी दिली. विज्ञान सप्ताहाच्या पहिल्या दिवशी दिनांक २४ फेब्रुवारी रोजी रसायनशास्त्र विभागामध्ये सदर सप्ताहाचा उद्घाटन समारंभ पार पडला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य,सर्व विभाग प्रमुख,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

तसेच सदर प्रसंगी ओतूर पोलीस स्टेशन कर्मचारी श्रीमती. भोईर मॅडम व त्यांचे सहकारी यांनी विशेष उपस्थिती लावली.सोमवारी (दि. २४)पासून महाविद्यालयात सुरू झालेल्या विज्ञान सप्ताहामध्ये शास्त्र शाखेतील विविध विभागांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती रसायनशास्त्र विभाग प्रमुख व डीबीटी स्टार कॉलेज योजना समन्वयक डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. यावेळी डॉ. रमेश शिरसाट यांनी डीबीटी स्टार कॉलेज योजना व राष्ट्रीय विज्ञान दिन यांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

सदर प्रसंगी सर्व विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांना विज्ञान सप्ताहातील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले व शुभेच्छा दिल्या.दिनांक २४ रोजी रसायनशास्त्र विभागामार्फत विज्ञान सप्ताहाची सुरुवात वृक्षारोपण कार्यक्रमाने झाली.

## स्थानिक नेत्याची पक्ष प्रवेशावरून कोंडी, प्रवेश रखडला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत सरपंच पदाच्या निवडीत ५ मते फुटून राष्ट्रवादी (अजित पवार गटाच्या ) संपर्कात असणाऱ्या एका स्थानिक नेत्यांच्या एकछत्री कारभाराला तडा गेला आहे. ग्रामपंचायत सरपंच निवडीत सदस्यांनी फाटा देत सदस्यांनी मतांची विभागणी करत सत्तेच्या एकछत्री राजकारणाला सुरूंग लावला आहे. कायम एकाच नेत्याला विविध पदे देत केंद्रस्थानी ठेवलेल्या या नेत्याच्या पक्ष प्रवेशाने हर्षवर्धन पाटील गटात मोठी पडझड होईल असे बोलले जात होते.

परंतु माजी मंत्री राहिलेले हर्षवर्धन पाटील यांना मानणारा मोठा गट भिगवण परिसरात आहे. विविध संस्था, कारखानदारी यामाध्यमातून जोडला गेलेला मोठा वर्ग कायम पाटील यांच्यामागे राहिला आहे. सूत्रांच्या मिळालेल्या माहिती नुसार संबंधित नेत्याने काही नेत्यांचा कौल घेत प्रवेशावर चर्चा केली असता अनेक नेत्यांकडून पाटील गट सोडणार नसल्याचे सांगण्यात येत असल्याने अगोदरच पक्ष प्रवेशाचा पवित्रा घेऊन बसलेल्या या नेत्यांच्या निर्णयावर पाटील गटाने फारकत घेतल्याने धक्का बसला आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा गट या नेत्यांच्या विरोधात एकवटल्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांच्या तोंडावर ऐनवेळी निर्णय घेतल्यास अगामी काळात बंडाळी वाढत उलथापालट होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याने कोंडी होऊन इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिती निर्माण झाली.



जानाईदेवी पालखी पदयात्रा प्रस्थानास गाव सारा जमा झाला = जेजुरी च्या जयाद्री ते सह्याद्री पाटण निवकाने हा दीडशे किलो मीटर पायी प्रवास देवी दर्शन निसर्गपूजा अशी परिक्रमा राहणार दौडज खिडीतील प्रस्थान प्रसंग (फ़ोटो =विजयकुमार हरिश्चंद्रे )

# बारा गावांच्या पाणी प्रश्नाबाबत माहिती संकलन सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** केंदूर ता. शिरुर सह परिसरातील बारा गावांतील दुष्काळप्रश्नी आवश्यक उपाययोजना तसेच संभाव्य जलस्त्रोत व पुलपुनर्भरण आणि चासकमान तथा डिंभा धरण कालव्यातून पाणी उपलब्ध होईल असे पर्याय या सर्व माहितीचे संकलन करण्याचे काम सुरु करण्यात आले असून येत्या अधिवेशन काळात याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांच्या सोबत विशेष बैठक घेण्याचे नियोजन सुरु असल्याची माहिती उर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे यांचे स्वीय सहायक गिरीश वसंतराव घूले यांनी दिली आहे.

केंदूर ता. शिरुर येथे उर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे यांच्या स्वीय सहायक पदी गिरीश वसंतराव घूले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला, याप्रसंगी सरपंच प्रमोद पऱ्हाड, उपसरपंच शालन भोसुरे, माजी सरपंच सुनील थिटे, अविनाश साकोरे, सुर्यकांत थिटे, भरत साकोरे, जातेगावचे माजी सरपंच समाधान डोके, ग्रामपंचायत सदस्या मंगल साकोरे, शहाजी सुक्रे, मंगेश भालेकर, अभिजीत साकोरे, रामभाऊ साकोरे, बन्सी पऱ्हाड, उमेश साकोरे, विश्वास पऱ्हाड, मदन पऱ्हाड, रवींद्र साकोरे, गणेश साकोरे, अमित साकोरे, कुणाल साकोरे, बापूसाहेब साकोरे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान पुणे जिल्ह्यासह शिरुर तालुक्यातील प्रलंबीत कामांचा आढावा घेण्याची जबाबदारी गिरीश घूले यांच्यावर सोपविलेली असल्याने शिरुरच्या दुष्काळी बारा गावांसाठी आपण काम करणार असल्याचे उर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी जाहीर केले होते त्या अनुषंगाने माहिती संकलीत करण्यासाठी गिरीश घूले यांनी केंदूर गावातून सुरुवात केली असून इतर दुष्काळी गावांच्या ग्रामस्थांशी चर्चा ते करणार आहेत. सदर माहितीसह उपलब्ध होणारे अहवाल घेवून येत्या अधिवेशनात शिरुर तालुक्यातील बारा गावे दुष्काळमुक्ती बाबतची स्वतंत्र बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सोबत घेतली जाणार असल्याचे देखील उर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे यांचे स्वीय सहायक गिरीश घूले यांनी सांगितले.

# गॅस सिलिंडरच्या दरात मोठी वाढ

## सणासुदीच्या तोंडावर महागाईचा भडका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मार्च महिन्याचा पहिल्याच दिवशी गॅसच्या किंमती वाढल्याचा भडका उडाला आहे. महिन्याच्या पहिल्याच दिवशी महागाईचा धक्का बसला आहे. १ मार्च पासून एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत मोठी वाढ करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचे नवीन दर जाहीर करण्यात आले आहेत. तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात प्रति सिलिंडर ६ रुपयांची वाढ केली आहे. या वाढीनंतर दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरसाठी आता १८०३ रुपये मोजावे लागणार आहेत. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ करण्यात आल्यामुळे याचा फटका छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना बसणार आहे.

दरम्यान, तेल विपणन कंपन्यांनी शनिवारी भारतातील सर्व शहरांमध्ये व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत आता १,७९७ रुपयांवरून १,८०३ रुपयांवर पोहोचली आहे, म्हणजे प्रति सिलेंडर ६ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तसेच १४.२ किलो घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर जैसे थे ठेवण्यात आलेले आहेत.



### व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे दर कसे असणार?

दिल्ली : १,८०३ रुपये | कोलकाता : १,९१३
मुंबई : १,७५५ | चेन्नई : १,९६५

### छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना फटका

१ मार्च २०२५ पासून आता हे नवे दर लागू होणार आहेत. आता नव्या दरानुसार मुंबईत सिलेंडरची किंमत १,७४९.५० रुपयांवरून १,७५५ रुपये झाली आहे. कोलकात्यात हा दर १,९०७ रुपयांवरून १,९१३ रुपयांवर गेला आहे. चेन्नईमध्ये सिलिंडरची किंमत आता १,९५९.५० रुपयांऐवजी १,९६५ रुपये असणार आहे. व्यावसायिक सिलिंडरच्या किंमतीत वाढ करण्यात आल्यामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना याचा फटका बसणार आहे.

"सणासुदीच्या काळातच कंपन्यांनी व्यावसायिक सिलिंडरच्या किंमती वाढण्याचा निर्णय घेतला आहे. व्यावसायिक सिलिंडरची किंमत सहा रुपयांनी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे बाहेर रेस्टॉरंटमध्ये जेवण किंवा इतर पदार्थ महाग होण्याची शक्यता आहे.

**- आप्पा कोठारी व्यावसायिक**



## सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय राज्यात द्वितीय

**सातारा :** राज्यातील सर्व विभागांच्या मूल्यमापनामध्ये राज्यातील ३५ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांमधून सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयास राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. या उल्लेखनीय कामगिरीकरिता पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या कुशल नेतृत्वाखाली व योग्य मार्गदर्शनाखाली सातारा पोलीस दलाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक समीर शेख यांना अभिनंदन पत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांचा आंतरिक मूल्यमापन कार्यक्रम जाहीर केला आहे.



## ट्रम्प-झेलेन्स्कींमध्ये खडाजंगी

**अमेरिका :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदिमीर झेलेन्स्की यांच्यात ओव्हल कार्यालयामध्ये शुक्रवारी (दि. २८ फेब्रुवारी) खडाजंगी झाली. यावेळी ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली. हा वादग्रस्त सामना थेट प्रक्षेपित केला गेला आणि आधुनिक काळातील ओव्हल ऑफिसमधील अशाप्रकारचा हा एकमेव प्रसंग ठरला. दरम्यान, या प्रसंगानंतर रशियाच्या आनंदाला उधाण आलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांना मारहाण करण्यापासून स्वतःला रोखले, अशी खोचक प्रतिक्रियाही रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोवा यांनी दिली आहे.

# मुंबई पोलिसांचे ऑपरेशन ऑलआऊट, शहरात २०७ ठिकाणी शोध मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आगामी अधिवेशन तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री शहरात ऑपरेशन ऑल आऊट राबवले. या कारवाईत मुंबई पोलिसांचे सर्व वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. त्या कारवाईत २०७ ठिकाणी शोध मोहिम राबवण्यात आली. यावेळी शहरात नाकाबंदीदरम्यान ६९०१ वाहनांची तपासणी करण्यात आली.

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री सर्वत्र ऑल आऊट ऑपरेशन राबवले. पोलीस आयुक्त विवेक फणसळकर व विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या नेतृत्वात सर्व मुंबई पोलीस ठाण्यात ही कारवाई पार पाडली. सर्व ५ प्रादेशिक विभागांचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, सर्व १३ परिमंडळ विभागांचे पोलीस उपायुक्त, सर्व विभागांचे सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आपापल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहिले आणि त्यांनी ऑपरेशनचे वैयक्तिक निरीक्षण केले. प्रत्येक पोलीस ठाण्यांमधुन जास्तीत जास्त मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते. प्रत्येक कार्य करण्यासाठी समर्पित वैयक्तिक टिमसह अभिलेखावरील गुन्हेगारांची तपासणी, संशयास्पद व्यक्ती व क्रियांसाठी हॉटेल्स, लॉजेस आणि मुसाफिरखानांची तपासणी, संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू जसे की शस्त्रे, अमलीपदार्थ, इ. म्हणून वापरल्या जाणाऱ्या वस्तू, शोधण्यासाठी नाकाबंदीचे व शोधमोहिम राबवण्यात आली.



### गुन्हेगारीला बसणार आळा

फरार आणि पाहिजे व्यक्तींना अटक करणे, प्रलंबित अजामीनपात्र वॉरंट आणि स्थायी वॉरंट बजावणे,अवैध दारू, जुगार ई. अशा बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई, पोलीस दृश्यमानता वाढविण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आणि संवेदनशील भागात पायी गस्त ही कामे या ऑपरेशन अंतर्गत हाती घेण्यात आली होती.



## काँग्रेसच्यावतीने शेतकरी मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** निवडणुकांमध्ये दिलेले कर्जमाफीचे विसरलेले आश्वासन लक्षात आणून देण्यासाठी तसेच अन्य शेतीच्या समस्यांकडे लक्ष वेधावे म्हणून ३ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने शेतकरी मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासमवेत २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

या मोर्चात काँग्रेस पक्षाचे सर्व कार्यकर्ते, तालुका अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एन.एस.यु.आय., इंटक, अनुसूचित जाती-जमाती विभाग, ओ.बी.सी. विभाग, अल्पसंख्यांक विभाग व इतर सर्व सेल सहभागी होणार आहेत. खासदार डॉ. कल्याण काळे म्हणाले, ' मोर्चाचा प्रारंभ महात्मा गांधी पुतळा, शहागंज येथून होईल व ते चेलीपुरा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत जाईल. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न शासनाकडे मांडण्यात येणार आहेत.



## छत्तीसगडमध्ये चकमक, २ नक्षलवादी ठार

**छत्तीसगड :** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील किस्ताराम येथे शनिवारी सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. त्यानंतर नक्षलवादी आणि सैनिकांमध्ये अधूनमधून गोळीबार सुरू आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर परिसरात शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून त्यांच्याकडील शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

## आयआयटी बाबा पुन्हा एकदा चर्चेत



**प्रयागराज :** महाकुंभ मेळ्यात आयआयटी बाबा प्रचंड प्रकाशझोतात आला होता. त्यानंतर आयआयटी बाबानं भारत पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या सामन्याबद्दल भाकित केलं होतं. त्यानं केलेलं भाकित खोटं ठरलं आणि बाबा प्रचंड ट्रोल झाला होता. आता आयआयटी बाबा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. त्याला भर कार्यक्रमात मारहाण करण्यात आली आहे.

# अलीभाई देखाणी यांचे सामाजिक कार्य प्रेरणादायी : न्या. गवई

## अलीभाई यांचा पॉझिटिव्हिटी परिषदेत हृद्य गौरव



**जयपुर फुटचे जनक पद्मभूषण डॉ. डी. आर. मेहता आणि पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते अलीभाई देखाणी यांचा त्यांच्या सामाजिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.**

"पुरस्कारामुळे माझ्यावरील जबाबदारी आणखी वाढली आहे. सामाजिक कार्यासाठी मोठे बळ मिळाले आहे. त्यामुळे माझी पुढची वाटचाल अधिक आश्वासक असेल, सामाजिक कार्यात भरीव योगदान देण्यासाठी पुरस्काराची ही शिदोरी मला आयुष्यभर पुरेल,

**- अलीभाई देखाणी,** सामाजिक कार्यकर्ते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सामाजिक कार्यकर्ते अलीभाई देखाणी आणि डॉ. डी. आर. मेहता यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजिक कार्याला झोकून दिले आहे. त्यांचे कार्य सर्वांना प्रेरणा देणारे आहे, असे गौरवोद्गार सर्वोच्च न्यायालयाचे न्या. भूषण गवई यांनी काढले.

नवी दिल्ली येथे चौथी पॉझिटिव्हिटी परिषद नुकतीच संपन्न झाली. महाराष्ट्र सदनमध्ये आयोजित या परिषदेमध्ये पुण्याचे समाजसेवक अलीभाई यांचा पॉझिटिव्हिटी पुरस्काराने न्या. गवई यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

भारताचे माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, पद्मभूषण डॉ. डी. आर. मेहता यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरवर्षी होणाऱ्या या परिषदेमध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो. यावर्षी जयपुर फुटचे जनक पद्मभूषण डॉ. डी. आर. मेहता आणि पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते अलीभाई देखाणी यांचा त्यांच्या सामाजिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. मागील वर्षी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांचा सन्मान या परिषदेत करण्यात आला होता.

परिषदेसाठी देशभरातून विविध क्षेत्रातील मान्यवर दिल्ली येथे एकत्र येऊन विचारमंथन करत असतात. श्री. मेहता आणि श्री. अलीभाई यांचे कार्य गौरवास्पद आहे. त्यांच्यासारखे सामाजिक बांधिलकी जपणारे लोक समाजासाठी प्रेरणादायी आहेत, असे उद्गार न्या. गवई यांनी काढले.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे म्हणाले, 'गेल्या अनेक वर्षांपासून मी अलीभाई यांचे सामाजिक कार्य पाहत असून त्यांची समाजासाठी असणारी तळमळ कौतुकास्पद आहे.

# धर्मादाय रुग्णालयासाठी जमीन देणार : बावनकुळे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पालघर जिल्ह्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना आरोग्य सेवा उपलबध करुन देण्यास शासनाचे प्राधान्य असून जिल्ह्यातील उमरोळीजवळ धर्मादाय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाकरिता भाडेपट्यावर जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

शारदा प्रतिष्ठान, मुंबई तर्फे डॉ.सचिन खरात यांनी उमरोळी येथे २५ हे.आर. जमीन धर्मादाय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, शारदा प्रतिष्ठानचे डॉ.खरात यावेळी उपस्थित होते. आ. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, कोकण विभागीय आयुक्त विजय सुर्यवंशी, पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडखे दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



"धर्मादाय रुग्णालय सुरू करण्यास शासनाचे प्राधान्य आहे. पालघर मधील हे रुग्णालय सुरू झाल्यास या माध्यमातून आदिवासी नागरिकांना सुविधा मिळतील. या कार्याला अंत्योदयाचा स्पर्श असणार असून भविष्यात हे रुग्णालय मुख्यमंत्री सहायता निधीस देखील जोडले जाईल.

**- चंद्रशेखर बावनकुळे**

## उन्हाळ्यात वकिलांना काळा कोटाची सूट

**मुंबई :** राज्यात फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तापमानात चांगलीच वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिक काळे कपडे घालणे टाळताना दिसत आहेत. पण वकीलांना मात्र न्यायालयात काळा कोट घालणे बंधनकारक असते. उन्हाळ्याच्या दिवसात या कोटमुळे वकीलांना उष्णतेचा सामना करावा लागतो यादरम्यान वाढते तापमान लक्षात घेऊन महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने (बीसीएमजी) वकिलांना दरवर्षी १ मार्च ते ३० जून या कालावधीत काळा कोट परिधान करण्याची गरज नसल्याचा निर्णय घेतला आहे. वकीलांना त्यांच्या ठरवून दिलेल्या 'ड्रेस कोड'मधून मिळणारी सूट यापूर्वी फक्त मे ते जून या उन्हाळ्याच्या दिवसांमध्येच दिली जात होती. मात्र ही सूट आता १ मार्चपासून सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने याबद्दलचे परिपत्रक २७ फेब्रुवारी रोजी जारी केले आहे. यामध्ये दरवर्षी १ मार्च ते ३० जून पर्यंत ही सूट वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

## आमदार डॉ किरण लहामटे यांचे ठिय्या आंदोलन

**अकोले :** पिंपळगावखांड धरणातून अतिरिक्त पाणी सोडू नये या मागणीसाठी आमदार डॉ किरण लहामटे व शेतकऱ्यांनी पिंपळगाखांड धरण स्थळावर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.पुढील आवर्तनापर्यंत पाणी सोडले जाणार नाही असा शब्द प्रशासन देत नाही तो पर्यंत आंदोलन सुरूच राहील असे डॉ लहामटे यांनी सांगितले. आवर्तन थांबविले.प्रशासनाने पुन्हा आवर्तन सुरू करू नये या साठी आमदार लहामटे यांनी शेतकऱ्यांसह धरण स्थळावर ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.

# ट्रेडमार्क उल्लंघनाबद्दल ॲमेझॉनला फटकारले

## न्यायालयाकडून $39 दशलक्ष दंडाचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

अमेझॉन च्या भारतीय कायद्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या आणखी एका घटनेत, भारतीय न्यायालयाने बेव्हरली हिल्स पोलो क्लब ट्रेडमार्कचे उल्लंघन केल्याबद्दल ई-कॉमर्स कंपनीला $39 दशलक्ष दंड ठोठावला आहे. ॲमेझॉनच्या इंडिया प्लॅटफॉर्मवर समान लोगो असलेले कपडे विकताना आढळल्यानंतर हा निर्णय आला आहे, ज्याने पुन्हा एकदा कंपनीच्या बौद्धिक संपदा अधिकारांचे नेहमीचे उल्लंघन आणि कमकुवत अंमलबजावणी यंत्रणा अधोरेखित केली आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाने ॲमेझॉन (AMZN.O) ला आदेश दिले आहेत, ॲमेझॉनच्या इंडिया वेबसाइटवर एकसारखे ब्रँडिंग असलेले कपडे विकल्यानंतर "बेव्हरली हिल्स पोलो क्लब" ट्रेडमार्कचे उल्लंघन केल्याबद्दल $39 दशलक्ष नुकसान भरपाई देण्यासाठी नवीन टॅब युनिट उघडले आहे.




### दूरगामी परिणाम होण्याची अपेक्षा

न्यायालयाच्या निर्णयाने कठोर ट्रेडमार्क अनुपालन उपायांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि ब्रँड अखंडतेचे संरक्षण करण्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची आवश्यकता अधोरेखित केली आहे. या निकालाचा भारतातील ऑनलाइन मार्केटप्लेसवर दूरगामी परिणाम होण्याची अपेक्षा आहे.

- Amazon ला बनावट वस्तू विकण्यापासून ते कर चुकवणे आणि भारताच्या ई-कॉमर्स नियमांना बायपास करण्यापर्यंत कायदेशीर उल्लंघनांचा मोठा इतिहास आहे. वारंवार चेतावणी आणि कायदेशीर कारवाई करूनही, प्लॅटफॉर्म लहान व्यवसायांचे शोषण करते, ग्राहकांची दिशाभूल करते आणि भारतीय कायद्यांकडे दुर्लक्ष करते अशा पद्धतीने कार्य करत आहे. हा नवीनतम न्यायालयाचा निर्णय Amazon च्या बेजबाबदार व्यवसाय पद्धती आणि प्रभावी अनुपालन उपायांची अंमलबजावणी करण्यात अयशस्वी झाल्याचा पुरावा आहे, अशी माहिती बी सी भरतिया, आणि प्रवीण खंडेलवाल CAIT चे राष्ट्रीय अध्यक्ष महासचिव यांनी दिली.
- भारतात कार्यरत असलेल्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना त्यांच्या नजरेखाली होणाऱ्या बेकायदेशीर आणि अनैतिक क्रियाकलापांसाठी जबाबदार धरले पाहिजे. अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताच्या व्यापार परिसंस्थेचे उल्लंघन करण्यापासून आणि व्यापारी, ग्राहक आणि ब्रँड मालकांच्या हक्कांचे उल्लंघन करण्यापासून रोखण्यासाठी कठोर नियामक निरीक्षण आणि दंड लागू करण्याची वेळ आली आहे.
- कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) भारत सरकार आणि नियामक प्राधिकरणांना Amazon च्या वारंवार होणाऱ्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्याचे आणि विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांच्या भक्षक आणि बेकायदेशीर पद्धतींपासून भारतीय व्यवसायांचे संरक्षण करणारी धोरणे अंमलात आणण्याची जोरदार विनंती करते.



प्रवीण खंडेलवाल

**CAIT चे राष्ट्रीय अध्यक्ष महासचिव**

- **हा निर्णय ब्रँड मालकांसाठी एक महत्त्वपूर्ण विजय आहे**
- **डिजिटल युगात बौद्धिक संपदा अधिकारांचे रक्षण करण्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेची वचनबद्धता अधोरेखित करते.**



"केवळ खेळाडूंना संघातून वगळणे हा उपाय नाही. हो, भारताविरुद्धच्या पराभवानंतर आपण सर्वजण भावनिक झालो होतो. वसीम भाई म्हणाले की, संघातून ६-७ खेळाडूंना काढून टाका. पण माझा एकच प्रश्न आहे, त्यांची जागा घेण्यासाठी आपल्याकडे तेवढे खेळाडू तयार आहेत का? आपल्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये दर्जेदार खेळाडू तयार झाले आहेत का? आपल्याकडे त्यांना तयार करण्यासाठी योग्य अकादमी आणि प्रशिक्षण व्यवस्था आहे का?" मोठे निर्णय घेतल्यानंतरही जर संघ अपयशी ठरला, तर पुन्हा टीका होईल आणि संपूर्ण संघ रचनेत बदल केले जातील. जर आपण प्रमुख खेळाडूंना संघातून वगळले, तर त्यांच्या जागी कोण खेळणार? आणि जर त्यानंतरही निकाल अनुकूल राहिले नाहीत, तर पुन्हा संघबांधणी सुरू होईल.

— शाहिद आफ्रिदी

# दक्षिण आफ्रिका उपांत्यफेरीत

## इंग्लंड १७९ धावांवर सर्वबाद : जान्सन-मुल्डरने घेतल्या ३-३ विकेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कराची :** इंग्लंड व दक्षिण आफ्रिका संघ आज चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील अंतिम सामना खेळत आहेत. पण इंग्लंडचा स्पर्धेतील शेवट पाकिस्तान व बांगलादेशप्रमाणे कडूच होईल अशी शक्यता आहे. कारण आफ्रिकेने उल्लेखनीय गोलंदाजी व अप्रतिम क्षेत्ररक्षणाने इंग्लंडचा डाव अवघ्या १७९ धावांवर गुंडाळला अन् स्पर्धेत उपात्यं फेरी गाठली आहे. इंग्लंडचा डाव स्वस्तात गुंडाळून दक्षिण आफ्रिकेने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यामुळे आता भारत, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अन् ऑस्ट्रेलिया हे चार संघ अंतिम फेरी गाठण्यासाठी सामना खेळतील. पण इंग्लंडचा मात्र शेवट कडू होण्याची शक्यता आहे. कारण इंग्लंडने आफ्रिकेसमोर विजयासाठी अवघ्या १८० धावांचे लक्ष्य ठेवले आहे.

इंग्लंडच्या डावाची सुरूवातच खराब झाली. ९ धावांवर त्यांनी पहिली विकेट गमावली. फिल सॉल्ट अवघ्या ८ धावांवर माघारी परतला. पुढे ३ बाद ३३ धावा अशी इंग्लंडची परिस्थिती झाली.



त्यानंतर जो रूटने फटकेबाजी केली, पण त्याला ३६ धावांवर परतावे लागले. अष्टपैलू लिव्हिंगस्टनने देखील अवघ्या ९ धावा केल्या.

सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी उल्लेखनीय फिल्डींग कौशल्य दाखवले. त्यांनी इंग्लंडच्या ८ खेळाडूंना झेलबाद करून माघारी पाठवले. १७ व्या षटकात हॅरी ब्रुक केशव महाराजाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. मार्क यान्सेने स्लाईड करत अप्रतिम झेल केला आणि हॅरी ब्रुकला अवघ्या १९ धावांवर तंबूत पाठवले. तर, २४ नव्या षटकात लुंगी एनगीडीने झेपावत झेल केला आणि जेमी ओव्हरटनला बाद केले.

आजच्या डावात इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. जो रूट (३७) इंग्लंडचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. तर आफ्रिकेच्या मार्को यान्सेन व विवान मुल्डरने प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. लुंगी एनगीडी व कगिसो रबाडाला प्रत्येकी एक विकेट घेण्यात यश आले. तर केशव महाराजने २ विकेट्स घेत महत्त्वपूर्ण योगदान दिले.




## ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का; सहावा खेळाडू झाला जखमी!



**नवी दिल्ली :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा महत्त्वाचा सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर गेला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या शेवटच्या साखळी सामन्यात त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. लक्ष्याचा पाठलाग करताना तो सलामीला आला होता, मात्र त्याला धावण्यास अडचण येत असल्याचे दिसले. विकेटदरम्यान धावतानाही तो अस्वस्थ दिसत होता. काही काळ क्रीजवर राहिल्यानंतर त्याने १५ चेंडूत २० धावा केल्या, परंतु नंतर दुखापतीमुळे अधिक खेळणे शक्य झाले नाही. ऑस्ट्रेलियन संघ व्यवस्थापनाने शॉर्टच्या जागी जेक फ्रेझर-मॅकगर्क किंवा अष्टपैलू आरोन हार्डी यांना संधी देण्याची शक्यता आहे. शॉर्टने इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात चमकदार खेळी करत ३५२ धावांचा पाठलाग करताना ६३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती. त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीमुळे ऑस्ट्रेलियन संघाच्या रणनीतीवर परिणाम होऊ शकतो.

## एमएस धोनीने मैदानावर परतताच केली फटकेबाजी



**चेन्नई :** चॅम्पियन्स ट्रॉफी संपताच इंडियन प्रिमिअर लीगचे बीगुल वाजणार आहे. त्यामुळे सर्वच फ्रँचायझींनी आपले प्रॅक्टीस कॅम्प्स सुरू केले आहेत. कालपासून चेन्नई सुपर किंग्जच्या प्रॅक्टीस कॅम्पला सुरूवात झाली आणि सीएसकेचा आधारस्तंभ एमएस धोनी संपूर्ण वर्षभरानंतर मैदानावर परतला. सराव शिबिरात एमएस धोनी आणि आर अश्विन दोन जूने सहकारी संघात परतल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आले. सीएसकेने आपल्या सरावाला सुरूवात केली असून पहिल्याच दिवशी माजी कर्णधाराने फटकेबाजीला सुरूवात केली आहे. चेन्नई सुपर किंग्ज संघाच्या सोशल मीडिया हँडलवरून सीएसकेच्या सराव शिबिराचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये सीएसकेचे स्टार खेळाडू सराव करताना पाहायला मिळत आहेत. सरावात आर अश्विन आपले गोलंदाजी कौशल्य दाखवत आहे. तर एमएस धोनी नेट्समध्ये फटकेबाजी करताना पाहायला मिळत आहे.

## योगराज सिंगची टीका झोंबली

**नवी दिल्ली :** भारताचे योगराज सिंग यांनी पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूंवर जोरदार टीका केली. चॅम्पियन्स ट्रॉफीतील पाकिस्तान संघाच्या कामगिरीवर सर्वच टीका करत असताना योगराज यांनी या संघाला प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शवली होती. त्याचवेळी त्यांनी समालोचन करताना संघावर टीका करणाऱ्या पाकिस्तानच्या माजी खेळाडूंचे कान टोचले. हे सर्व पैशांसाठी सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. आता त्यावर पाकिस्तानचा महान माजी वेगवान गोलंदाज वासीम अक्रमने प्रशिक्षक पदावरून माजी खेळाडूंवर होणाऱ्या टीकेवर प्रतिक्रिया दिली आहे. योगराज सिंग यांनी शोएब अख्तर आणि वासीम अक्रम यांच्यासारख्या खेळाडूंवर टीका करत म्हटले होते की, 'माजी खेळाडू फक्त समालोचन करून पैसे कमावतात, पण संघासाठी योगदान देत नाहीत.'

अक्रम म्हणाला, "मी पाकिस्तान क्रिकेटला मदत करायला तयार आहे आणि त्यासाठी मला कोणताही मोबदला नको.

# शरीर संस्था स्पर्धा मधील विजेत्यांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नामदार चंद्रकांत पाटील नामदार मुरलीधर मोहोळ नामदार माधुरीताई मिसाळ आमदार हेमंत रासने यांच्या नावाने सुरू केलेल्या शरीर संस्था स्पर्धेमधील अंतिम निकाल जाहीर झाले असून सर्वांचा सत्कार करण्यात आला माजी नगरसेवक धनंजय विष्णू जाधव यांनी यासाठी पुढाकार घेतला होता.

५५ किलो वजनी गटातील १० विजेते ६० किलो वजनी गटातील १० विजेते ६५ किलो वजनी गटातील १० विजेते ७० किलो वजनी गटातील १० तसेच ७५ आणि ८० किलो वजनी गटातील १० विजेत्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला ८० किलो वरील वजनी गटातील विजेत्यांचं मेन्स फिजिक्स श्री २०२५ हे १७०cm पर्यंतचे विजय देखील यावेळी घोषित करण्यात आले. वुमेन्स फिजिक्स मध्ये चार जणांनी यश संपादन केले.



**मानाची "पुणे श्री २०२५"**

● "ना. चंद्रकांतदादा पाटील द हिंदू श्री २०२५" "ना. मुरलीधरआण्णा मोहोळ मेन्स फिजिक श्री. २०२५." "ना. माधुरीताई मिसाळ वुमेन्स फिजिक श्री २०२५". "आमदार. मा. हेमंतभाऊ रासने श्री २०२५."

### ५५ किलो वजनी गटातील विजेते

| क्र. | विजेत्याचे नाव | जिमचे नाव |
|---|---|---|
| १) | सोमनाथ पाल | महारुद्र जिम |
| २) | निलेश गजमाळ. | कोथरूड फिटनेस |
| 3) | अजय ओझरकर | एल सी फिटनेस |
| ४) | दिपक कांबळे. | वर्ल्ड ऑफ फिटनेस |
| ५) | सलमान नालबंद. | सुसकॉन फिटनेस |
| ६) | सत्यजित नाथ. | अलोक फिटनेस |
| ७) | सुरज सरोज. | सह्याद्री जिम |
| ८) | नामदेव कारंडे. | ए. पी फिटनेस |
| ९) | धनराज निंबाळकर. | एस जी फिटनेस |
| १०) | महेश पाटोळे. | माय टी फिटनेस |

### ६० किलो वजनी गटातील विजेते

| क्र. | विजेत्याचे नाव | जिमचे नाव |
|---|---|---|
| १) | हर्षल काटे | |
| २) | अमोल माया | ए बी फिटनेस |
| 3) | शुभव शिवे | ए. बी न्यूट्रीशियन |
| ४) | सिध्देश गडगे | सिध्देश फिटनेस |
| ५) | गौरव भरणे | पॅसिफिक फिटनेस |
| ६) | अविनाश धनवडे | पॅसिफिक फिटनेस |
| ७) | सलिम शेख | सी आर डी फिटनेस |
| ८) | अजित बौडफळे | व्हीजन फिटनेस |
| ९) | अभिषेक खाडे | आर जे क्वॉड |
| १०) | जय माकर | रूद्र फिटनेस |

### ६५ किलो वजनी गटातील विजेते

| क्र. | विजेत्याचे नाव | जिमचे नाव |
|---|---|---|
| १) | निलेश ढोंडे | वर्ल्ड ऑफ फिटनेस |
| २) | सचिन सावत | हनुमान जिम |
| 3) | रोशन घारे | ओम जिम |
| ४) | प्रतिक पाटील | डिवाईन फिटनेस |
| ५) | प्रशांत मिध्या | ई वॉल जिम |
| ६) | आबेद शेख | एस्कॉन फिटनेस |
| ७) | अमोल गावडे | डायनामो फिटनेस |
| ८) | विनायक तलरीकंडी | व्ही. एस के फिटनेस |
| ९) | प्रशांत वेताळ | बलेरियन जिम |
| १०) | गुलफाम सय्यद | एस जी फिटनेस |

## करुण नायरचं विदर्भासाठी सेंच्युरी करत अनोखं सेलिब्रेशन



**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भ आणि केरळ एकमेकांविरुद्ध विजेतेपदासाठी लढत आहेत. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर सुरू असलेल्या या अंतिम सामन्यात विदर्भ संघाचं वर्चस्व दिसून आले आहे. या सामन्याच्या चौथ्या दिवशी (शनिवार, १ मार्च) अनुभवी फलंदाज करूण नायकरने शतक झळकावत विदर्भाला मोठ्या आघाडीकडे नेले आहे. या सामन्यात विदर्भ संघाने दुसऱ्या डावात पार्थ रेखाडे (१) आणि ध्रुव शोरे (५) या सलामीवीरांचत्या विकेट्स झटपट गमावल्या होत्या. त्यामुळे विदर्भावर दबाव आला होता.पण चांगल्या फॉर्ममध्ये असलेल्या दानिश मालेवार आणि करुण नायर या दोघांनी विदर्भाचा डाव सावरला. त्यांनी धावफलक हलता ठेवत अर्धशतके साकारली. त्याचबरोबर शतकी भागीदारीही केली. त्यांची भागीदारी पुढेही चांगली सुरु होती. त्यांनी पाहाता पाहाता दीडशतकी भागीदारी करत संघाला १८० धावांचा टप्पा पार करून दिला. यासोबतच करुणने त्याचे १८४ चेंडूत शतक साजरे केले. करुण गेल्या अनेक महिन्यांसाठी दमदार फॉर्ममध्ये खेळत आहे. या रणजी हंगामातील हे त्याचे तिसरे शतक आहे. त्याचबरोबर त्याने यंदाच्या रणजी स्पर्धेत ८०० धावांचा टप्पाही पार केला. त्याने पहिल्यांदाच ८०० धावा एका रणजी हंगामात पार केल्या आहेत. तसेच २०२४-२५ च्या देशांतर्गत क्रिकेट हंगामातील हे त्याचे एकूण नववे शतक आहे. त्याने शनिवारी शतक ठोकल्यानंतर हाताच्या बोटांनी ९ वे शतक असल्याचे दाखवून सेलिब्रेशनही केले. करुण गेल्या अनेक महिन्यांसाठी देशांतर्गत क्रिकेट गाजवून भारतीय संघाचे दार ठोठावत आहे. आता त्याला त्याच्या कामगिरीमुळे जूनमध्ये सुरु होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी मिळणार का, हे पाहावे लागणार आहे. दरम्यान, करुणचं शतक झाल्यानंतर २१ वर्षीय मालेवार पहिल्या डावानंतर आता दुसऱ्या डावातही शतक करेल, असं वाटत होतं. मात्र त्याला ६० व्या षटकात अक्षय चंद्रनने बाद करत त्याची करुणसोबतची १८२ धावांची भागीदारी तोडली.

# महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद; रंजना पत्की व सुनील बाब्रस यांना वैयक्तिक सुवर्णपदक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इंदूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ३१ व्या मास्टर्स अखिल भारतीय टेबल टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राच्या रंजना पत्की व सुनील बाब्रस यांनी वैयक्तिक गटात सुवर्णपदक जिंकले तसेच त्यांनी महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपदही मिळवून दिले.

पत्की यांनी महिलांच्या ६४ वर्षावरील गटात सातत्यपूर्ण कामगिरीचा प्रत्यय घडविला. त्यांनी अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्याच राजेश्वरी म्हेत्रे यांचा ३-१ अशा गेम्सने पराभव केला. त्याआधी त्यांनी उपांत्य फेरीत दिल्लीच्या इंदू शर्मा यांचे आव्हान चुरशीच्या लढतीनंतर ३-१ असे संपुष्टात आणले होते तर



उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी मैथिली सोधी या महाराष्ट्राच्या खेळाडूला ३-० अशा गेम्सने पराभूत केले. अव्वल साखळी गटात त्यांनी दिल्ली व कर्नाटकच्या खेळाडूंविरुद्ध विजय मिळविताना अतिशय प्रभावी कामगिरी केली. या सर्वसामान्यांमध्ये पत्की यांनी टॉप स्पिन फटके काउंटर अटॅक तसेच प्लेसिंग असा चतुरस्त्र खेळ केला.

आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच महाराष्ट्राचे प्रशिक्षक बाब्रस यांनी या स्पर्धेतील ५९ वर्षावरील गटात अजिंक्यपद मिळवताना अतिशय अष्टपैलू खेळ केला अंतिम सामन्यात त्यांनी पंकज शर्मा यांचे आव्हान ११-४,११-८, ११-९ असे परतविले आणि विजेतेपद राखले. उपांत्य फेरीत त्यांनी पराग शहा यांची अनपेक्षित विजयाची मालिका खंडित केली शहा यांनी उपांत्य फेरीत स्थान मिळविताना दोन मानांकित खेळाडूंना पराभूत केले होते मात्र बाब्रस यांनी त्यांच्याविरुद्ध ११-९,११-८, ११-४ असा विजय मिळविला. शहा हे आक्रमक खेळ करण्याबाबत ख्यातनाम आहेत मात्र बाब्रस यांनी अतिशय कल्पकतेने खेळ करीत त्यांना फारशी संधी दिली नाही. उपांत्यपूर्व फेरीत बाब्रस यांनी पश्चिम बंगालच्या विवेक अरोरा यांना ११-६,११-८, ११-४ असे सरळ तीन गेम्स मध्ये पराभूत केले. बाब्रस यांनी या स्पर्धेमध्ये एकही गेम गमावली नाही तसेच त्यांनी टॉप स्पिन फटके , काऊंटर अटॅक, चॉप्स असा अष्टपैलू खेळ केला.

उत्तराखंड येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने टेबल टेनिस मध्ये घवघवीत यश मिळवले त्यामध्ये बाब्रस यांनी प्रशिक्षक म्हणून मोठा वाटा उचलला होता.

# अर्जुन, सुधाकरची चमकदार खेळी; व्हेरॉक करंडक क्रिकेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीसीएमसीज व्हेरॉक वेंगसरकर अकादमी आयोजित अकरा वर्षांखालील गटाच्या व्हेरॉक क्रिकेट स्पर्धेत अर्जुन शेट्येची अर्धशतकी खेळी आणि सुधाकर राठोडने सहा गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर व्हेरॉक क्रिकेट अकादमीने कोकाटे अकादमीचा नऊ गडी राखून पराभव केला.

थेरगाव येथील व्हेरॉक अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सुधाकर राठोडने केवळ बारा धावा देऊन सहा गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर कोकाटे अकादमीचा डाव ८७ धावांत आटोपला. त्यांच्या निशांत गौतम (३९) वगळता एकही फलंदाज मोठी धावसंख्या उभारू शकला नाही.

सुधाकर राठोडला शौर्य कांबळे व प्रीतम पवारने प्रत्येकी दोन गडी बाद करत सुरेख साथ दिली. प्रत्युत्तर देताना व्हेरॉक अकादमीने एक बाद ८८ धावा केल्या यावेळी अर्जुन शेट्येने ३२ चेंडूत अकरा चौकारासह ५३ धावांची खेळी केली त्याला शौर्य कांबळेने नाबाद खेळी करत सुरेख साथ दिली. शेट्ये व कांबळे या जोडीने पहिल्या विकेटकरिता ८४ धावांची भागीदारी केली. या स्पर्धेतील 'सामन्याचा मानकरी' हा मान व्हेरॉक अकादमीच्या सुधाकर राठोडने पटकाविला.

# जीएच रायसोनी आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स कार्निव्हल सोमवारपासून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, पुणे यांच्यातर्फे आंतरमहाविद्यालयीन रायसोनी स्पोर्ट्स कार्निव्हल २०२५ चे सोमवार दि. 3 मार्च 2025 पासून आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. सुदाम शेळके आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. उमेशराज पनेरू यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, पुणेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खराडकर आणि क्रीडा संचालक डॉ. निशिगंधा पाटील यांनी दिली.

The SPORTS Carnival

डॉ. आर. डी. खराडकर आणि डॉ. निशिगंधा म्हणाले की, या वर्षीच्या कार्निव्हलमध्ये फुटबॉल (७-अ-साईड पुरुष आणि महिला), व्हॉलीबॉल (पुरुष आणि महिला), टेबल टेनिस (पुरुष आणि महिला) आणि बुद्धिबळ (पुरुष आणि महिला) अशा विविध स्पर्धांचा समावेश करण्यात आले आहे. यात राज्यभरातून शंभर संघ आणि पाचशे पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. विजेत्या आणि उपविजेत्या खेळाडूंना रोख बक्षिसे आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष श्री. सुनील रायसोनी आणि रायसोनी एज्युकेशनचे कार्यकारी संचालक श्री. श्रेयस रायसोनी आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खराडकर यांनी महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा कार्निव्हलमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहेत.

नोंदणी आणि चौकशीसाठी, क्रीडा संचालक डॉ. निशिगंधा पाटील यांच्याशी ९६८९०६०१५९ वर संपर्क साधावा.

## पाचव्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी

# महिला क्रिकेट स्पर्धेत इन्फोसिस संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयडियाज- अ- सास कंपनी यांच्या तर्फे व कोलते पाटील डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी महिला क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत शिवानी पांगारकर(४५धावा) हिने केलेल्या धावांच्या जोरावर इन्फोसिस संघाने डॉइश बँक संघाचा ४७ धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.

व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी येथील मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत




इन्फोसिस संघाने ९षटकात १बाद ११५धावा केल्या. यात शिवानी पांगारकरने २४ चेंडूत ४चौकार व ३षटकाराच्या ४५ धावा, श्रीजा जोनगावकरने नाबाद ३५धावा, वैष्णवी गाडगीळने नाबाद ३२ धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. याच्या उत्तरात डॉइश बँक संघ ९षटकात ३बाद ६८धावाच करू शकला. यात अपूर्वा देशपांडे ४०, आलिफिया नाझ पटेल नाबाद १४ यांनी दिलेली लढत अपूरी ठरली.

याआधीच्या उपांत्य फेरीत आलिफिया नाझ पटेल (१-१९) हिने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर डॉइश बँक संघाने कॅपजेमिनी संघाचा २ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या लढतीत वैष्णवी गाडगीळ नाबाद ५५ धावांच्या जोरावर इन्फोसिस संघाने डसॉल्ट सिस्टिम्सचा २६ धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व २०,०००/- रुपये, उपविजेत्या संघाला करंडक व १०,०००/-रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अंकुर जोगळेकर मेमोरियल फाउंडेशनचे अध्यक्ष विंग कमांडर उदय जोगळेकर, उपाध्यक्ष विजय जोगळेकर, कोलते पाटील डेव्हलपर्स लिमिटेडचे उप महाव्यवस्थापक भरत रामचंदानी, कोलते पाटील डेव्हलपर्स लिमिटेडचे सचिन चिंचवडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

#रा